# ग्रथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

'अंतिम समय तुरुंगाच्या दाराशी हजर झाला आहे. याक्षणी मी आता परमेश्वराचे स्मरण करू लागलो तर, तो समजेल हा भेकड आहे. तो हसेल माझ्यावर उपहासाने. आणि म्हणेल, या भेकडाला आता माझी आठवण आली, मृत्यू दाराशी आल्यानंतर. संपूर्ण आयुष्यात कधीही माझे स्मरण केले नाही. यापेक्षा मी असाच या जगातून गेलेला ठीक राहील, जसा आतापर्यंत जगत आलो. त्यामुळे कदाचित लोक म्हणतील, भगतसिंग नास्तिक होता. त्याने ईश्वरावर कधी विश्वास ठेवला नाही. परंतु एक, भगतसिंग भेकड होता, असे कुणीही म्हणू शकणार नाही.'

या परिच्छेदावरून लक्षात आले असेल, हे मनोगत शहीद भगतसिंगाचे आहे, तर ते खरे आहे. भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव या क्रांतिवीरांना फाशीच्या तख्तावर उभे करण्यात आले. समोर फाशीचा दोर त्यांच्या गळ्याला आलिंगन देण्यास आतूर होता. त्यावेळीही या ध्येयाधीर वीरांच्या ओठांवर उत्स्फूर्त शब्द होते,'इन्किलाब झिंदाबाद!' इथे ईश्वराच्या स्मरणाला जागाच होतीच कुठे?




'रंग दे बसंती चोला' हे स्मिता भागवत यांचे नवीन पुस्तक. त्यांच्या लेखनसंपदेतील हे एकावन्नावे पुस्तक. देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या वीरांची गाथा ही नेहमीच प्रत्येकाला प्रेरणादायी वाटत आली आहे. तिचा अभिमान वाटत आला आहे. अंदमान म्हटले की आपणास स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे स्मरण आवर्जून होते. परंतु त्यांच्यासोबत काळ्या पाण्याची शिक्षा भोगणारे जवळपास सातशे स्वातंत्र्यसैनिक तेथे होते. त्यांची यादी पाहताना, सगळीच नावे आपल्या परिचयाची नाहीत, याची जाणीव लेखिकेला तीव्रतेने होते. अशा या आपणास अज्ञात असलेल्या वीरांची अवस्था म्हणजे ' नाही चिरा नाही पणती' अशी. सुखदेव लाहोरच्या तुरुंगात असताना त्यांनी गांधीजींना लिहिलेल्या पत्रात हेच नमूद केले आहे, 'सशस्त्र क्रांती करणारे काही आम्ही तिघेच नाही. परंतु प्राणदंड जाहीर झालेले, हिंदुस्थानच्या प्रजेचे अमाप प्रेम आणि आदर ज्यांनी मिळवला आहे असे आम्ही तीन वीर आहोत. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव ही नावे साधारणपणे माहीत असलेला प्रत्येक भारतीय आहे असे ठामपणे सांगता येईल. परंतु अनेक असे क्रांतिकारक आहेत, त्यांची ओळख आपणास नाही. काळाच्या उदरात गडप होताना त्यांनी कधी आपल्या उदरनिर्वाहासाठी कुणाकडे हात पसरला नाही. नाही पुरावे दाखवून लाभ घेतले. अशा क्रातिवीरांचा शोध घेणे आवश्यक आहे. त्यांचे कार्य, त्याग, बलिदान नव्या पिढीला ज्ञात झाले पाहिजे. ही तळमळ ठेवून लेखिकेने या पुस्तकाचा संकल्प ठेवला असल्याचे दिसून येते.

या पुस्तकात आलेले क्रांतिवीर आहेत, चंद्रशेखर आझाद, सुखदेव थापर, शिवराम हरी राजगुरू, बटुकेश्वर दत्त, भगवतीभाई व्होरा आणि त्यांची पत्नी दुर्गाभाभी, महावीरसिंग, जतींद्रनाथ दास, भगतसिंग आणि त्याचे वडील, किशनसिंग, काका अजितसिंग व स्वर्णसिंग. या सगळ्यांचा इतिहास सादर करताना केवळ क्रांतीची ओळख व्हावी, इतकाच मर्यादित हेतू लेखिकेने ठेवलेला नाही. तर वीरांची मानसिकता, त्यांच्या चळवळीची पद्धत, शिस्त, अंमलबजावणीतला काटेकोरपणा, त्यांचे तारुण्यसुलभ वागणे, बोलणे, स्वभाव, पेहराव, शारीरिक क्षमता, गुणदोष आणि ध्येयाकडे घेऊन जाणारा खंबीरपणा, यांचीही ओळख करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. बाळाचे पाय पाळण्यात दिसतात म्हणतात. तसे क्रातिकारकांचेही पाय पाळण्यात दिसत होते. अशा क्रातिकारकांच्या आठवणींचे स्वतंत्र प्रकरण यात दिलेले आहे. क्रांतिकारकांच्या रोमांचक कथा एका प्रकरणात दिलेल्या आहेत. आपल्या संशोधनात मिळालेली माहिती परिशिष्टात दिलेली आहे. सशस्त्र क्रंातीचा अनुरोध करताना 'हिसप्रस'ने प्रसंगोपात सादर केलेली काही निवडक निवेदने दिलेली आहेत. त्यात असेंब्ली हॉलमध्ये बॉम्ब फेकल्यानंतर बटुकेश्वर आणि भगतसिंगाने उधळलेले निवेदन, बाँबचे तत्त्वज्ञान, यांचा समावेश आहे. क्रांतिवीरांनी लिहिलेली पत्रे, क्रातिकारकांची मूळ नावे आणि धारण केलेली नावे, झालेल्या शिक्षा व त्यांचा बलिदानाचा दिनांक, यांची माहिती या परिशिष्टात दिलेली आहे. त्यामुळे थोडक्यात तरी पुरेशी माहिती असलेली ही क्रातिवीरांची गाथा ठरते.

यात आलेले काही शेर लक्षात ठेवावेत असे आहेत,

'मेरे खूनसे हाथ रंगकर बोले, क्या अच्छा है रंग, अब उम्रभर मंहेदी रचना मना है'

'शहीद हुआ हो प्रीतम जिसका, वह बेवा नही, सुहागन है!'

मनोज आचार्य यांचे मुखपृष्ठही पुस्तकाच्या नावाला साजेसे झाले आहे.

- **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**
**संपर्क : ९८६९२०७४०३**




'वारी हे मोठे विश्व आहे. विठ्ठलभक्ती हे त्या विश्वाचे आदितत्त्व आहे. जीवनाची नैतिकता हे त्याचे व्रत आहे. आध्यात्मिक आणि सामाजिक मूल्यांशी जोडून आपले जीवन अधिकाधिक प्रामाणिक करणे हाच त्याचा संस्कार आहे. तर 'आत्मोपम्येन सर्वत्र '– या गीतेच्या वचनाप्रमाणे, आपल्यातून विश्वाला तर संपूर्ण विश्वातून आपल्याला पाहणे आणि समभावाचे दर्शन घडविणे हा त्याचा धर्म आहे.'

'महाराष्ट्रातला विठ्ठल हा असा एकमेव देव आहे की, त्याचे दर्शन होत नाही. त्याची भेट घेता येते. दर्शनामध्ये अंतराय असतो. भेटीमध्ये एकरूपता असते. 'दर्शन' नेत्रांना सुख देते; तर 'भेट' देहालाच रोमांचित करीत असते. एकात 'लीनता' असते. तर दुसऱ्यात 'तल्लीनता' असते. म्हणूच 'ऐसा ठाव नाही कोठे , देव उभा–उभी भेटे.' ही ओळ अनेकांच्या ओठावर आपोआप उमटते.'

वरील पहिला परिच्छेद आहे 'माझी वारी' या लेखातला. यात लेखक त्यांचा विठ्ठलवारीचा अनुभव कथन करतात. ही वारी नुसती विठ्ठलाची नाही. तर ते करत असलेल्या संशोधनाला तत्त्वचिंतनाची अनुभूती देण्यासाठीची उत्कटता आहे. लेखक आहेत रामचंद्र देखणे. तर वरील दुसरा परिच्छेद आहे डॉ. द.ता.भोसले यांच्या 'आषाढीचे पंढरपूर' या लेखातला. त्यांचे वास्तव्यच पंढरपुरी असल्याने विठ्ठलमय झालेले. पंढरपुरी येणाऱ्या वारीविषयी पंढरपूरकरांना वाटणाऱ्या अप्रूपाची ते भेट घडवतात. वाचकाला पुन्हा पुन्हा विठ्ठलाची डोळे भरून भेट घडवल्याची अनुभूती देतात, हे या दोन लेखांचे मोठेपण.

वृत्तपत्रात काम करताना रात्रीचा दिवस करावा लागणे हे सर्वानाच ठाऊक. परंतु त्यानंतर शेवटची गाडी नाही मिळाली तर पहिल्या गाडीपर्यंत थांबणे आलेच. अशावेळी दिसणारा दिवस किती उजळ आणि तितकाच उघड असतो याचे दर्शन घडते ते 'मध्यरात्रीचा सूर्य' वाचताना. पावभाजी, चहावाला बबन, बंगाली मैत्रीण, कोवळा पोरगा, डेड बॉडी, नामदेव ढसाळ यांच्याशी प्रदीप म्हापसेकरांसोबत आपणही परिचित होत जातो. अरुण शेवते हे तर या पुस्तकाचे संपादक. 'ऋतुरंग' दिवाळी अंकाच्या निमित्ताने लेखक, कलावंत, मित्र, हितचिंतक किती आणि कसे मिळाले, त्यांचे मैत्र कसे वृद्धिंगत होत गेले, याचा आत्मनिष्ठ आलेख मोकळ्या मनाने मांडतात. सुशीलकुमार शिंदे, यशवंतराव गडाख यांच्यासारख्या अनेकांची सहृदयता आणि मोठेपण प्रांजळपणे नमूद करतात. तीच गोष्ट बाबासाहेब पुरंदरे यांची. आयुष्यभर छत्रपतींची खांद्यावर घेतलेली पालखी देशोदेशी दिमाखात मिरवली. शिवशाहीर म्हणून लौकिकास पावले. मिळालेल्या अनुभवांची संख्या ही तर केलेल्या व्याख्यानाच्या संख्येइतकी. तरीही आपल्या घडणीवर संस्कार आहे तो वडिलांचा, हे ते आवर्जून नमूद करतात. जिल्हाधिकारी म्हणून वावरलेले लक्ष्मीकांत देशमुख आपल्या कारकिर्दीचे श्रेय देतात; परभणी आणि कोल्हापूर या दोन शहरांना.

कुलदीप नय्यर यांच्या सियालकोटच्या पीरसाहेबांवरची श्रद्धा, नाना पाटेकरांच्या आत्ममग्न ओल्या आठवणी, वृत्तपत्रातील बातमीचा चपखलपणे उपयोग करून दिल्लीतून महाराष्ट्रात जाणे रद्द करणारे सुशीलकुमार, पत्रकारिता आणि मद्यपान यांच्या सुरस कथा, अंतर्गत कलहाची राजकीय बातमी वाचून व्यथित झालेले प्रमोद महाजन, देवराई आणि आंब्यांची कलमे, असा मोठा लेखांचा खजिना म्हणजे 'मन पाहि मागे मागे' हे पुस्तक. शीर्षकाप्रमाणेच आपल्या गतस्मृतींना उजाळा देणारे चौदा लेख यात आहेत. लेखक आहेत – गुलजार, यशवंत गडाख, नाना पाटेकर, गिरीश कुबेर, मुकुंद कुळे, मिलिंद जोशी, राजीव खांडेकर, अरुण कायगावकर. ज्या प्रसंगांना, घटनांना, संस्कारांना, कडूगोड अनुभवांना आयुष्यातून वेगळे करणे कधीच शक्य नसते, अंगावरील सालीसारखे. उलट त्याना स्वीकारले जाते ते जीवनाचा एक भाग म्हणून. व्यक्तिमत्त्वाचा एक पैलू म्हणूनही त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यांना उजाळा देणे म्हणजे स्वतःलाच पुन्हा त्या दिवसांत पाहण्यासारखे, दागिन्याला उजळून काढल्यासारखे. असा उजाळा या लेखकांनी लेखांमधून दिलेला आहे. त्याचे हे पुस्तक म्हणजे, 'मन पाहि मागे मागे.' आणि त्याचे संपादन केले आहे 'ऋतुरंग'चे संपादक अरुण शेवते यांनी.

गतस्मृती या फुलपाखरासारख्या असतात. त्यांच्या पंखांचा नाजूक आणि मुलायम स्पर्श त्यावरील रंगासारखाच हळुवार, मोहक. तोच संदर्भ जागोजागी रेखाटलेल्या मयूरछटातून व्यक्त होतो. मुखपृष्ठावरही याच पंखांचा संदर्भ आहे. लेखकांची रेखाचित्रेही हुबेहूब झाली आहेत.

- **मूल्य १८० रु. सवलतीत ११० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## हृदयस्थ

**अलका मांडके**




‘अरे,वेंधळेपणा करू नका. ही इमर्जन्सी आहे. पटापट करा सगळं. मला मार्फिन व स्ट्रेप्टोकायजेन द्या. दान-तीन हिनस लाईन्स सुरू करा . इंटेन्सिव्ह केअरमध्ये हलवा. माझ्या हृदयाला सपोर्ट लावण्याची तयारी ठेवा. मला श्वास घ्यायला त्रास होणार आहे. रेस्पिरेटर तयार ठेवा.’

‘माझ्या सेक्रेटरीला एकटं सोडू नका. ती घाबरलीय. कार्डियाक कॅथेराईझेशन रूम तयार ठेवा. केव्हिनला बोलावा. तिथे काम करणाऱ्या नर्स व इतर स्टाफ यांना बोलावून घ्या.’

दिवसाला पाच पाच हृदय शस्त्र करणारे डॉ. नितू मांडके स्वतःच हृदय विकाराने ग्रस्त झाले. स्वतः हिंदूजा मध्ये गाडी चालवत दाखल झाले. आणि स्वतःच्या उपचाराची तयारी स्वतःच सांगितली. अखेरची. प्रत्येकाला हेलावून सोडणारी ही घटना होती. अद्भूतच! असंख रुग्णांना, ज्यात पंधरा दिवसाचं बाळ देखील होते, पुन्हा आयुष्यात ठणठणीत उभे राहण्याचे भाग्य ज्यांच्यामुळे मिळाले, तेच डॉ. नितू मांडके त्यांच्या कौशल्यावर मात करून निघून गेले. साडे पाचशे खाटांचे हॉस्पिटल उभारलेले पाहण्याचे स्वप्न डोळ्यातच ठेवून गेले. मंदार, जुई आणि चारुता यांचे फुललेले आयुष्य पाहण्याची हौस अचानक सुकून पडली, वादळाने वृक्ष उन्मळून पडावा तशी. उरल्या केवळ स्मृती! त्यानी दिलेला स्नेह, प्रेम, माया, जिव्हाळा, आधार, साहाय्य, आणि जगण्याची, कर्तव्याची जिद्द.

डॉ. नितू मांडके यांच्याविषयीचा हा स्मृतींचा ऐवज डॉ. अलका मांडके यांनी वाचकांच्यासाठी खुला केला. मोठ्या धिराने, संयमाने, हळूवारपणे आणि तितकाच तरलपणे. कुठेही स्तोमाचे अवडंबर नाही, उदो उदो नाही, की स्वतःकडे नेणेपण नाही. डॉक्टर, प्रेयसी, गृहिणी, माता, सल्लागार सहचर या भूमिकांना कुठेही अतिशयोक्तीचे सलाईन न लावता प्रांजळपणे आयुष्याचा पट उलगडून ठेवला, अवघड शस्त्रक्रियेसारखा. नितू हृदयावरील शस्त्रक्रिया शस्त्रक्रिया करण्यात पटाईत होते. स्वभावाने जिद्दी होते. बोलण्यात विनोद असायचा तशा फटकळ शिव्याही असायच्या. वागणे मनमोकळे असायचे पण प्रसंग आला तर मारामारी करायची ही तयारी असायची. माणसांवर प्रेम करायचे. माणसांच्या मोठेपणावर विश्वास ठेवायचे. आपल्याला जे मिळाले ते इतरांना वाटण्याची दानत ठेवायचे. मित्र आणि गरीब यांच्यासाठी सारेकाही मोफत! असा माणूस आयुष्याचा सहचर म्हणून मिळाला हे भाग्यच!

त्याच्यामुळे खूप शिकता आले, स्वतःला पारखून घेता आले. पण अचानक सोडून गेल्याने सर्वच जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी त्यांच्यासारखेच खंबीर व्हावे लागले. त्यांचे अपूर्ण राहिलेली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी ताठ कण्याने उभे राहावे लागले. हा सगळा पट डॉ. अलका माडके यांनी या चरित्रातून साकारला आहे. एखाद्या कसलेल्या लेखिकेच्या कसदार लेखणीप्रमाणे.

प्रसिद्ध व्यक्तीच्या सान्निध्यात इतर माणसे झाकली जातात, मोठ्या वृक्षाखाली उगवलेल्या रोपट्यांप्रमाणे. परंतु इथे तसे झालेले नाही. डॉ. अलका यांचे कर्तृत्व तितकेच ठळक आहे. त्यानी पेललेल्या जबाबदाऱ्या, आणि अनेस्थेशियाच्या बाबतीत केलेले संशोधन व प्रयोग तितकेच मोलाचे आहे. तरीही त्यांनी ते अतिशय संययाने नमूद केले आहे. मुलांची काळजी वाहताना त्यांच्यातली माता सदैव जागृत आहे. जिथे चुकले असे वाटले त्याचे विश्लेषण केले आहे. हा गुण नितूच्या बाबतीतही कायम ठेवला. त्यांचे चुकले तिथे ते चूक म्हटले.

डॉ. नितू मांडके यांच्यासोबत जगलेले आयुष्य, त्याची आई, स्वतःचे आईवडील, मुले, या सगळ्यांच्या वागण्याचे, स्वभावाचे तपशील यात आलेले आहेत. बाळासाहेब ठाकरे, राम शेवाळकर, नाना पाटेकर यांच्याप्रमाणेच अनेक मान्यवर मंडळींचा परिचय यात आलेला आहे. यशाच्या गुणासोबत कधीकधी ॅलर्जीसारखे अवगुणी प्रकार घडतात. तशा काही घटना नितूच्या आयुष्यात आल्या. त्यांचीही दखल आवर्जून घेण्यात आलेली आहे. इंग्लड-अमेरिका येथे जम बसत असतानाही भारतात आपल्या ज्ञानाचा उपयोग व्हावा ही नितूची भूमिका. परंतु परत आले म्हणून सगळेच मनासारखे घडले असे नाही. बराच काळ जावा लागला. चिकाटी, जिद्द, संयम आणि स्वतःचे कौशल्य यावर विश्वास असेल तर अवघड काहीच नाही. डॉ. नितू मांडके यांच्याकडे हा विश्वास होता. डॉ. अलका मांडके या देखील त्याच मुशीत तयार झालेल्या. त्यामुळेच हे चरित्र वाचत असताना मनाचा ठाव घेत राहते. स्वतःच्या आयुष्याविषयी नेटकेपणाने मांडता येते हे या चरित्रातून लक्षात येते. आतापर्यंत या चरित्रमय पुस्तकाची अठरा आवर्तने पुनर्मुद्रणरूपाने पार पडली आहेत. यातच सारे आले. काही मोजक्या प्रसंगाचे फोटो सोबत दिलेले आहेत. एक पान मजकुराची गरज एक फोटो भरून काढू शकतो. या फोटोंमुळे शब्दांवर साज चढला असे म्हटले तर वावगे ठरू नये.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**



# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**




'ह्युमन लाईफ इज अॅबसर्ड. दी होल हुमॅनिटी इज स्टिंकींग अँड नो गॉड कॅन सेव्ह इट. नो सोशल सेटअप कॅन इम्प्रूव्ह इट.' अल्बेर कामू या फ्रेंच नाटकाराने व्यक्त केलेली ही जाणीव. 'अॅबसर्ड' हा शब्द प्रथम उपयोगात आणणाराही तोच. त्याची जन्मशताब्दी २०१३ साली साजरी झाली. नोबेल पुरस्काराने सन्मानित झालेला कामू हा नाटककार होता, तसा विचारवंत, चिंतक, कादंबरीकार, कथालेखक आणि वैचारिक निंबधकार म्हणून प्रसिद्धी पावलेला होता. लेखकाच्या मते कामूने वापरलेल्या 'अॅबसर्ड' या शब्दाचे मूळ जर्मन तत्त्ववेत्ता नित्सेच्या विचारात आहे. त्यासाठी नित्सेची चतुःसूत्री या पुस्तकात संदर्भ म्हणून दिलेली आहे. आणि त्याचवेळी 'ए फिलॉसॉफी डी अॅबसर्ड'चा संदर्भ देऊन कामूची 'अॅबसर्ड'विषयीची संकल्पना विषद केली आहे. 'ह्युमन लाईफ इज अॅबसर्ड'चा प्रत्यय त्याच्या नाटकातून येतो. त्याची काही नाटके त्यादृष्टीने पाहता येतात. 'मिथ ऑफ सिसीफस' या नाटकातला सिसीफस हा नायक. एक शिलाखंड पर्वताच्या शिखरावर नेऊन टोकावर ठेवण्याची शिक्षा त्याला सुनावलेली असते. परंतु शिला पर्वताच्या टोकावर स्थिर होत नाही. ती पायथ्याशी येऊन पडते. परंतु तिला टोकावर ठेवण्याचेच काम शिक्षा म्हणून त्याला पार पाडायचे आहे. त्यातून सुटका नाही, जगाच्या अंतापर्यंत किंवा ईश्वराची कृपा होऊन शापमुक्त होईपर्यंत.

'कॅलिगुला', 'क्रॉस परपज', 'द जस्ट असॅसिन्स', 'द पझेस्ड', 'द प्लेग' ही काही कामूची नाटके होत. त्यांची प्रायोगिकता, विसंगत व्यक्तिरेखेचा शोध आणि बोध, नाट्य विसंगतीत आंतरिक संगती, दर्पणनाट्य, विसंगतवादाचा तात्त्विक विचार, विरोधाभास, नाट्यशैली आणि 'अॅबसर्ड' या संकल्पनेचे शास्त्र, या विषयींचे विश्लेषण लेखकाने मर्मग्राहीवृत्तीने केलेले दिसून येते. त्यातून अल्बर्ट कामू आणि त्याची नाटके यांचा वेगळ्या अंगाने परिचय होतो.

आपल्याकडे ज्या नाटकांचा बराच बोलबाला झाला, आणि यांच्याविषयीची चर्चा अनेक काळ झडत राहिली, त्यापैकी एक आहे 'वेटिंग फॉर गोदो'. त्याचा मूळ लेखक सॅम्युअल बेकेट. आयरिश कवी, कादंबरीकार, नाटककार. अॅबसर्ड नाटकातून काहीच अर्थबोध होत नसल्याने त्याना 'न-नाट्य/अनर्थनाट्य' असे म्हणण्याचा प्रघात रूढ झाला. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'वेटिंग फॉर गोदो' होय. या नाटकाचा परिचय, त्यातले नाट्यदर्शन, नाटकातील प्रतिकात्मतेचा अन्वयार्थ, नाटकाचे यशापयश, समीक्षकांच्या परीक्षणाच्या लक्षणीय नोंदी, यांचाही वेध लेखकाने घेतलेला आहे. बेकेटच्या 'ऑल दॅट फेल', 'एंड गेम', 'एम्बर्स', 'क्रॅप्स लास्ट अेप', या नाटकांचा परिचय लेखकाने या पुस्तकात करून दिला आहे.

मराठीत दुसरे आलेले एक नाटक म्हणजे 'खुर्च्या'. त्याचा मूळ लेखक 'युरेन आयनेस्को'. त्याचे मूळ नाटक 'द चेअर्स'. आयनेस्कोचा 'अॅबसर्ड थिएटर'च्या निमित्ताने करून दिलेला परिचय, त्याची नाटके, आणि या चळवळीला दिलेली दिशा याचा तपशील लेखकाने दिलेला आहे. त्याचप्रमाणे नोबेल पुरस्काराने सन्मानित झालेल्या आणखी एका साहित्य सम्राटाची ओळख लेखकाने या पुस्तकात करून दिलेली आहे. त्याचे नाव आहे,'लुई पिरॅन्दलो'. याला प्रायोगिक नाट्य चळवळीचा भाष्यकार मानले जाते. जवळपास चाळीस नाटकांची संपदा त्याच्या नावावर आहे. 'नाटककाराच्या शोधात सहा पात्रे' या नाटकाची मराठी रंगभूमीवर बरीच चर्चा झाली. ते बेतलेले होते पिरॅन्दलोच्या 'सिक्स कॅरेक्टर्स इन सर्च ऑफ अॅन ऑथर' या नाटकावरून. या नाटकाची निर्मिती, पात्रांची कूळकथा, त्यांचा इतिहास, नाटकातील नाटक, नाटकाचा घाट, नाटकाचे वेगळेपण, या अंगांनी या नाटकाची ओळख लेखकाने करून दिलेली आहे. तशी पिरॅन्दलोच्या इतर नाटकांबरोबरच त्याचे नाट्यशास्त्रीय योगदान, सौंदर्यशास्त्रीय द्वैत, कलेतील आनंद आणि त्यातून मिळणारा आनंद यांचीही ओळख करून दिलेली आहे.

माणिक कानेड हे नाट्यचळवळीशी परिचित असलेल नाव. रंगभूमीशी असलेले त्यांचे नाते जसे रंगकर्मी म्हणून आहे तसे नाटककार, समीक्षक म्हणूनही आहे. या विषयी त्यांनी केलेले लेखनही विपुल आहे. त्यामुळे अॅबसर्ड थिएटर हा विषय त्यांच्या जिव्हाळ्याचा. अभ्यासाचा. त्याची ओळख करून देताना त्यांनी चार महान नाटककारांचा करून दिलेला परिचय तितकाच उत्कट आणि अभ्यासपूर्ण आहे. आपली भूमिका त्यानी पुस्तकाच्या सुरुवातीलाच प्रस्तावनेत स्पष्ट केली आहे.

अबसर्ड थिएटरचे तत्त्वज्ञान आणि रंगतंत्र मुळात समजून घेण्यासाठी हे पुस्तक नक्कीच उपयुक्त ठराव. प्रायेगिक रंगभूमी ही चळवळ काय आहे याचा शोध घ्यायचा तर तिची सुरुवात इथून व्हावी. नाटकाचे नेपथ्य आणि पात्रे म्हणून उभी असलेली प्रतिके यांचा चित्रकाराने सुरेख मेळ साधला आहे. त्यावरून अॅबसर्डची कल्पना मुखपृष्ठावरच येते.

- **मूल्य १२५ रु. सवलतीत ७५ रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## ताठ कणा

डॉ. पी.एस. रामाणी




''माझा स्वभाव जिद्दी होता. 'नाही, नको, उद्या बघू, बहुधा' असे नकारार्थी शब्द मला आजदेखील आवडत नाहीत. हातात घेतलेलं काम वेळेवर पूर्ण करायचंच हा माझा कटाक्ष असतो. 'हे आपण नक्की करू शकू' या आत्मविश्वासावरच माझ्या विचारांची बैठक असते.''

स्वतःवरचा हा विश्वास आणि तत्परता व्यक्त केली आहे डॉ. पी. एस. रामाणी यांनी. डॉ. रामाणी हे प्रथितयश असे न्युरोस्पायनल सर्जन आहेत. नावलौकिक मिळवलेले असे अनेक त्यांचे विद्यार्थी जगभर पसरले आहेत. आंतरराष्ट्रीय अशा अनेक सन्मानांनी त्यांचा सन्मान करताना स्वतःचा सन्मान करून घेतला आहे. असा माणूस घडला कसा, त्याची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी कशी आहे, अशी जिज्ञासा जागृत झाली. त्यामधून या पुस्तकाचे वाचन झाले. त्यातून उमगले ते म्हणजे, स्वतःच्या क्षमतेची ओळख आणि तिचा पुरेपूर वापर. मला काय करायचे आहे याचा ध्यास. त्यासाठी जिद्दीने मेहनत करायची तयारी. आणि मी ते मिळवीनच हा आत्मविश्वास. या ठामपणाचे संचित म्हणजे 'ताठ कणा' हे आत्मचरित्र.

डॉ. रामाणींना मुळातच देणगी आहे ती कुशाग्र बुद्धिमत्तेची. 'गणिताच्या पेपरात शंभरापैकी शंभर मिळतील. भाषेचा पेपर काहीसा अवघड गेला आहे. तरी अठ्ठ्याऐंशी मिळतील', इतका स्वतःवरचा विश्वास. निकाल लागला त्यात एका मार्काची चूक झाली. गणितात पूर्ण मिळाले. भाषेत अठ्ठ्याऐंशीऐवजी एकोणनव्वद मिळाले! डॉक्टर व्हायचा हा ध्यास आधीच पक्का ठरलेला. त्यातून अद्याप ज्या विषयावर पुरेसे संशोधन झालेले नाही, आणि त्याची नितांत गरज आहे, तो म्हणजे न्युरोस्पायनल सर्जरी असे ठरवून त्यांनी हा अभ्यासक्रम निवडला. या अभ्यासासाठी लंडन हे ठिकाण उत्तम म्हणून तिकडे प्रस्थान ठेवले. गोव्याचा मुलगा मुंबईत शिकला. उच्च शिक्षणासाठी लंडनला पोचला. याचं वर्णन करताना लेखक म्हणतात, 'लंडनला पोचताच अडीच तासांत नोकरी मिळाली. पहिल्याच आठवड्यात दोन आपरेशन करायला मिळाली. आणि तीन आठवड्यांत प्रमोशन देऊन रजिस्ट्रारही बनवलं गेलं. याचा अर्थ चीफ कन्सल्टंटना माझं काम पूर्णपणे पसंतीस उतरलं होतं. त्याखेरीज इतका विश्वास कोण टाकील?' इतकंच नाही तर डॉ. जेफ्री नाईटसारख्या इंग्लंडमध्ये दबदबा असलेल्या न्युरोसर्जननं 'न्यू कासल अपॉन टाईनच्या युनिव्हर्सिटीत न्युरोसर्जरी विभागात रजिस्ट्रारची नेमणूक पक्की केली. त्या विभागाचे चेअरमन एल. पी. लास्मन स्वतः सर्व सुविधा द्यायला राजी झाले. यातच सारे आले. मुंबईत आल्यानंतर प्रेतयात्रा चाललेली पाहून धास्तावणारा मुलगा चक्क दिवसरात्र प्रेतांच्या सान्निध्यात राहून त्यांच्या मणक्यांचा अभ्यास करू लागला.

अमेरिकेत नोकरीची संधी आली. परंतु लेखक म्हणतात,'आपल्या देशात स्पायनल सर्जरीचा नीट उगम झालेला नाही. न्यू कासलला मणक्यांची रचना लख्ख समजून आली. शेकडो रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया केल्या. संशोधन करून स्पायनल सर्जरीतलं गूढ समजून घेतलं. ह्या ज्ञानाची खरी गरज माझ्या देशबांधवांना आहे हे जाणून, निश्चयपूर्वक निर्णय घेऊन अमेरिकेच्या नोकरीला स्वतःहून नकार दिला.' आणि ते मायदेशी परत आले.

डॉ. रामाणी यांनी त्यांच्या या आत्मचरित्रात त्यांचे गोव्याचे बालपण, मुबईतील शिक्षण, लंडन-इंग्लंडमधील वास्तव्य आणि शिक्षण यांची केलेली वर्णने आटोपशीर आहेत. या काळात भेटलेल्या व्यक्ती, त्यांची मानसिकता, व्यवसायात आलेले अनुभव, हॉस्पिटल्स, पेशंट, डॉक्टर, आपले कुटुंब, या सगळ्यांची वर्णने केलेली आहेत. ती सर्वच मोजक्या आणि समर्पक शब्दांत आहेत. कुठेही पाल्हाळ किंवा मी मी असे कौतुक नाही. अलिप्तपणे स्वतःकडे पाहिले आहे. जे जे जसे अनुभवास आले, ते ते मनमोकळेपणे वाचकांसमोर ठेवले आहे. व्यवसाय, प्रतिष्ठा आणि पैसा यापलीकडेही जग आहे याची त्यांना जाणीव आहे. त्यांच्या रसिक मनाला साहित्यात रस आहे. आतापर्यंत अनेक शोधनिंबध लिहिणारे डॉक्टर स्वतः लेखक आहेत. आतापर्यंत गाजलेली १३ पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. स्वतःच्या फोटोग्राफीचे प्रदर्शन भरवण्याइतपत मन कलेत बुडालेले आहे. संगीताची उत्तम आवड जोपासलेली आहे. लीलया शस्त्रक्रिया करणारी आणि तबल्यावर नजाकतीने ताल उमटवणारी किमयागार बोटे ज्यांच्याकडे आहेत, ते डॉ. रामाणी त्यांच्या प्रांतात विरळाच म्हणायला हवेत.

या पुस्तकाचे मुखपृष्ठ आकर्षक रीतीने सजवले आहे, ते अंजली व करण रावत यांनी. म्हणजे डॉक्टरांची कन्या आणि तिचे यजमान यांनी. दोघेही कलाक्षेत्रात लौकिक प्राप्त केलेले. मलपृष्ठावर मणक्यांची रचना पाहताना सहज भास व्हावा, आपण एखाद्या पक्षाचे पीस पाहत आहोत.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

## ग्रथपान

### एक पूर्ण-अपूर्ण
नीला सत्यनारायण




'आपण नॉर्मल माणसं स्वतःला परिपूर्ण समजतो. पण खरं आपणच अपूर्ण असतो. ही मतिमंद मुलं आणि त्यांचं विश्व त्यांच्यापुरतं परिपूर्ण असतं. आपल्याला द्वेष, असूया, मत्सर यांनी त्रस्त केलेलं असतं. परंतु या मुलांचं निरागस मन आणि त्यांचा निर्मळ आनंद त्यांच्यापाशी सतत असल्यानं ती आपल्यापेक्षा जास्त सुंदर आणि आनंदी आहेत. आणि आपल्यापेक्षा अधिक परिपूर्णसुद्धा.'

'खरं कुणाचं जग आज पूर्ण आहे – चैतन्यचं की आपलं?

अशा या आपल्या अर्धवट आणि अपरिपूर्ण जगात, राग, लोभ, द्वेष, मत्सर यांनी ग्रासलेल्या या जगात, त्याला आपल्यासारखा बनवण्याऐवजी आम्हीच त्याच्या निष्पाप, निरागस जगात प्रवेश करून तिथं जगायला शिकलो आहोत. आपलं जग अनेक विकारांनी ग्रासलेलं आहे, अपरिपूर्ण आहे. चैतन्यचं विश्व प्रेमानं ओथंबलेलं आणि पूर्ण आहे.'

नीला सत्यनारायण यांचे हे पुस्तक, 'एक पूर्ण– अपूर्ण ' म्हटले तर एका मातृत्वाचे आत्मकथन, म्हटले तर चैतन्यची कहाणी. प्रथमपुरुषी निवेदन पद्धतीने लिहिलेले. माणूस म्हणून जगताना एकच अपेक्षा असते, आपल्या वाट्याला आलेले जगणे हे इतरांपेक्षा चांगले असावे. परंतु अपेक्षाभंग होतो तेव्हा वाट्याला येते ती विफलता, नैराश्य, अस्वस्थता. प्रत्येक पावलावर पाठलाग करीत राहते ती भीती. स्वतःच स्वतःचा करीत राहणारा छळ, असह्य होणारी अनामिक वेदना, सगळ्यापासून दूर जावे अशी निर्माण होणारी पळपुटी भावना. हे सारे नातेवाईकासारखे येऊन भेटणारे रोग त्यातून निर्माण होतात. परंतु मायेचे पाश मनासारखे वागण्याची मुभा देत नाहीत. आहे ते सहन करणे इतकेच हातात राहते. त्यातून जगण्याची उमेद तावूनसुलाखून निघते. आपल्यावरचा विश्वास दृढ होत जातो. आणि जे नकोसे वाटते तेच आपलेसे वाटू लागते. जगणे म्हणतात ते याला. त्याचा अनुभव हे पुस्तक देते.

मुलीच्या पाठीवर मुलगा व्हावा ही अपेक्षा पूर्ण होते. परंतु 'चैतन्य' असे नामकरण होण्याआधीच जन्मतःच त्याच्या नावासमोर 'डाऊन सिंड्रोम', 'ब्ल्यू बेबी' अशी बिरुदावली येऊन चिकटते. डॉक्टर तर असा सल्ला देते, 'अशा बाळाचा सांभाळ करण्यापेक्षा आमच्याकडे सोपवा, प्रयोगासाठी 'गिनीपिग' म्हणून. त्याच्या रक्ताचे नमुने घेऊन त्यावर प्रबंध तयार करीन!' आघातावर आघात. मातृत्वाचा पराभव वाटावा असे प्रसंग. परंतु हृदयातले मातृत्व का अशी हार पत्करणार? पुढे त्याचा सांभाळ करताना, शाळेत घालताना, समवयस्क मुलांसोबत खेळायला पाठवताना अनेक चटके सहन करावे लागले. त्यातूनच त्याच्या हृदयाला जन्मतःच छिद्र असल्याचा संशय. परंतु प्रत्येक वेदनेवर औषध देणारा एकच वैद्य आहे, काळ. पुढे सर्व ठीक होते. चैतन्य आता मोठा झाला आहे. उभा राहू शकणार नाही अशी भविष्यवाणी होती, ती त्याने खोटी ठरवली आहे. धावण्यात रौप्यपदक त्याने पटकावले आहे.

चैतन्यच्या या कथानकात त्याची मोठी बहीण अनुराधा आहे, वडील सत्य आहेत. या सगळ्यांच्या मध्ये आहे आई. जी पदोपदी वेदना सहन करते आहे. चैतन्य हाच श्वास मानून त्याच्यावर प्रेम करते आहे, त्याला उभा करण्यासाठी धडपड करते आहे. तिची तळमळ आणि तगमग, अनुराधाला वाटणारा दुरावा, धंद्यात फसवले जात असतानाही धीर देणारे सत्य, आणि जखम बरी करण्याऐवजी तिच्यात सुरी खुपसून रक्तबंबाळ करणारे डॉक्टर. अशा सगळ्यांच्या मध्ये मातेला सावरण्याची संधी शेवटी देतो तो चैतन्यच.

मतिमंद मुलाची पालक म्हणून जगताना आलेले अनुभव हे किती विलक्षण असू शकतात, याचा प्रत्यय या पुस्तकातून येतो. संयम, सहनशीलता, जिद्द हे गुणांचे कौतुक तेव्हाच होते, जेव्हा मूल स्वतःच्या पायावर उभे राहते. त्याचा अनुभव येथे येतो. आणि त्याचवेळी अंतर्मुख होऊन विचार करता येतो, खरे जग कोणते? कुणाचे? ते पूर्ण की अपूर्ण? त्याची उत्तरे मिळतात, ती याच कथनातून. नीला सत्यनारायण यांनी अतिशय संयतपणे हे कथन केलेले आहे. यात चैतन्य हा केंद्रस्थानी आहे, तरीही मातृत्वाचा ओलावा अधिक आहे. मातृवेणा सहन करण्यापेक्षा पालकवेदना सहन करणे किती कठोर असू शकते याची जाणीव त्या यातून करून देतात. परंतु त्याचवेळी हेही सुचवतात, की आपल्या नजरेतून पाहण्यापेक्षा या मुलांच्या नजरेतून पाहा. ते खरे जग आहे.

पुस्तकात चैतन्यचे काही फोटो आहेत. त्याने काढलेले चित्र आहे. लालगुलाबी जास्वंदीच्या फुलांमध्ये एक फूल आहे काळ्या रंगाचे. आणि काळ्या रंगाच्या पार्श्वभूमीवर एक फूल आहे लाल रंगाचे. आशेवर मेघछाया आणि मेघगर्दीत एक शलाका. प्रदीप म्हापसेकर यांची मुखपृष्ठाची कल्पना छानच!

- **मूल्य १२५ रु. सवलतीत ७५ रु.**

# ग्रंथपान

## जॅक ऑफ ऑल
अनुराधा गोरे




'डोळे बंद करा व वासावरून वस्तू-पदार्थ ओळखयाला शिका. जेव्हा माणसाचं मन अधिक संवेदनाशील बनतं तेव्हा नुसतं नाव ऐकताच आपल्याला वास जाणवू शकतो. बघा डोळे मिटा – पारिजात, सोनचाफा, मोगरा, बकुळ... इत्यादी इत्यादी. खरंच आपली स्मरणशक्ती मोजण्याचं अणि वाढवण्याचं असे वास बिनखर्चाचं उत्तम साधन आहे. बघा, सराव करा.' 'नाकाचा वापर करा' या लेखात सराव किती महत्त्वाचा आहे, याची महती लेखिका समजावून सांगत आहेत.

'जॅक ऑफ ऑल' हे लहान लहान लेखांचे पुस्तक आहे. विद्यार्थी हा प्रमुख घटक नजरेसमोर ठेवून हे लेख लिहिलेले आहेत. परंतु ते केवळ विद्यार्थ्यांनी वाचावेत असे नाही, तर पालकांनी देखील ते वाचायला हवेत. प्रत्येकाला आपले मूल लाखात एक व्हावे असे वाटत असते. त्यासाठी वाटेल ती धडपड करायची त्यांची तयारी असते. विद्यार्थ्याचे घडणे हे एकमेव उद्दिष्ट नजरेसमोर असते. पुस्तकीय बुद्धिमत्तेत त्यामुळे वाढ होऊ शकेल, परंतु 'घडणे' यात तेवढेच अपेक्षित नाही. तर ते घडणे सर्वांगीण असायला हवे. बहुश्रूतपणा त्यात यायला हवा. व्यक्तिमत्त्व विकसित होण्यासाठी त्यांची आवश्यकता असते. तसा तो विकसित करायचा असेल तर, त्याची सुरुवात लहानपणापासून झाली पाहिजे. त्याचा पाया नीट घातला गेला पाहिजे. तसे करण्यासाठी ज्या गोष्टींची काळजी घ्यायला हवी, त्यांची ओळख या लेखांमधून करून देण्यात आलेली आहे. लेखिका मुळातच शिक्षिका असल्याने, आणि त्यांचा या क्षेत्रातला अनुभव समृद्ध असल्याने, या लेखांना शालेय पाठांचे स्वरूप न येता, आत्मियतेचे अक्षरलेणे लाभले आहे. पुढे विद्यार्थी कोणत्याही एका विषयात, क्षेत्रात पारंगत होऊ दे, परंतु आज तरी त्याला सारे आले पाहिजे, हा ध्यास लेखिकेने बाळगलेला आहे. तसा मनोगतात त्यांनी तो व्यक्तही केलेला आहे. त्याच ध्यासातून हे लेख उतरलेले आहेत.

लेखांचे विषय तसे नेहमीचे, आपल्या परिचयाचे. फक्त डोळसपणे, जाणीवपूर्वक आणि सजगपणे त्याकडे पाहण्याची आवश्यकता आहे. 'हरवले ते गवसेल का?' या लेखात आपले पारंपरिक खेळ आपण विसरत चाललो आहोत यावर प्रकाश टाकला आहे. चोरपोलीस, दगड-माती, साखळी, लंगडी, हुतूतू, कबड्डी, उभा खोखो, बैठाका खोखो, आट्यापाट्या, लगोरी, कवड्या, चिंचोके, सरफर, सोंगट्या, संगीत खुर्च्या, आंधळी कोशिंबीर, फुगडी, झिम्मा, पिंगा...हे खेळ म्हणजे आपली संस्कृती, परंपरा. जसा जेवताना चौफेर सकस आहार हवा अगदी तसेच मुलांच्या वाढीसाठी सर्वप्रकारचे खेळ हवेत. त्यासाठी मैदानाशी दोस्ती हवी. मैदानात धावल्याने शरीराला, मेंदूला भरपूर प्राणवायू मिळतो. हार-जीत कशी पेलायची ते कळते. टीमवर्क, लीडरशीप आपोआप उमगत जाते. मनावरचे ताणतणाव आणि अभ्यासाचे ओझे दूर होते. आत्मविश्वास वाढतो हे सांगताना त्यापुढे म्हणतात, की शब्दप्रभू होण्यासाठी शब्दांचा संग्रह वाढवा. ते कसे, केव्हा, कुठे वापरायचे याची माहिती करून घ्या. त्यासाठी हवा सराव, रियाज, पुनरावृत्ती, निरीक्षणशक्ती. आपले अक्षर सुंदर असायला हवे. सुंदर अक्षर म्हणजे तीन एच-हँड, हेड अँड हार्ट. (हात, डोके आणि मन किंवा हृदय) माझे अक्षर सुंदर आहे, ही भावनाच माणसाला मोठे समाधान मिळवून देते. सुटीचा, रिकाम्या वेळेचा सदुपयोग करा. कला किंवा छंद जोपासा. कोणतीही कला शिका, पण शिका. कविता गोळा करा. टाकाऊ वस्तूपासून नवीन वस्तू तयार करा. भरतकाम ही सुद्धा कला आहे. भ्रमंती, ट्रेकिंग, व्यायाम, छलित बहुरूपी बना. आपल्या आयुष्यात आनंदाचे, सुखासमाधानाचे कारंजे फुलवायचे तर कलांची संगती हवी.

इतरही खूप विषय आहेत. लेखिका आवर्जून नमूद करतात, संगणक काळाची गरज झाली आहे. तो जरूर शिकून घ्या. पण त्याच्या आहारी जाऊ नका. अनेक प्रसंग अचानक कोसळतात. अशा आपत्तीच्या वेळी घाबरून जाऊ नका. हातपाय गाळू नका. हिंमत बांधा. परिस्थिती ओळखून तिच्यावर मात करा. इतरांना मदत करा. कोडी बनवा, कोडी शोधा, समस्यांची कारणे शोधा आणि त्यावर उत्तरेही शोधा. नकाशाशी मैत्री करा. गावाचा परिसर समजून घ्या. त्याच्या इतिहासाच्या खुणा शोधून काढा. दैनंदिनी लिहायला सुरुवात करा. स्वतः अनुयायी होण्यापेक्षा नेता बना. धाडसी व्हा. महत्त्वाचा विषय म्हणजे वेळ. तुमच्याजवळ असलेल्या वेळेचा जास्तीत जास्त चांगला उपयोग करा. स्वतःचे वेळापत्रक बनवा. वेळापत्रकात प्रत्यक्ष कृतीवर भर द्या. पर्यावरणाकडे लक्ष द्या. मन प्रसन्न ठेवा.

अनेक विषय पुस्तकात आहेत. यातून लेखिकेचा उपदेश करण्याचा प्रयत्न नाही, तर कृती करण्याचा आग्रह आहे. भाषाही सोपी आहे. लेखात विषयानुरूप उदाहरणे अनुभवाच्या अंगाने दिलेली आहेत. ती सांगून पुढे हेतूकडे वळण्याची पद्धत अनुसरल्याने लेखातली सहजता आणि रुची कायम राहिली आहे. मुखपृष्ठावरील कल्पना आणि आतील रेखाचित्रे भावसारांच्या कल्पकतेला साजेशी झालेली आहेत.

- **मूल्य १३० रु. सवलतीत ८० रु.**

# ग्रंथपान

**कालिदास**
**एका गुराख्याचे महाकाव्य**
मयूर देवल




'अस्ति कश्चिद वागःविशेष?'
या तीन शब्दांतील प्रत्येक शब्दापासून सुरू होणारी महाकाव्यं,
'अस्ति'पासून सुरुवात होणारं 'कुमारसंभव' – अस्त्युरस्यांदिशिदेवात्मात, हिमोलयोनाम नगाधिराज :
दुसऱ्या 'कश्चिद' या शब्दापासून 'कश्चिद कांता विरहगुरुणा स्वाधिकारत प्रमतः' हे विश्वविख्यात 'मेघदूत'.
आणि तिसऱ्या 'वाक्' शब्दापासून सुरुवात झालेलं 'वागर्थविव सम्प्रुक्तौ वागर्थ्प्रतिप्रत्तये 'रघुवंश' हे महाकाव्य सर्वश्रुत आहे.

कविराज, कविकुलभूषण, महाकवी, कालिदासाने केलेल्या रचना आपणास ठाऊक आहेत. 'ऋतुसंहार, मेघदूत, कुमारसंभव आणि रघुवंश ही महाकाव्ये; मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय, शाकुंतल ही नाटके. त्याच्या या साहित्यकृतींनी अवघ्या विश्वाला मोहिनी घातली आहे. त्याच्या जीवनपटाचा वेध घेणारे नाटक लिहिणे तसे अवघड काम. परंतु हे शिवधनुष्य पेलले आहे मयूर देवल यांनी. या नाटकाला महाराष्ट्र राज्य हौशी नाट्य स्पर्धेत 'सर्वोत्कृष्ट' पुरस्काराचा गौरव प्राप्त झालेला आहे, हा त्यांच्या लेखनाचा, मेहनतीचा पुरस्कार म्हणायला हवा.

चित्रावती नगरीच्या नरेशाची राजकन्या, कमलनयना, चपलांगा, पद्मिनी, रूपगर्विता, विद्याभूषिता वासंती आपल्या अधिकाराच्या, कुटनीतीच्या आणि बुद्धीच्या बळावर तिच्या स्वप्नातील सुस्वरूप, शूर कर्तृत्ववान, बुद्धिवान वराच्या शोधापायी कित्येक योग्य पुरुषांचा अपमान करीत असते. असाच अपमान झालेला त्यापैकी पंडित वारुची हा एक. या अपमानाचा सूड घेण्यासाठी तो दरबारातून बाहेर पडतो. कालिदास हा त्यासाठी उत्तम प्यादे ठरतो. तो कालिदासाला राजकन्येच्या स्वयंवरात सहभागी करतो. त्याच्या रूपावर ती आधीच भाळते. स्वयंवरात त्याला वरते. त्याच्यासोबत पायी त्याच्या गावाकडील झोपडीकडे प्रवास करू लागते. तेव्हा त्याचे खरे रूप तिच्या लक्षात येते. 'एक हलका गुराखी.. गांवढळ.. बेंगरुळ ध्यान' म्हणत त्याची निर्भत्सना करते. तो आपल्यासारखा विद्वान नाही, संस्कृतचा त्याला गंध नाही, हे तिला सहन होत नाही. त्याला ती अखेरचे बजावते, 'तुझी अभद्र सावलीसुद्धा माझ्यापासून दूर घेऊन जा.'

कालिदास तिला सोडून निघून जातो. कालिमातेच्या चरणी लीन होतो. तिच्या आशीर्वादाने तो विद्याभूषित होऊन परत येतो. परंतु आता तो तिचा पत्नी म्हणून स्वीकार करीत नाही. तुझ्यामुळेच मी या पदाला पोहोचलो. तू माझी गुरू आणि मी एक शिष्य, असे तो तिला सांगतो. आतापर्यंत ती त्याची वाट पाहत असते. त्याच्याच गावी, त्याच्याच झोपडीत राहत असते. परंतु त्याच्या या नव्या रूपापुढे हतबल होते आणि शाप देते, 'जा, तुझा शेवट शेवटी एका स्त्रीकडूनच होईल.' तसा तो एका नर्तकीकडून होतो. असे हे एकूण कथानक.

या कथानकाची मांडणी करताना लेखकाने सूत्रधार आणि नटीची योजना केलेली आहे. त्यांच्यामार्फत कथानक पुढे सरकत जाते. यातले नाट्य आणि संघर्ष यांची गुंफण त्यातून उलगडत जाते. पंडित वारुचीची प्रतिज्ञा आणि राजकन्येचा स्वभाव यांच्या द्वंद्वात कालिदासाचे पात्र हेलकावे खात राहते. प्रवेश आणि इतर पात्रांच्या संवादातून कालिदासाचे व्यक्तिमत्त्व नाटकाच्या दोन्ही अंकांत सतत रंगमंचावर राहील याची काळजी लेखकाने घेतलेली आहे. यातील नांदी आणि लावणी, मधूनच संस्कृत पद यामुळे नाटकातील नादमयता शेवटपर्यंत टिकून राहते. नाटक वाचत असताना ते प्रत्यक्ष रंगमंचावर साकार होत असल्याचा भास होत राहतो. नाटकाचा शेवट दिग्दर्शकाच्या संस्कारासाठी अपूर्ण ठेवलेला आहे हे विशेष!

नाटक सादर करताना नेपथ्याचा वापर कसा करावा, यासाठीही बऱ्याच जागा सोडलेल्या आहेत. त्यामुळे हे नाटक प्रायोगिक आणि व्यावसायिक अशा दोन्ही स्तरावर सादर करता येईल. कथेचा आत्मा तसा लहान असला तरी त्याची गुंफण करण्यात लेखकाचे कसब पणाला लागलेले दिसून येते. लेखनासाठी संदर्भ जमा करताना बराच प्रयास करावा लागला, हे त्यांनी मनोगतात स्पष्ट केले आहेच. लहान लहान प्रवेश आणि ओघवते संवाद, त्यातला पात्रांच्या स्वभावानुसारचा चटकदारपणा, यामुळे नाटक चटकन पकड घेते. चित्रकार सतीश भावसार यांचे मुखपृष्ठही छान झान झाले आहे.

- **मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**



# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

'आयुष्य सुंदर जगावे, आरोग्यपूर्ण जगावे कसे, याच्या एका उच्च कोटीच्या सहृदय डॉक्टरने दिलेल्या टिप्स तर या पुस्तकात आहेतच; त्याचबरोबर आपले जीवनविषयक तत्त्वज्ञानही थोडक्यात, चपखलपणे आणि रसिक दृष्टीने त्यांनी सांगितले आहे. जीवन त्यांना कळले हो... अशी जी माणसे असतात त्यामध्ये रामाणींची गणना करायला हरकत नाही.'

'सत्तरीचे बोल...' या पुस्तकावरील हा अभिप्राय आहे ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक, अरुण साधू यांचा. डॉ. रामाणी यांनी लिहिलेल्या या पुस्तकावर अनेक मान्यवरांनी अभिप्राय व्यक्त केले आहेत.




डॉ. अलका मांडके लिहितात, 'सकारात्मक जगण्याबद्दल बोलणे सोपे असते, प्रत्यक्ष प्रसंगाला तोंड देण्याची वेळ येते तेव्हा सारे विसरले जाते. परंतु डॉ. रामाणी यांनी 'सत्तरीचे बोल...' या त्यांच्या पुस्तकात स्वतःच्याच उदाहरणातून, वेगवेगळ्या प्रसंगातून ते प्रत्यक्ष दाखवून दिले आहे – कुठलाही उपदेश न करता जणू वाचकाला हात धरून मित्रासारखे आपल्याबरोबर ठेवलेय.'

सुप्रसिद्ध लेखिका प्रा. मनीषा पिंपळखरे लिहितात, 'सत्तरीचे बोल' हे पुस्तक वाचले आणि एका नव्याच ३डॉ. रामाणींची ओळख झाली. तीव्र जीवनेच्छा असेल तर सत्तरीच्या उंबरठ्यावर उभं राहून मागे सरलेल्या आणि पुढे परसलेल्या जीवनाकडे प्रगल्भ नजरेनं कसं पाहता येतं याचा अनुभवनिष्ठ वस्तुपाठ या पुस्तकाच्या रूपानं प्रत्ययाला आला.'

डॉ. रामाणी यांचे 'ताठ कणा' हे पुस्तक आपण वाचले आहे. त्यातून डॉ. रामाणींचा जीवनाकडे पाहण्याचा आणि प्रत्येकाला उत्तम आरोग्याचा मंत्र देण्याचा सकारात्मक दृष्टिकोन त्याचवेळी आपल्या अनुभवाला आला होता. उत्तम आरोग्य कसे राखावे आणि त्यासाठी वयाची अट आहे का, हा खरा वास्तवात नसलेला प्रश्न सहजपणे बहुतेकांच्या डोक्यात चटकन उपस्थित होतो. सुखी जीवन जगायचे, आनंदाच्या राशीत लोळायचे, तर आरोग्य उत्तम राखण्याला पर्याय असू शकत नाही. आणि त्यासाठी फार काही करावे लागते असे नाही. गरज आहे ती शिस्तीची. ती शिस्त म्हणजेच आरोग्याचा गुरुमंत्र. तो गुरुमंत्र डॉ. रामाणी देत आहेत या पुस्तकातून. अगदी सहजपणे. सोप्या पद्धतीने. कुणालाही आकलन होईल अशा पद्धतीने. कारण हा गुरुमंत्र उजळून निघालेला आहे, त्यांच्या स्वतःच्या अनुभवाच्या मुशीतून. त्यांच्या कर्तव्यनिष्ठ ज्ञानाच्या परीसस्पर्शातून.

या जन्मावर, या जगण्यावर प्रेम करायचे तर लहानपणापासूनच आरोग्याच्या चांगल्या सवयी लावणे आवश्यक आहे. सकाळी लवकर उठणे, जॉगिंग, ध्यानधारणा करणे, याने दिवसाची सुरुवात करा. मन प्रसन्न ठेवा, रागाचा लोभ आवरा, यासारखे सोपे पण आनंद देणारे उपाय जवळ बाळगा. प्रमाणाबाहेर शारीरिक दगदग नको आणि मानसिक ताण नको हे तनमन प्रसन्न ठेवण्याचे सूत्र. मन प्रत्येकक्षणी चांगल्या सकारात्मक विचारांनी भरलेले असावे. त्याचा परिणाम नकळत शरीरावर होतो. ते तंदुरुस्त व सक्षम बनते. साठीचा उंबरठा ओलांडला असेल, निवृत्त झाला असाल तर 'आता निव्वळ आराम' ही संकल्पना सोडायला हवी. प्रवास, वाचन, लेखन, लोकांत मिसळणे, जागतिक व सामाजिक घडामोडीविषयी मते वृत्तपत्रांना कळवणे, हे करत राहिल्यास नैराश्यापासून दूर राहता येईल. आहार आणि व्यायाम कसा असावा याचेही गणित जुळवायला हवे. अशा अनेक उपयुक्त आरोग्याच्या टिप्स डॉ. रामाणी यांनी या पुस्तकात दिलेल्या आहेत.

डॉ. रामाणी स्वतःचे अनुभवही वाचकांसमोर ठेवतात. आज ते सत्तरीच्या पुढे आहेत. जगातील दहा नामांकित न्युरोसर्जनांमध्ये त्यांची गणना होते. त्यांच्या या अचंबित करणाऱ्या प्रवासाचे वर्णन ते करतात, 'बुद्धिमत्तेबरोबर, अपरिमित कष्ट आणि स्वतःत नेतृत्वगुणांचा विकास करत मी या यशोशिखरापर्यंत पोचलो आहे. शरीर स्वास्थ्यासाठी रोज पहाटे उठणे आणि जॉगिंग करणे हा माझा परिपाठ आहे. त्याचप्रमाणे नियमित ध्यानधारणा करून मी माझे चित्त शांत, प्रसन्न ठेवण्याची काळजी घेतो. माझा मित्रपरिवार मी सतत वाढता ठेवला.'

सत्तरीच्या उंबरठ्यावर असलेल्यांनी जरूर वाचावे असे लेख आहेत. तसेच सर्वच वयातील वाचकांनी सत्तरी गाठण्यासाठी कसा जीवनक्रम असावा हे समजून घेण्यासाठी हे पुस्तक वाचावे, असे आहे. लेख मोजक्या शब्दात नेमके तेच सांगणारे हे लेख आहेत. मी किती मोठा हे सांगण्याऐवजी प्रत्येकाला कसे मोठे होता येईल, ही भावना यात आहे. स्वतःच्या चांगल्या सवयी आणि चांगले जे काही काही सांगण्यासारखे आहे तेच यात आले आहे. त्यांना अनुभवाची जोड असल्याने त्यातला सशक्तपणा लक्षात येतो. शेवटी काही व्यायामाचे प्रकारही दाखवलेले आहेत. हे लेख वाचताना वाटत राहते, आजारी माणसांनी सल्ल्यासाठी डॉक्टरांच्या दारात रांग लावण्याऐवजी डॉक्टरच आपल्या दारात उभे आहेत, तेही कुठली फीची अपेक्षा न करता.

- **मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**

# ग्रंथपान

## सोन्याच्या धुराचे ठसके

डॉ. उज्ज्वला दळवी




अरब देश म्हटले की तेल आणि सोने ही समीकरणे ठरलेली. सामान्य माणसांना या वाळवंटी तेलाचा तसा मोह असण्याचे कारण नाही. परंतु सोन्याचे नाव काढले तर झोपेतून पळत सुटेल. एक काळ असा होता, खरोखर अनेकजण या देशाकडे धाव घेत. सोन्याचा धूर निघतो म्हटल्यानंतर तोही सोनेरीच असणार. मग स्वप्नाळू, ध्येयवादी भाग्यावरील काजळी झटकण्याची सुवर्णसंधी ते कशी सोडतील? परंतु सगळेच तसे धावत सुटतात असे नाही. अन्य कारणामुळेही या धुराचे ढग पाहण्याची संधी अनेकांना मिळते. तशी ती डॉ. दळवी दाम्पत्याला मिळाली. त्यांनी या संधींचे सोने किती केले, यापेक्षा या काळात त्याना अनुभवांनी किती समृद्ध केले, हे अधिक महत्त्वाचे. या देशातले अंतर्गत जीवनमान, व्यवस्था आणि निसर्ग याचेही कुतूहल न टाळता येणारे. त्यांनी ते सारेच अलगद टिपलेले आहे, पायाला वाळूचे कण बिलगावेत तसे. हे तेथील वास्तव्यात अनुभवाला आलेले जीवनकण आपल्यासमोर पसरून ठेवले आहेत डॉ. उज्ज्वला दळवी यांनी.

डॉ. दळवी दाम्पत्य आणि काहीजण असे बाराजण अरब देशाच्या भूमीवर पाय ठेवतात. जवळपास पंचवीस वर्षे ते याच भूमीत डॉक्टर म्हणून काम करतात. हे काम करीत असताना त्याना जवळून पाहता आले तेथील ग्रामीण जीवन, शहरी जीवन. नमाजाची वेळ झाली की सर्व कामकाज बंद. गुन्हेगाराला जाहीर शिक्षा करताना केलेला शिरच्छेद. स्त्रियांबाबातचे कठोर नियम, नखशिखांत बुरखा घातल्याशिवाय सार्वजनिक ठिकाणी गेल्यास, परक्या पुरुषासमोर गेल्यास डोक्यावर छडीचा प्रसाद. व्याज नाही म्हणून आणि पूर्ण कर्ज मिळत असल्याने गाड्या उडवण्याची चैन. महिलांनी वाहन चालविण्यास असलेला कडक निर्बंध. महिलांची मातृत्व हीच कसोटी . जिला अधिक मुले होत नाही ती घटस्फोटाला पात्र. मुलींना हुंडा देण्याची पद्धत. त्यामुळे मुलीसाठी वराचे वय पाहण्यापेक्षा पैशाची राशी पाहिली जाण्याची रीत. फ्री व्हिसावर बाहेर देशातून आणलेले, फसलेले लोक. नोकर म्हणून राबणाऱ्यांच्या व्यथा. असे कितीतरी अनुभव यात उलगडतात.

लेखिका डॉक्टर आहेत म्हणून त्यांच्यासाठी वेगळा नियम? नाही. त्या स्त्री आहेत ना, मग बुरखा पहिला. म्हणून पहिल्या पगारात त्यांची पहिली खरेदी आहे ती बुरखा. यालाच अबाया म्हणतात. लेखिका नमूद करतात, 'पूर्ण अबाया घातलेली म्हणजेच तालेवाराची लेक–सून रस्ता ओलांडू लागली की धावत्या गाड्या आदाराने थबकून तिला वाट करून देतात.'

'सौदीच्या स्वदेशीसुतांनी नियमांना बगल दिली तरी त्यांना शिक्षा होत नाही. तिथल्या अनागोंदी कारभाराचा भार असह्य होतो तो केवळ परदेशी चाकरमान्यांना.' हे सत्य त्यांना विषम वाटते, हवामानासारखे.

सोन्याचा वर्ख आणि तेलाचा गर्भ असलेले अफाट वाळवंट ही या देशाची संपन्नता. तशी या वाळूत अनेक प्राण्यांची वस्ती. इथले हवामानही विषम. कधी वादळ होईल याचा भरवसा नाही. रणरणीत भाजणारे ऊन आहेच, तर हिवाळ्यात जमिनीवर बर्फाची लादी जमावी अशी थंडी पडते. धुके इतके प्रचंड की जवळचे दृष्टीला पारखे व्हावे. या हवामानाचा अनेकदा अनुभव त्याना आला आहे, जीवघेणा, कायमचा लक्षात राहावा असा.

इथल्या वास्तव्याकडे लेखिकेने अतिशय मोकळ्या मनाने पाहिलेले आहे. दवाखान्यात येणाऱ्या तरुण मुलींच्या अडचणी आणि आजार यातून परिस्थितीचे भान टिपले आहे. आदरातिथ्य, रीतभात यात दिसलेले खानदानीपण कुतूहलाने स्वीकारले आहे. निसर्गाचे वर्णन करताना त्या हरखून जातात. 'जुबैल' शहर पाहताना त्या म्हणतात, 'नैसर्गिक हिरव्यानिळ्याच्या कोंदणात वसलेलं ते लखलखीत रत्न तेव्हाच मनात भरलं.' कार खरेदी करताना लिहितात, 'बघण्याच्या कार्यक्रमात गाडीची चालचलणूक व्यवस्थित आहे ही खात्री पटल्यावर त्याला गाडी पसंत पडली.' यजमानीण माशाचे काटे तिच्या उष्ट्या बोटांनी काढून देऊ लागली तेव्हा लिहितात, 'त्या अन्नदात्या हाताची काळी नखं आठवली की अजूनही वदनि कवळ घेता ढवळते पोट भारी.'

एकूणच भाषेचा डौल फार प्रसन्नपणे सांभाळलेला आहे. सतीश भावसार यांनी सजवलेले मुखपृष्ठही या मनमोकळ्या वर्णनाशी साजेसे झाले आहे. एक वेगळा अनुभव देणारे हे पुस्तक आहे.

- **मूल्य २७५ रु. सवलतीत १६५ रु.**

# ग्रंथपान




'लग्न झाल्यावर नवरा बायकोनं कसं वागावं हे शाळा कॉलेजच्या परीक्षेला का नसावं? याचं उत्तर कोन देईल मला?'

'.. लय वाईट बेकार जीनं. सादली तर शिकार नाईतर भिकार ! पकडल्यावर मायचं दूध आटवतं. आन आमाला का कमी डोकं चालववं लागतं? मस रंगढंग करावं लागत्यात, तवा कुटं एकांदी शिकार सात्ती.'

या भाषेचं वळण आहे दखनी प्रदेशातलं. आपल्या पद्धतीनं ठासून बोलणं. याच भाषेतला हा संग्रह म्हणजे 'भिडू'. लेखकाला त्याच्या शालेय जीवनात भेटलेले, पुढे जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर भेटलेले हे त्याचे भिडू. त्यांच्या कथा. अशा नऊ कथांचा हा संग्रह असून त्याचे लेखक आहेत भगवान इंगळे. भगवान इंगळे यांची आणि आपली भेट यापूर्वीच झालेली आहे, 'ढोर' या त्यांच्या आत्मचरित्रातून. त्याची भाषा ही देखील हीच होती. आताही तीच आहे. लेखक ज्या मातीत घडला, त्याचा गंध आणि गुण कसा सुटणार? रा.रं. बोराडे यांच्या काही कथा याच नाद-तालातल्या आहेत. त्याचा प्रत्यय 'भिडू'मधून येतो. यात आणखी एक विशेष ठळकपणे लक्षात येणारा आहे तो म्हणींचा. पात्रांच्या संवादात येणाऱ्या म्हणी इतक्या सहजपणे आणि तितक्याच चपखलपणे येतात, की आपणही काही क्षण वाचताना थबकून जातो. त्यांची ही पेरणी म्हणजे दाणेदार कणसाला आलेला मोहोर. तो प्रत्येक कथेतून आपल्या भेटीला येतो.

'धनगर बसला जेवाया आन ताकासंग शेवाया.' 'माडच्यावर माड्या बत्तीस माड्या, हात न्हाय पुरत बोंबल भाड्या!'

'नवाल नवटं आन टिरीला कवटं.' 'हिचा हात काय न्हाईना आन काम काय व्हईना.'

'भिडू' म्हणजे ज्याच्या सुखदुःखात समरस होतो; ज्याच्यापासून काही लपवत नाही; जो अंतःकरणाला भिडतो; तो भिडू असा साधारणपणे अर्थ घेतला जातो. परंतु विशिष्ट प्रवृत्तीनुसार व्यक्तीची जीवनशैली बनते. त्याची ठरावीक मानसिकता असते. ती प्रवृत्ती किंवा मानसिकता त्या व्यक्तीचा भिडू हा अर्थ, असे लेखकाला अभिप्रेत आहे. आणि या संग्रहात आलेल्या व्यक्तींचा आलेख उभा राहिलेला दिसतो तो याच अर्थावर. माणसांचं वागणं, बोलणं, त्याची प्रगती, अधोगती, हे सारे अवलंबून ते त्याच्या प्रवृत्ती आणि मानसिकतेवर, याचा प्रत्यय प्रत्येक कथेतून आपणास येत राहतो.

'जय जवान' या कथेतला जयराम, डोक्यानं उजवा, चुणचुणीत. तल्लख बुद्धीचा. जगावेगळं काही करून दाखवयाची धमक बाळगणारा. पण दुष्काळात शिक्षण सुटलं. सैन्यात गेला. एकदम पिळदार, तगडा, लाल गाजरावानी झाला. घर सजलं. गावाचं नाव केलं. त्याच्या शब्दाला किंमत आली. पण घरातल्या, बाहेरच्या माणसांचं वागणं अंगावर येत गेलं. श्रद्धा-अंधश्रद्धा यांच्या कचाट्यात सापडला. सीमेवर शत्रूला गोळीने लोळवणारा जयराम घरच्या शब्दांच्या गोळ्यांनी घायाळ होत गेला. 'घरातल्या खुळचट रीतिरिवाजाच्या शतूसंग झुंजायचं ध्यानी धर' असा बायकोला सल्ला देणारा जयराम बायकोलाच परेड करायला लावू लागला. बिथरल्यासारखा मुलाबाळांशी, घरच्यांशी वागू लागला. शेवटी पोटच्या पोराने त्याच्यावर हात उचलला. आणि जयराम खचला. एक जवान घरातच घायाळ होऊन पडला.

तीच तऱ्हा 'सुकडी बाहत्तरीन'मधल्या सुकडीची. आधीच गरिबी, त्यात दुष्काळात जन्माला आलेली. बाहत्तरच्या दुष्काळी कामावर असलेल्या मजुरांना खाण्यासाठी सरकार सुकडी देई. म्हणून हिचं नाव सुकडी. लग्नाला सतरा विघ्न. आणि झालं तरी विघ्नांचा फेरा कायम. इतरांच्या वागण्याचा फटका तिच्या संसाराला बसतो. तसा स्वतःच्या वागण्याचाही. तीच शेवटी कबूल करते,'माझी मिस्टेक झाली. थोडी कळ काढायची होती. दादाच्या ढेकीनं माहेरी आल्याची केवढी मोठी सजा ही.'

'पळपुटे महाराज' या कथेतला बळीराम गाढवे, याची कथाच भन्नाट. शिक्षणाच्या नावाने पोबारा करणारा बळीराम हा लेखकाचा मित्र. एक दिवस लेखक ज्या विद्यालयात अध्यापन करतो, तिथेच हजर होतो, शिक्षणाणिकारी म्हणून. मात्र मोठेपणाच्या नादात आईच्या जुनेराचा तिरस्कार करतो. आई घर सोडून निघून जाते. तिचा पत्ता लागत नाही. 'तिचे कष्ट होते म्हणून मोठा झालो. पण तिला वाईट बोललो याचं वाईट वाटतं', असा शेवटी पश्चात्ताप करत राहतो.

डागुराचा प्रताप किती आणि कसा प्रतापी आहे, याचे वर्णन मजेशीरच. भामटा राजपूत असलेला हा प्रताप चोऱ्या करताना काय शक्कल लढवावी लागते, याची मजेशीर वर्णनं करतो. प्रा. दाणी, लीलाबाई, गणितज्ञ कवडू, आगलावे जीवन यांच्याही कथा लक्षणीय आहेत. यात येणारे स्वभाव, गावगाडा, परिसर, झालेले बदल लेखकाने बारकाईने टिपलेले आहेत. त्यामुळे हा संग्रह कसदार झाला आहे.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**



# ग्रंथपान




अपत्य जन्माचा आनंद हा एक सोहळाच. सारे कुटुंब आनदांच्या सागरात न्हात राहते. कृतार्थ झाल्याची भावना उचंबळून येते. तसा सोहळा घाडी कुटुंबाच्या भरलेल्या संसारात सुरू झाला, प्रसादच्या जन्माने. या सुदृढ आणि गोंडस प्रसादच्या भोवती भविष्याच्या स्वप्नांचे इमले उभे राहू लागले. आणि त्याचवेळी मेडिकल रिपोर्ट आला, प्रसाद कधीच चालू शकणार नाही. सारेच इमले मृगजळाचे भासले. परंतु आईवडिलांनी धीर सोडला नाही. खंबीरपणे उभे राहायचा निर्धार केला. आणि एक बाळलीलांचा रांगणारा लडिवाळ प्रवास सुरू झाला. या प्रवासाची ही कहाणी, आईच्या काळजातून उतरेली. मायेची, ममतेची, जिव्हाळ्याची, कर्तव्याची आणि कारुण्याची. जी लिहिताना हातच नव्हे तर मनही थरथरले. पेनातून शाई नाही, काळजातला पान्हा उतरला. साकार झाले ते शब्द नाही, ओथंबलेले मातृत्व आहे. पुस्तकावर लेखिकेचे नाव नाही, 'प्रसादची आई' लिहिले आहे, यावरून भावना लक्षात यावी.

''प्रसादला 'स्पायनल मस्क्युलर अॅट्रोपी' नावाचा आजार आहे. म्हणजे मज्जारजूशी संबंधित मासपेशींचा क्षय होणे. या व्याधीत मांसपेशींचा हळूहळू क्षय होत गेल्याने स्नायू क्षीण होत जातात. फुप्फुसांची क्षमता कमीकमी होत जाते. त्यामुळे सर्व हालचाली कमीकमी होत जात शेवटी बंद होतात. या आजारावर कोणताही उपाय नाही. अशा मुलांचं आयुष्य कमी असतं. त्याला देता येईल तेवढा आनंद द्या. सर्व इच्छा पूर्ण करा. त्याला खूश ठेवायचं.'' डॉक्टरांनी भान दिले आणि आईवडिलांनी हे दान स्वीकारले.

प्रसादकडे पचनशक्ती, वाणी आणि बुद्धीचे वरदान होते. त्याच्या जोरावर त्याने दहावीचा सोपान पार केला. तोही ८६ टक्के गुण मिळवून. त्याने गायनाचे सूर अचूक पकडले. शाळेपासून दुबईपर्यंत त्याचा सूर पोचला. त्याच्या ध्वनिमुद्रिका निघाल्या. जीवनातले आनंदाचे रंग त्याने चित्रकलेतून गडद केले. एक चित्र राष्ट्रपतींना भेट दिले. 'राष्ट्रीय बालश्री पुरस्कार' राष्ट्रपती भवनात जाऊन स्वीकारला. महाराष्ट्र शासनाच्या सन्मानाचा तो मानकरी ठरला. आणि जन्मासोबत आलेल्या व्याधीने तिचे मनोरथ पूर्ण करण्यासाठी त्याला परतीच्या प्रवासाला बोलावले, वयाच्या बाविसाव्या वर्षी.

प्रसादला सर्वच बाबतीत दुसऱ्यांची मदत लागायची. तरी त्याची जिद्द कुठेही कमी पडलेली नाही. आई शिक्षिका असूनही प्रसादला शाळेत प्रवेश मिळवणे तिला अवघड गेले. पण सगळेच वाईट नसतात याचा अनुभव आला. खूप चांगली माणसे समाजात आहेत. त्यांनी प्रसादला आपला मानले. प्रोत्साहन दिले. आई वडील यांनी जे जे करता येईल ते सर्व केले. बापाने कायमची रात्रपाळी घेतली. दिवसभर त्याच्यासोबत राहिला. त्याच्या इच्छा पूर्ण केल्या. त्याला आनंदी ठेवला. मनातल्या वेदना मुखावर न येऊ देता.

'माझं दुःख मी खिशात घेऊन फिरत असतो. ते जर मला सोडून गेलं तर कुठेतरी भरकटेन. माझ्यासोबतच राहिलं तर बरं वाटतं.'

'छातीवर हात मारून सांगण्यासारखं जे काही माझ्याकडे आहे ते सगळं प्रसादचं आहे. प्रसादबद्दलचं आहे.' प्रसादचे वडील नागेश घाडी सहकाऱ्यांच्या प्रश्नांना उत्तर देत ती अशी.

पुस्तकात प्रसादचे काही फोटो दिलेले आहेत. त्याने रंगवलेली चित्रे दिलेली आहेत. मुखपृष्ठावरील चित्र प्रसादचे आहे. पुस्तकाच्या शेवटी आईने आपल्या लाडक्या सोनूला लिहिलेलं पत्र आहे. प्रदीप जोशी, दिगंबर चिचकर, सूर्यकांत जाधव, भूषण कुलकर्णी यांनी प्रसाद विषयीच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. तर स्पायना मस्क्युलर अॅट्रोपी – लक्षणे व उपाय या विषयी डॉ. बापुरेकर यांचे टिपण दिलेले आहे. डॉ. स्नेहलता देशमुख यांची प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे.

- **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# ग्रथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

आपल्याला अरुण साधू माहीत आहेत ते कादंबरीकार म्हणून. 'सिंहासन' आणि 'मुंबई दिनांक' यांनी आपल्यावर जी झडप घातलेली आहे, तिच्या खुणा अद्यापही स्मरणात कायम रुतलेल्या आहेत. 'शोधयात्रा' ही आणखी एक भलीथोरली कादंबरी. ती लक्षात राहिली ती तिच्या तंत्रासाठी. पुढे आणखी कादंबऱ्या आल्या, शापित, त्रिशंकू, झिपऱ्या, मुखवटा, तडजोड, विप्लवा, स्फोट आणि बहिष्कृत. तसे त्यांचे कथासंग्रहदेखील प्रकाशित झाले. तेही जवळपास सहा आहेत. त्यातले 'मंत्रजागर' आणि 'ग्लानिर्भवती भारत' ही नावे पटकन आठवतात. त्याचे कारण त्यांच्यातले वेगळेपण. हे वेगळेपण आहे कथानकाचे, आशयाचे, मांडणीचे, दृष्टिकोनाचे, तंत्राचे, आणि शैलीचे देखील. दर्जेदार दिवाळी अंकांतूनही त्यांच्या कथा आपल्या भेटीला नियमितपणे येतातच. त्यांच्या एकूण कथेच्या पसाऱ्यातून निवडलेल्या कथांचा संग्रह प्रकाशित झाला आहे. सांधूच्या साठ कथांपैकी तेरा कथांची निवड या संग्रहात करण्यात आलेली आहे. ही निवड करण्याची आणि संपादनाची अवघड जबाबदारी पेलली आहे मीना गोखले यांनी. अवघड हा शब्द मुद्दाम योजला आहे. त्याची सार्थकता तपासायची तर त्यासाठी त्यांनी लिहिलेली प्रस्तावना वाचायला हवी. प्रत्येक कथा त्यांनी कशी निवडली आहे, पिंजाऱ्याने कापसाचा एकेक तंतू पिंजून काढावा तशी, याचा प्रत्यय या प्रस्तावनेत आल्याशिवाय राहणार नाही. इतकेच नव्हे, तर प्रत्येक कथा वाचत असताना वाचकाने कथेत काय शोधायला हवे याचे उत्तम विवेचन त्यात आढळते. लेखकाला काय अपेक्षित आहे, त्याचे विवेचन करते. कथेकडे पाहण्याची वाचकाची नजर तयार करण्याचेच सूत्र ती जणू उलगडत जाते.




सत्य दडपून मुजोर आणि भ्रष्ट अधिकाऱ्यासमोर प्रामाणिक आणि बुद्धिमान अशोक नेनेला कसे पराभूत व्हावे लागते, याचे अस्वस्थ करणारे चित्रण 'ग्लानिर्भवती भारत'मध्ये आहे. स्वार्थ, दांभिकता, अमानुषता, भ्रष्टाचार आणि कौटुंबिक नाते यांचे दर्शन 'फुलपाखराच्या स्वप्नातील माणूस' या कथेत होते. विश्वासला आठवणारी चिनी तत्त्ववेत्त्याची गोष्ट तर विसरताच येणार नाही. स्वप्नात त्याला आपण फुलपाखरू असल्याचे दिसते. जाग आल्यावर त्याला प्रश्न पडतो, माणूस म्हणून आपण स्वप्नात फुलपाखरू पाहिले, ते वास्तव – की याक्षणी आपण खरे फुलपाखरू असून, त्या फुलपाखराच्या स्वप्नात माणूस म्हणून स्वतःला पाहत आहोत? उच्चभ्रूंच्या गगनचुंबी इमारती, त्यांच्यात राहणाऱ्यांची मानसिकता आणि त्या इमारतीच्या तळाशी अस्तित्वात असलेली झोपडपट्टी आणि तिथल्या मजुरांची मानसिकता यातली प्रचंड तफावत वाचायला मिळते ती 'बेचका आणि आकाशाशी स्पर्धा करणाऱ्या इमारती' या कथेत. गंमत म्हणजे, ज्या मजूर बाईला उघड्यावर एक नंबर करताना एक बाई तिला शिव्या घालते, तीच तशी वेळ स्वतःवर आल्यानंतर वागते. दोघींमध्ये फरक आहे तो गरीब–श्रीमंतीचा. कालिदासाच्या मेघदूताची आठवण करून देणारी कथा 'मान्सूनस्य प्रथम दिवसे', विज्ञानाचे भान देणारी 'वेळ थोडा उरला आहे...' ही कथा, ध्येय आणि निष्ठेची कास धरलेल्या वसंताची कथा असलेली 'वसंत बिरेवारचा एक दिवस', प्रल्हाद पात्रीकर या तरुणाच्या वैचारिक पातळीवर 'त्याच्या प्रखर सामाजिक जाणिवांचे निखारे' अशा विविधांगी कथा या संग्रहात आहेत. एक सूत्र समोर ठेवून त्यांची निवड झालेली दिसते. आणि ते सूत्र आहे युगभानाचे. जे लेखकाला गवसलेले आहे. जे वेगवेगळ्या कथासंग्रहांत विखुरलेले होते. त्यांचा हा संग्रह, 'कथा युगभानाची'.

कथा दीर्घस्वरूपाच्या वाटतात. परंतु त्यांच्यातला आशय मनाला भिडला की वाचताना त्यांच्यातले अंतर लक्षात येत नाही. पात्राशी जवळीक झाल्याने, वाचून संपल्यानंतरही त्या मनात तशाच रेंगाळत राहतात. त्यांच्या भोवतीचे वातावरण आपले वाटू लागते. कथा आताच्या युगाशी नाते सांगणाऱ्या आहेत, त्यामुळे त्यांच्या तोंडी सहजपणे इंग्रजी, हिंदी शब्द येतात. कधी कधी पूर्ण वाक्ये येतात. जशी,'नो मॅडम,आयम् बिईंग व्हेरी चॅरिटेबल. अँड आयम् टॉलरेटिंग यू', ' यू स्टूपिड, कॉवर्ड– यू आर इन्सल्टिंग मी', 'दो घंटे तक भल्लासाबकी मुलाकात हो गयी.' 'खरं? आपके मुहमें शक्कर...' ही वाक्ये परकी वाटत नाहीत. ती पात्राचे व्यक्तिमत्त्व ठळकपणे व्यक्त करतात, त्याला उजाळा देतात. सतीश भावसार यांनी सजवलेले मुखपृष्ठही युगभानाच्या कल्पनेशी जुळणारे आहे.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

सायमन मार्टिन याची भेट झाली ती नाशिकच्या कुसुमाग्रज प्रतिष्ठानमध्ये. त्यांच्याच कवितासंग्रहाचे प्रकाशन होते. त्यामुळे अपेक्षा अशी होती, ते भरभरून बोलतील स्वतःच्या कवितेविषयी. स्वतःच्या पुस्तकाचे जाहीरपणे प्रकाशन होणे ही कवीसाठी आनंदाची पर्वणी. अशावेळी त्याला भरते येणे ही स्वाभाविक प्रतिक्रिया. ती ऐकण्यासाठी कान आतुरले. तसे सायमन बोलले देखील. पॅरिसमध्ये 'चार्ली हेब्दो'वर झालेल्या अतिरेकी हल्ल्याविषयी. मृत पावलेल्या व्यंगचित्रकारांविषयी. नव्हे आपल्याच कुळातले गेले त्यांच्याविषयी. व्याकूळ मनाने. ओथंबलेल्या भावनांनी. कवीची संवेदना, त्याची स्पंदने किती हळुवार असतात, ओल्या जिव्हाळ्याची असतात, याची अनुभूती श्रोत्यांनी घेतली. तिथेच कवीची ताकद लक्षात आली. आणि असा कवी 'थांबवू शकत नाही कविता लिहिणं' असे जाहीर करीत असेल तर त्यात वावगे ते काय? सभोवताल जर असाच क्रूर असेल तर कवीने थांबून कसे चालेल?




*घोर जंगलात हिंस्र श्वापद*
*अंगावर यावं धावून*
*तशी भीती चाल करून येते माझ्यावर.*

याच हिंस्रपणाचे निर्दालन करणे कसे सोपे आहे हे देखील कवी कवितेतून सांगतो,

*एकदा समोरच्या माणसाला*
*देव म्हणून हाक मारा*
*आपल्यातला सैतान मरून जातो.*

सायमन मार्टिनच्या कविता वाचत असताना जाणवते ते त्यांचे निरीक्षण, आंतरिक तगमग, मानवी मूल्यांच्या होत असलेल्या ऱ्हासाबद्दलची चीड, देवाविषयीच्या कल्पना आणि उफाळून येणारा आशावाद .

*पूर्तता भेटीत असते की शोधण्यात?*
*मी कधीच थांबवला नव्हता तुझा शोध*
*म्हणूनच आयुष्य सुंदर झालं.*

वरवर प्रेयसीसाठी ही भावना व्यक्त होताना दिसते. परंतु ती आहे येशूसाठीची. येशूचे अस्तित्व कुठे आहे?

*तलवार ज्यांच्या काळजातून आरपार गेलेली असते*
*त्यांच्याच मांडीवर येशू असतो.*

माणसाच्या वागण्याला धरबंद राहिलेला नाही. त्याच्या काळजातली ओल आटत चालली आहे. तो फक्त स्वतःपुरतेच जग निर्माण करू पाहतो आहे. डेरेदार वृक्षाची कत्तल करून घरात कॅक्टस फुलवतो आहे. अशा माणसाला कवी विचारतो,

*पृथ्वी झाली आहे उजाड*
*कसं रचणार आहे माणूस सरण झाडाशिवाय?*

कवी नुसते प्रश्न निर्माण करून थांबत नाही. त्याला यात बदल घडवून आणायचा आहे. पण तो सहजासहजी होणार नाही याची त्याला कल्पना देखील आहे. म्हणून तो म्हणतो,

*काहीतरी करायला हवं.*
*हिंमत करून आपली राठ झालेली*
*कातडी सोलायला हवी.*
*गरज आहे एका धारदार चाकूची.*

कवितांचा आवाका मोठा आहे. प्रेम, जन्म, मृत्यू, येशू, देऊळ, दगड, झाडी, यांची प्रतिके कवितेत आलेली आहेत. वरवर ती स्वतःशी संवाद साधते आहे असे वाटते. परंतु त्याचवेळी ती आत्ममग्न करते. तिचे प्रवाहीपण आपल्याला अणुरेणूपर्यंत पाझरत जाते. तिच्यातले रुपक आणि प्रतिमा आपल्या कधीकधी चकवाही देतात. तरीही ही कविता आपली प्रत्येकाची वाटते.

रेखाचित्रेही सोबतीला दिलेली आहेत. त्यातून व्यक्त होणारे दृश्यभाव आणि प्रत्येक रेषेच्या तळाशी खोलवर दडून बसलेले संचित कवितेच्या डोहाशी उभे करतात. मुखपृष्ठावरील वेदनेचा सल जिवंत ठेवणारा त्वचेत ठोकलेला खिळा, आपल्याच त्वचेत ठोकला गेला आहे असे जाणवत राहते. सतीश खानविलकर यांची रेखाचित्रे व मुखपृष्ठ कवितांच्या आशयाला उठाव देतात.

- **मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

# ग्रंथपान

भारत, अमेरिका आणि स्कँडिनेव्हिया या तीन देशांवरील लेखांचा समावेश असलेले पुस्तक म्हणजे ‘समाजरंग’. लोकशाहीचा पाया हा या तीनही देशातील समान धागा. अमेरिका सर्वात जुनी आणि धनवान, भारत सर्वात मोठी आणि प्रगतीशील, तर स्कँडिनेव्हिया ही सर्वात लहान आणि आदर्श, असे या देशांच्या लोकशाहीचे वर्गीकरण. परंतु लेखांचा विषय केवळ लोकशाही नाही, तर एकूण सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, प्रशासकीय चढउतारांचाही त्यात समावेश आहे. प्रत्येक क्षेत्रात होत असलेली प्रगती आणि अधोगती, त्यातले सौदर्य आणि कुरूपता, उच्चता आणि विषमता यांचे निरीक्षण म्हणजे हे लेख. प्रदेश वेगळा, भौगोलिक रचना वेगळी, लोकजीवन वेगळे, मूल्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा आणि मानसिकताही वेगळी. या सगळ्यांचा जो दृश्य अनुभव लेखक द्वयीला आला, त्याचे चित्रण वाचकांच्या समोर ठेवणारे लेख म्हणजे ‘समाजरंग’. लेखकद्वय उच्च विद्याभूषित, विविध ज्ञानशाखांचे कलासक्त उपासक. मूळ पिं भारतीय तरी सध्या अमेरिकन नागरिकत्व धारक. उच्च शिक्षण, जागतिक पातळीवरील व्यवसाय आणि परिणामी होणारे देशाटन, हे सर्वच त्यांच्यासाठी ठरलेले वरदान. या वरदानाचा स्पर्श झालेला हा लेखसंग्रह.




सदर लेखांचा एकूण बाज पाहिला तर तर ते प्रवास वर्णन वाटायला हवे. परंतु ते तसे नाही. हे लेख आहेत निरीक्षणावरील, चिंतनावरील आणि अनुभवावरील टिपणे. त्यासाठी लेखकांनी प्रत्येक विषय हाताळताना त्यांचे वेगवेगळे पैलू समोर ठेवले आहेत. उदाहरणार्थ, ‘सध्याचा भारत.’ भारताबद्दल काहीही म्हणता येते. जशी त्याची परिवर्तनशीलता, विरोधाभास, प्रगती, ऱ्हास. तरीही त्यात आढळणारे दहा गुणतत्त्वे आहेत. ती इंग्रजी ‘सी’ या अक्षरात सामावलेली आहेत. त्यांचे मराठी रूप म्हणजे : दळणवळण आणि संवाद, संगणक, बांधकाम, उपभोगशाही, संस्कृती, क्रिकेट, सिनेमा, भोगवाद, भ्रष्टाचार, विषमभाव/ विरोधाभास. यातून भारत कसा दिसतो याचे हे पैलू. मग यावर काही उपाय आहे की नाही? तर लेखक त्याचेही उत्तर होकारार्थी देतात, अकराव्या ‘सी’द्वारे. हा सी आहे, परिवर्तनाचा. सी फॉर चेंज-परिवर्तन. परंतु सावधानतेचा इशाराही देतात, परिवर्तन म्हणजे स्वप्नरंजन नव्हे.

बंगलोर, कोलकाता आणि मुंबई या शहरांवरील लेखांत लेखक नमूद करतात, या तीनही शहरांची मूळ इंग्रजी नावे बदलली म्हणजे संपूर्ण परिवर्तन झाले असे नाही. बंगलोरचे बंगळुरू केले परंतु त्याच शहरात मोठ्या दिमाखात उभ्या राहिलेल्या नव्या इमारतींची नावे पाहा, हाईड पार्क, डॉर्चेस्टर, बेलग्रेव्हिआ. तीच अवस्था कोलकाता व मुंबईची. मग लेखक विचारतात, आपला ज्वलंत अभिमान असा मध्येच दम का सोडतो?

दुसऱ्या भागात अमेरिकेविषयी जाणवलेली, अनुभवलेली मते त्यांनी अतिशय स्पष्टपणे मांडलेली आहेत. जगावर नियंत्रण ठेवू पाहणारी अमेरिका एका बाजूने खरोखर सुंदर आहे. तिचे एक उत्तम उदाहरण म्हणजे विद्यापीठ. जगातल्या सर्वोत्तम पन्नास विद्यापीठांत छत्तीस अमेरिकन आहेत. तर सर्वोत्तम दहापैकी आठ विद्यापीठे अमेरिकन आहेत. परंतु अवास्तव अट्टहासापायी ती आज संभ्रमित अवस्थेला येऊन ठेपली आहे. ‘आज रोख उद्या उधार’ नाही, ‘आज उधार, उद्याही उधार!’ हे वाक्य त्यामुळेच सूचक ठरते.

स्कँडिनेव्हिया हा देश उत्तर ध्रुवाजवळचा. लेखक या देशाच्या वैभवाने, सौंदर्याने भारावून गेले नसते तरच नवल. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर, ‘या देखण्या भूखंडाने आदर, सन्मान, आनंद, संवेदना, शिकवण, आश्चर्य अशा निखळ जाणिवांतून जे जीवन दाखवलं, त्याचा हा आलेख म्हणजे हे लेख.’ त्यांना जाणवलेले सौंदर्य भौगोलिक आहे तसे मानवीदेखील आहे. स्कँडिनेव्हियातले लोक हुबेहूब एका रंगाचे. एकासारखे एक गोरेपान. उंच, बांधेसूद, सोनेरी केसांच्या ब्लाँड मुली बनवण्यात तर त्यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे, असे लेखक नमूद करतात.

एकूणच हे लेख अतिशय रंजक आणि खुमासदार पद्धतीने लिहिलेले आहेत. त्यात विनोद आणि विरोधाभास यांची कलात्मकता उत्तम राखली आहे. नव्हे तीच शैली म्हटले तर वावगे ठरू नये. तीनही देशांची प्रतिके घेऊन मुखपृष्ठ सजवल्याने आतील संदर्भाचा परिचय त्यातून होतो. आपल्याला दिसणाऱ्या दृश्य घटनांकडे वेगळ्या नजरेने पाहता येते याचे भान हे लेख देतात.

सुप्रसिद्ध लेखक अच्युत गोडबोले यांची प्रस्तावना पुस्तकाला लाभली आहे.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

'घोड्याच्या शर्यतीत जिंकण्यासाठी रेसकोर्स मैदानावर घोडे जसे अगदी जीव घेऊन पळतात, त्याप्रमाणे मी माझे आयुष्य आनंदी करण्यासाठी सर्व दुःखे बाजूला सारून माझ्या जीवनप्रवाहात धावत आहे. अशी धावत असताना घोडा मीच झाले. धावण्याच्या वाटाही मीच शोधल्या. माझी स्पर्धकही मीच बनले. घोडेस्वारही मीच झाले. घोडेस्वार होऊन अयोग्य ठिकाणी मीच माझ्या मनाला लगाम घालत गेले अन् खाच-खळग्यांशी सामना करतकरत आयुष्याच्या सेकंदा सेकंदावर टापा टाकतटाकत आज येथपर्यंत येऊन पोचले आहे.'

ही आहे लेखिकेची जगण्याची ऊर्मी. अंतःकरणापासून जगण्यावर प्रेम करण्याची. दुःखाला कवटाळून बसण्याऐवजी जगण्याला सामोरे जाणारी, फुलवणारी. 'जगायचंय... प्रत्येक सेकंद' हे शीर्षकच प्रेरक आणि आकर्षक. जगण्याची उभारी देणारे. कुतूहल जागृत करणारे. यावरूनच लेखिकेच्या लेखनाचा पोत लक्षात यायला हरकत नसावी.




ही कहाणी आहे डॉक्टर झालेल्या यशवंत केवळेची. दिवसभर दोन हात राबले तरी सायंकाळी दोन घास पोटाला मिळतीलच याची शाश्वती नसलेल्या परिस्थितीची. वाटेल ते कष्ट उपसून तिच्यावर मात केलेल्या झुंजीची. झुंजीतही आपलेपण जोपासणाऱ्या नात्यांची. ही कहाणी आहे त्याची सहधर्मचारिणी मंगला केवळेची. ध्यानीमनी नसताना सुखावर कोसळलेल्या आकाशाची. आणि त्याही क्षणातून स्वतःवर मात करण्याची. जगण्याची. जगविण्याची.

यशवंत ग्रामीण भाग आणि गरिबीचा पुत्र. जगण्याची आणि शिक्षणाची कास धरलेला. कुठल्याही कष्टाला मानाने स्वीकारणारा. त्यामुळे बुटपॉलिश करणे, कंगवाफणी विकणे, नाशिकचा चिवडा आणि लोणावळ्याची चिक्की रेल्वेडब्यात विकणे, मिळेल त्या ठिकाणी मिळेल ते काम करणे ही निकडीची गरज. लाज न धरता तिला सामोरा गेला. करता येईल ते सारे केले. पण शिक्षणाचा ध्यास सोडला नाही. त्यात रेल्वेचा अपघात. दवाखान्यात भरती व्हावे लागले. आणि सेवा करणाऱ्या डॉक्टरांना पाहून मनात स्फुल्लिंग फुलले, आपणही डॉक्टर व्हायचे. ध्यास घेतलेल्या माणसाने कष्ट घेतले तर अशक्य काहीच नसते. यशवंत डॉक्टर यशवंत होतो. आपल्याप्रमाणे पत्नी, मुले यांना ध्यासाचा मार्ग शिकवतो. निसर्गाची ओढ लावतो. पर्यटनाच्या आनंदाची ओळख करून देतो. आणि अचानक एक दिवस अपघातात कायमच्या प्रवासाला निघून जातो, जगण्याचा प्रवास अर्ध्यावर सोडून. नीता आणि निनादच्या जबाबदारीत मंगला धैर्याने दुःखाला मागे टाकते. कात टाकल्यासारखी उसळून उठते. यशवंतने दाखवलेल्या मार्गावरून मुलांसोबत प्रत्येक सेकंद भरभरून जगण्याचा प्रयत्न करत राहते. महाराष्ट्र बँकेच्या सावलीत कारकून ते साहेब अशी स्वतःची सावली मोठी करत जाते. अध्यात्म आणि मनशांतीच्या प्रवाहात स्वतःला शांत करत राहते.

संसार आणि सासूसासरे, गरिबी, यात येणारे ताणतणाव, स्वार्थ आणि हक्क यांचे काटे लेखिकेच्या वाट्याला येतात. तरीही त्यांचा बाऊ केलेला नाही. स्वतःच्या परिस्थितीचा स्वीकार करताना आलेल्या अनुभवांना अव्हेरले नाही. त्यामुळेच जगण्यातला आनंद कायम राहिला. हे चरित्र वाचत असताना संगीता धायगुडे यांचे 'घुमान' हे पुस्तक आपोआप आपल्या आठवणीत येऊन उभे राहते. कर्तृत्व आणि ठामपणा अंगी असेल तर परिस्थितीवर मात करणे अवघड नाही, हेच ही चरित्रे दाखवून देतात. प्रस्तुत पुस्तकात लेखिकेने मन उघड करताना स्वतःवर संयमाचे पांघरूण घातले आहे. माणसांच्या वागण्यामागची प्रेरणा शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. वास्तव दाहक असूनही त्यात आपलेपण हरवणार नाही याची काळजी घेतलेली आहे. त्यामुळे आपल्याला जे सांगायचे आहे, त्याचा कणा शाबूत राहिलेला आहे. संवादातला मूळ स्वर आणि लय कायम ठेवल्याने भाषेतला सच्चेपणा चटकन भावतो. त्यात भर घातली आहे ती नीता-निनादच्या मनोगतांनी. शिवाय पुस्तकाच्या सुरुवातीलाच वाचकांच्या अभिप्रायांतील काही सूचक वाक्यांची नोंद प्रमाणपत्रासारखी सजवलेली आहे. मूळातच हाती आलेल्या पुस्तकाची प्रत ही चार आवृत्त्या आणि सात पुनर्मुद्रणानंतरची आहे. त्यामुळे या पुस्तकाला लाभलेला वाचकाश्रय किती आहे याची यावरून कल्पना येते. अनुभवाच्या सच्चेपणाला वाचकांनी दिलेली ही पावतीच नव्हे काय?

- **मूल्य ८० रु. सवलतीत ५० रु.**




# ग्रंथपान

**चांगदेव काळे**
**संपर्क : ९८६९२०७४०३**

'संकल्प' हे संजीव खांडेकरांनी संपादन केलेले पुस्तक वाचनात आले ते बऱ्याच उशिरा. मूळचा प्रकाशनाचा काळ आहे आहे १९८२ सालचा. मी वाचन केले ते २०१४ च्या उत्तरार्धात. मध्ये बराच मोठा बदलाचा प्रवाह काळाचा पुलाखालून वाहून गेला आहे. काही संदर्भ बदलले, काही नव्याने तयार झालेत. लेखनकर्त्यांना पुन्हा आपल्या या लेखनाकडे वळून पाहता येईल. कदाचित त्यांनाच त्या काळच्या परिस्थितीच्या जाणिवा नव्याने अनुभवास येतील. आजच्या वर्तमानाच्या सहाणेवर घासून पाहण्याची संधीही त्यांना मिळू शकेल. परंतु वाचक म्हणून म्हणून मी या लेखांकडे पाहतो तेव्हा जाणवते, वाचनात राहिलेली ही उणीव मोठी आहे. पोकळीचे वास्तव मान्य करायला लावणारी आहे. 'युक्रांद' हे नाव त्याकाळी कानावर होते, त्यांच्या चळवळींच्या बातम्याही वाचनात आलेल्या होत्या. तशा इतरही अनेक अशा संस्था होत्या, ज्यांची कुमार केतकरांनी सविस्तर यादी त्यांच्या लेखात दिलेली आहे. या संस्थांची माहिती कानावर पडत होती. सगळ्याच नव्हे, पण काहींची. पण त्यातली सगळ्यात मोठी उणीव होती ती समजून घेण्याची. संस्था चालवताना घ्यावे लागणारे कष्ट आणि होणारे त्याचे परिणाम हे विषय आहेतच. विषय आहे तो चळवळीत उतरलेल्या युवकांचा. त्यांना त्यावेळी या संस्थांच्या चळवळीविषयी नेमके काय वाटत होते. त्या स्थापन करण्याचा वा त्यात सहभागी होण्याचा ध्यास कसा निर्माण झाला. आणि त्यातून उद्देशाच्या शिखराला हात लागल्याचे समाधान मिळाले का?




संजीव खांडेकर यांनी हाती घेतलेल्या या प्रकल्पाचा संकल्प त्या दृष्टीने मोलाचा वाटतो. त्यांची भूमिका आणि तो पूर्ण करण्यासाठी केलेली दगदग समजून घेण्यासारखी आहे. ध्येय आणि शल्य उरी बाळगणे तसे क्लेशदायकच. जे गवसले त्याचे मोल करता येणार नाही. मात्र त्यासाठी प्रस्तावना शांतपणे वाचणे गरजेचे आहे. लेखांइतक्याच प्रस्तावनादेखील अतंर्मुख करणाऱ्या आहेत.

या संकल्पाचे तीन भाग करण्याात आलेले आहे. पहिल्या भागात मनोगते आहेत. ज्यांची मनोगते यात आलेली आहेत ते सर्वजण चळवळीचे प्रणेते आणि प्राणदाते आहेत. खांडेकांच्या हाकेला प्रतिसाद देणाऱ्या या चळवळकर्त्यांची संख्या आहे सोळा. पहिलेच नाव आहे नरेंद्र दाभोलकरांचे. (आज हयात नाहीत हे सत्य. याला दुर्दैव म्हणायचे तर ते कुणाचे? चळवळीचे की दैवाचे?) आज त्यांच्याविषयीची जनमानसात निर्माण झालेली प्रतिमा आहे ती अंधश्रद्धाविषयी लढा देणारा योद्धा अशी. परंतु त्यांचा या पुस्तकातला लेख वाचला तर त्यांनी त्यावेळी सुरू केलेली चळवळ, आणि त्याद्वारे केलेले कार्य हे त्यापलीकडचे होते असे लक्षात येते.

दुसरे उदाहरण घ्यायचे तर कुमार सप्तर्षी यांचे घेता येईल. आजकाल अनेकदा त्यांचे दर्शन दूरदर्शनवरील काही कार्यक्रमांतून होताना दिसते. परंतु खरा कुमार समजून घ्यायचा तर त्याचा लेख आवर्जून वाचायला हवा. कुमारने सुरू केलेले 'युक्रांद' आणि त्यांची स्वतःची जडणघडण हा काळ १९७७ पर्यंतचा आहे. ध्येयवादाच्या त्याकाळात त्यांना भेटलेली प्रेरक आणि मार्गदर्शक मंडळी आणि घडत गेलेल्या घटना, यांनी त्यांच्यावर कसा परिणाम केला, हे तपशील कार्यकर्त्याचे साधन, साधना आणि साध्य यांचा संघर्ष उलगणारे आहेत.

रझिया पटेल, वाहरू सोनवणे, नीलम गोऱ्हे, पार्थ पोळके, प्रेरणा राणे, दीनानाथ मानेहर, विश्वास काकडे, शारदा साठे, जगदीश गोडबोले, सुभाष जोशी, प्रतिभा जोशी, प्रवीण वाघ, सुनील तांबे, सुहास परांजपे यांच्या मनाचा तळ त्यांच्या लेखांमधून उघड झालेला आहे. प्रत्येकाची सांगण्याची, व्यक्त होण्याची पद्धती वेगवेगळी आहे, तरी सूत्र तेच आहे.

दुसरा भास आहे 'निरीक्षणे.' यात वसंत पळशीकर, अविनाश सप्रे, म.द. हातकणंगलेकर, लक्ष्मण माने आणि कुमार केतकर यांनी या कालखंडाविषयी आपली निरीक्षणे नोंदविलेली आहेत. कुमार केतकरांचा बाज आपणा सगळ्यांना ठाऊक आहेच. त्यांनी केवळ सामाजिक चळवळीविषयी निरीक्षणे नोंदवलेली आहेत असे नाही. साहित्य, संस्कृती, कामगार, राजकारण अशा सगळ्याच क्षेत्रांतल्या बदलाबाबत; तिन्ही काळांचा संदर्भ ठेवून त्यांनी मते मांडलेली आहेत. तीही अतिशय परखडपणे आणि तितकीच सूक्ष्मपणे. त्यांच्या काळाचे वर्णन करताना ते लिहितात, 'या चळवळी आपल्या एकांड्या वैभवात तळपत आहेत. पण त्यांची अवस्था खुंटलेल्या वाटांसारखी झाली आहे, आणि ते अपरिहार्य आहे.'

शेवटच्या भागात मधुकरराव देवल यांची मुलाखत दिलेली आहे. आणि खांडेकरांची 'लाकूडतोड्याची गोष्ट' ही कविता आहे. खूप दिवसांनी एक चांगले पुस्तक वाचल्याचा आनंद मिळाला.

- **मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

## निशाणी डावा अंगठा

रमेश इंगळे-उत्रादकर




गावोगावी प्रौढसाक्षरतावर्ग चालवावेत, 'निशाणी डावा अंगठा' ही खूण पुसली जावी, त्यासाठी जे प्रयत्न केले जातात त्याचे नाव आहे 'साक्षरता अभियान.' हेतू उदात्त आहे. काम ही सोपे. प्रत्येक गावातून पंधरा ते पस्तीस वयोगटातील निरक्षरांचा शोध घेऊन याद्या तयार करणे. दहा निरक्षरांचा एक वर्ग करणे. त्यावर स्वयंसेवक नेमून हे कार्य चालवणे. त्यासाठी त्यांना प्रशिक्षण आणि साहित्य उपलब्ध करून देणे. या कार्यावर देखरेख करण्यासाठी प्रत्येक केंद्रावर एक पूर्णवेळ कार्यकर्ता, शिक्षक असलेला. त्याचे काम म्हणजे साक्षरतावर्गांना रात्री भेटी देणे. सात ते दहापर्यंत. बस्स, तीन घंटे काम. गावात साक्षरतावर्ग चालतील. गाव साक्षर होईल. 'डावा अंगठा' ही निशाणी पुसली जाईल. किती सोपं! प्रश्न आहे तो, त्याप्रमाणे हेतू साध्य होतो का?

या अभियानात सहभागी झालेला पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणजे रंगनाथ भास्कर डुकरे. दिवसभर मास्तरकी करण्यापेक्षा हे काम उत्तम. तो या अभियानात उडी घेतो, मोठ्या उत्साहाने. पुन्हा प्रश्न उपस्थित होतो, त्याचा हा उत्साह शेवटपर्यंत टिकतो तो कसा? आणि अभियानाची सांगता होते ती कशी?

साक्षरता अभियान हा आपल्या सगळ्यांना नक्कीच ठाऊक असणारा विषय. त्यातून तो शासकीय उपक्रमाचा एक भाग. त्याच्या यशस्वितेबाबत मनात काही शंका आली तर नवल वाटायला नकोच. परंतु ही कादंबरी केवळ त्या अभियानाचे चित्रण करते असे नाही. त्यानिमित्ताने शाळा आणि त्यात सहभागी झालेले शिक्षक, समन्वयक, संबंधित अधिकारी, गाव, गावकरी, गावचे पुढारी, पंच, सरपंच यांचेही चित्रण करते. यात आलेल्या पात्रांची संख्या बरीच मोठी आहे. त्या प्रत्येकाची स्वभाववैशिष्ट्ये, वागण्याची रीत, बोलण्याची ढब, लय, तिच्यातला तिरकसपणा, उपहास, प्रत्येक घटनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन या सगळ्यांना तिने आपल्या कवेत घेतले आहे.

भाषेचा बाज हा बुलडाणा-अमरावतीकडचा. त्यामुळे तिच्यातली लय आपली छाप घेऊन आलेली आहे. मनुष्यस्वभाव किती प्रकारचे असू शकतात, आणि एकाच प्रसंगावर प्रत्येकजण कसा वेगवेगळा कृती करू शकतो, याचा प्रत्यय प्रत्येक प्रसंगातून येतो. संवाद ही तर मोठीच जमेची बाजू. सहजपणा, उपहास, उपरोध, मिश्किलपणा, हे अचूक घाव घालणारे गुण. तर काही प्रसंगी इरसालपणा, मुळात दडलेला आणि प्रसंगी उफाळून वर येणारे अस्सल शीवराळ काटे संवादाची कनात घट्ट ठोकून उभी करतात. त्यातून घटनेतील वास्तवतेचा दाहक किंवा सौम्य प्रकार तर उघड होतोच, पण विनोदाची झालरही डौलाने फडकताना दिसते. हे गुण अंगभूत असल्याने त्यात कुठे कृत्रिमपणा वा भडकपणा जाणवत नाही. जसे,

'आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन हा काही जयंती नाही की पुण्यतिथी नाही, की कुणाचा फोटो काढावं. पुसावं. हार करावं. निरक्षराहीले हार घातले असते तं होतं बुवा.'

'पर्यटन शब्दाचा अर्थ तं याले डिक्शनरीत सापडला तरी समजणार नाही. मी तं म्हणतो पोराहीसंगं सहलीत होतं तेवढंच याचं पर्यटन. मले तं खात्री हाये, की त्यानं अजून आगगाडीबी बरोबर पाह्यली नसंन. बसणं तर दूरच.'

'अक्षराची संगत - जीवनात रंगत.' असा अक्षराफिक्क्षेरानं कुठं जीवनात रंग येतो का? ते पूस अन् लिव्ह 'बाटलीची संगत- जीवनात रंगत.'

रंभा डुकरेसोबत भाऊ राठोड, नामदेव, जुबड, जावई असे शिक्षक आहेत. तशा काळबोधबाई, बोगदेबाई, केप्राबाई यांसारख्या शिक्षिका आहेत. कमरुद्दीन काझी नावाचा साहेब आहे. या प्रत्येकाचा कस अभियान राबवताना कसा लागला, याचे वर्णन वाचताना छान मनोरंजन होते. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे लबाडीला बक्षीस जाहीर होते तेव्हा लेखक नमूद करतात, 'बातमी वाचून-ऐकून कुणालाही म्हणजे अगदी एकालासुद्धा वाईट वाटलं नाही. दुःख झालं नाही. '

ही कादंबरी लेखनाचा वेगळा बाज घेऊन आली आहे. ती वाचत असताना 'कोसला'ची आठवण होते. निवेदन आणि स्वगत अशा दोन्ही पातळ्यांवर ती पुढे जात राहते. तिचे प्रवाहीपण वाचनाचा आनंद देत जाते.

उदय पटवर्धन यांनी मुखपृष्ठावरील दाखवलेला 'अंगठा' हा अभियानाला मिळाललेल्या यशस्वितेचे प्रगतीपत्र म्हणून तर दाखवलेला नाही ना, अशी शंका यावी, इतका चपखलपणे वापरला आहे.

- **मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

मागे एकदा म्हैसूरला गेलो होतो. तिथे पॅलेसमध्ये एका चित्राने मनाला भुरळ घातली. हातात दिवा धरलेली युवती. दिव्याच्या ज्योतीला वारा लागू नये म्हणून तिने हाताने धरलेला आडोसा. दिव्याची प्रभा त्या युवतीच्या चेहऱ्यावर पसरलेली. शिवाय छातीजवळचा भाग उजळून निघालेला. परंतु जास्त लक्षात येत होते ते तिच्या बोटांच्या पाकळ्यांमधून पाझरणारा प्रकाश. बराचवेळ ते चित्र पाहात राहिलो. आकाराने ते मोठेही होते. त्याचप्रकारचे आणखी एक चित्र हैदराबादच्या सलारजंग म्युझियममध्ये पाहिले. पण त्याचा निर्माता कोण इकडे त्यावेळी लक्ष गेले नाही. पुढे हे चित्र सा. ल. हळदणकरांचे आहे असे कळले. पण हळदणकर कोण हे काही माहीत नव्हते. ते माहीत झाले 'बॉम्बे स्कूल आठवणीतले, अनुभवातले' या पुस्तकामुळे. नुसते माहीत झाले नाही तर, हळदणकरांची अशा तऱ्हेची दोन चित्रे आहेत– 'ग्लो ऑफ होप' आणि ' निरांजनी' – ती पाहण्याची संधी मिळाली. चित्रकाराविषयीची माहितीही वाचायला मिळाली. आणि पुन्हा म्हैसूर व सलारजंग म्युझियममधील स्मृती ताज्या झाल्या.




सुहास बहुळकर यांचे हे मोठ्या आकाराचे पुस्तक. पुस्तकरूपाने त्यांची भेट प्रथमच होत आहे. परंतु दिवाळी अंकांतून यापूर्वी त्यांची भेट झाली आहे. एशियाटिक सोसायटीत दुर्गाबाई भागवतांचे पोट्रेट लावण्यात आले. ते त्यांनीच साकारलेले होते. त्या कार्यक्रमात बहुळकरांना प्रथम पाहण्याची, ऐकण्याची संधी मिळाली. या पोट्रेटसाठी किती आणि कशी मेहनत घ्यावी लागली ते ऐकले. महाराष्ट्र टाइम्समध्ये त्यांचा त्यासंबधाने विस्तृत लेखही वाचनात आला होता. तेव्हापासून बहुळकरांविषयी एक कुतूहल वाटू लागले होते. ते कुतूहल या पुस्तक प्रकाशनाच्या दिवशी बऱ्यापैकी शांत झाले. कारण या दिवशी त्यांच्याशी बोलण्याची संधी मिळाली होती.

सुहास बहुळकर हे उत्तम चित्रकार आहेत, परंतु त्यांनी आतापर्यंत लेखन केले ते इतर चित्रकार आणि त्यांची चित्रे यावर, स्वतःला वगळून. या पुस्तकात हळदणकर, ज.द. गोंधळेकर, प्रा. बी.एन. सुखडवाला, शंकर पळशीकर, ग.ना. जाधव, नागेश साबण्णवर, बाबुराव सडवेलकर, डॉ. भय्यासाहेब ओंकार, संभाजी कदम, प्रफुल्ला डहाणूकर, मुकुंद केळकर अशा मोठमोठ्या चित्रकारांविषयी त्यांनी लिहिले आहे. त्याच्या चित्रांविषयी लिहिले आहे. चित्र काढण्याच्या पद्धती, लकब, कसब या विषयी लिहिले आहे. त्यांचा कालखंड, त्यांचा दृष्टिकोन, त्यांचे शिकवणे, त्यांचे वैयक्तिक वागणे असे सारेच यात आले आहे. महत्त्वाचे म्हणजे यात पुढे स्वतः बहुळकरही सहभागी झालेले आहेत. बहुळकर स्वतः बॉम्बे स्कूलच्या परंपरेतून आलेले, तिचे ऋण मानणारे, अभ्यासक आणि कलासंवर्धक आहेत. त्यामुळे त्यांचे हे पुस्तक अनुभव आणि आठवणीतले म्हटले आहे ते या अर्थाने.

आता 'जे जे स्कूल ऑफ आर्ट' म्हणून आपण ज्या संस्थेला ओळखतो तिची कलापरंपरा आहे ती बॉम्बे स्कूलची. जिची स्थापना झाली २ मार्च १८५७ रोजी. बॉम्बे स्कूल ही संज्ञा मुख्यतः मुंबईच्या सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये ब्रिटिश चित्रकलेच्या परंपरेतून आलेले यथार्थवादी चित्रण आणि त्यात प्रावीण्य प्राप्त केलेल्या चित्रकारांच्या संदर्भात वापरली जाते. बेंगाल स्कूल , बडोदा स्कूल याप्रमाणे बॉम्बे स्कूल. प्रमुखपदी आलेल्या ब्रिटिश आणि भारतीय चित्रकारांची मोठी परंपरा असलेल्या या स्कूलमध्ये प्रत्येकाने आपली छाप निर्माण केलेली आहे. सेसिल बर्न, कॅ. ग्लॅडस्टन सालोमन, चार्ल्स जेरार्ड, व्ही. एस. अडूरकर, जे.डी. गोंधळेकर ही त्यांची नावे. कॅ. सालोमन यांनी सुरू केलेला 'न्यूड स्टडीज'चा अभ्यास, व पुढे 'इंडियन डेकोरेटिव्ह पेंटिंग'चा स्वतंत्र वर्ग. यांना बॉम्बे रिव्हायव्हलिस्ट चळवळीचे प्रणेते मानले गेले. पुढे इतर डायरेक्टरांनी निर्माण केलेली परंपरा, त्याच काळात असलेले प्राध्यापक आणि नंतर आलेले प्राध्यापक, ज्यांची नावे वर आली आहेत. त्यांचा काळ, त्यांची हातोटी, वैशिष्ट्ये, स्वभाव, केलेले संस्कार या सगळ्यांचा सखोल शोध घेतलेला आहे. बारकाव्यांसहित त्यांचे वर्णन केलेले आहे. मग ती गोंधळेकरांची सिगारेट ओढण्याची लकब असो की, पळशीकरांची निवृत्तीच्या निमित्ताने निर्माण झालेली उदासीनता असो.

बहुळकर नुसतेच संस्थेचा इतिहास वा माहिती देत नाहीत, तर अनेक प्रसंगही आपल्यासमोर ठेवतात. अनावृत्त स्त्री मॉडेल अचानक समोर हजर झालेली पाहून गर्भगळित झालेला जगू शहा या विद्यार्थ्याचा प्रसंग, पळशीकर अग्निकुंडाला एकेक चित्र समर्पण करत असताना आठवलेली गुणाढ्य ऋषीची कथा, साबण्णवरसरांचे वापरत असलेल्या हत्याराशी असलेले नाते, आणि नैनिताल स्टडी टूरच्या वेळी याच सरांनी शिस्तीच्या निमित्ताने रेल्वे डब्यात मुलामुलींची केलेली विभागणी... असे कितीतरी प्रसंग यात मजेशीरपणे सादर केलेले आहेत. सगळ्यात उत्तम समन्वय साधला आहे तो चित्रांनी. प्रत्येक चित्रकाराची चित्रे आणि त्यांची स्वतःची पोट्रेट्स या पुस्तकात सोबत छापलेली आहेत. पेन इंक, जलरंग, तैलरंग, पेन्सिल यात चितारलेली. त्यात काही रंगीत आहेत. ही चित्रे पाहणे हीच मोठी मेजवानी वाचकासाठी ठरली आहे. 'दृश्यकला'कोश तयार करण्यात बहुळकरांचा मोठा वाटा आहे. परंतु प्रस्तुतचे पुस्तक हे त्याच्याच परंपरेतले समजायला हरकत नाही. विशेष म्हणजे, बहुळकर स्वतः चित्रकार असूनही त्यांच्या पुस्तकाचे मुखपृष्ठ सजवले ते सतीश भावसार यांनी. तर त्यांच्या पुस्तकाचे उत्तम संपादन केले आहे दीपक घारे यांनी.

- **मूल्य ६०० रु. सवलतीत ४०० रु.**

# ग्रंथपान

कवी किशोर पाठक यांचा प्रकाशित झालेला हा नवा कवितासंग्रह. बरोबर शंभर कविता असलेला. प्रत्येक कवितेत एकेक अनुभव वेचून काढलेला. एकेका अनुभवाचे पदर अलगद बाजूला करून त्यातला अर्काचा पुंकेसर शोधून काढलेला, फुलासारखा. असा हा कवितांचा संग्रह. कवीच्या अगोदरच्या पाच कवितासंग्रहांची चढती कमान कायम ठेवणारा. नावातले अनोखेपण जपणारा. 'आभाळाचा अनुस्वर', 'मी मृगजळ पेरीत', 'पालव', 'संम्भवा' आणि 'निरूपण' याप्रमाणेच शीर्षक असलेला 'काळा तुकतुकीत उजेड'.




शीर्षकाच्या धुक्यातून वाचक डोळे किलकिले करून अंदाज घेईल तेव्हा त्याची शंका या उजेड आणि काळोखाशीच विसावण्याची शक्यता जास्त. पण कुठलाही संग्रह पूर्ण वाचल्याशिवाय असे अनुमान काढणे योग्य नाही. त्यामुळे स्वतःचीच फसगत होण्याची शक्यता असते, याचे भान हा कवितासंग्रह जागे करतो. या शीर्षकाच्या ओळी असलेल्या पृ. क्र. ९७ वरील कवितेत कवी प्रकाशाची ग्वाही देतो,

माझ्या लेखणीतून उगवतो ना शुभ्र काळोख
आणि काळा तुकतुकीत उजेड.

हा संपूर्ण संग्रह व्यवस्थित मांडणीत सजवलेला आहे. एकेक मजला चढत उंच इमारतीत शिरावे तशी ही मांडणी आहे. भावभावनांची आदोलने सुरुवातीच्या कवितांमधून आपल्याला जाणवत राहतात. कवी आपल्या कोषात गुरफटलेल्या सहचराला उपदेश करतो,

सोड तू निळ्या शांततेचा एखादा ढग समजावणीचा
आणि पुसून टाक काळेकभिन्न ढगांचे डाग पावसाच्या धारांनी.

रडणे हा काही अपूर्वाईचा ऐवज नाही. परंतु जन्माला येणाऱ्या लहान बाळाच्या रडण्याची प्रत्येकजण किती आतुरतेने वाट पाहत असतो. ते रडले की माणसे कशी आनंदीत होतात हे पृ.क्र.२० वरील कवितेत वाचायला मिळते. साचेबंद जगणे आणि स्वैर जगणे याबाबत कवीची भूमिका आहे संयमाची.

जगण्याचा कासरा ढिला सोडला तर आयुष्य वाऱ्यावर उधळायचे
त्यापेक्षा कासरा थोडा आवळून धरावा.

बाईपणाच्या कवितांचा एक टप्पा आपल्याला रोखून ठेवतो. काही क्षणासाठी पत्नी आणि अनंत काळाची माता असे हे बाईचे रूप. तरी ती अनंत काळ संसाराच्या खुराड्यात पत्नीपणाचा कारावास भोगत असते. आणि त्याचवेळी प्रेयसी असण्याचा काळही जपत असते अनंतकाळासाठी. बाई असणे हेच तिचे शस्त्र असते. गलितगात्र झालेल्या पुरुषाच्या हाती तीच ते शस्त्र सोपवते, पुन्हा विजयासाठी. संसारासाठी तीच दुपारची चुंबळ करून सूर्याला कळशीत भरून भराभरा चालत राहते. ती नवऱ्याला विचारते,

मी भांगात कुंकू भरले नाही तुझ्यासाठी
मळवट भरलाय सती जाण्यासाठी
तू चिता होशील ना?

कवी कवितेची अनेक रूपे उलगडून दाखवतो. कविता कवीसाठी फूल होते, वही होते, खळाळ नदी होते, स्वयंपाकाची चूल होते, स्त्री होते, जगण्याचा एक थेंब होते. कविता जगवते आपल्याला ह्या दुधखुळ्या कल्पनांवर, असे म्हणताना कवी कवितेलाच आवाहन करतो,

कविते पुरून टाक मला तुझ्या मातीत
गाडून टाक न सापडण्याइतका.

या संग्रहात माणसाच्या कविता आहेत. माणूसपणाच्या कविता आहेत. उजेड-काळोखाच्या सावल्या आहेत. बुबुळांना दिसणारे जग आहे. ते सुद्धा कवीला वेगवेगळे भासते, 'बुबुळांच्या आड लपलेला अंधार', 'अंधाराच्या बुबुळांनी वाचत राहतो प्रकाश', ' लुकलुकत्या बुबुळांचे अथांग आभाळ'. असाच 'भण्ण' हा शब्द. तो अनेक संदर्भ घेऊन येतो.'भण्ण प्रवास, भण्ण मस्तक, भण्ण डोके, भण्ण योगिनी'.

मुखपृष्ठ रविमुकुल आणि संग्रहाची सजावट श्रीधर अंभोरे यांनी केली आहे. कवितेला अनुसरून रेखाचित्रे रेखाटलेली आहेत. कविता अनेक अंगांनी फुललेली असली तरी तिचा आकृतिबंध लहान आहे. शिवाय कवितांना शीर्षक नाही. त्यामुळे संपूर्ण कविता एकच असून ती तुकड्यातुकड्यात अनुभवाच्या अंगाने साकारलेली आहे असे वाटत राहते.

- **मूल्य १२० रु. सवलतीत ७० रु.**

# ग्रंथपान

चांगदेव काळे
संपर्क : ९८६९२०७४०३




'यापुढील माझा प्रत्येक श्वास व रक्ताचा प्रत्येक थेंब केवळ माझ्या मातृभूमीसाठी असेल. असं करताना तुमचा मुलगा म्हणून जर मी माझं कर्तव्य पार पाडू शकलो नाही तर मला क्षमा करा.'

'एकदा वर्दी घातल्यावर मेडल मिळायलाच हवं. जिवंतपणी मिळालं तर उत्तमच, पण ते नाही मिळालं तर मरणोत्तर तरी... असं झालं तर तू जाशील ना मेडल घ्यायला?'

'एखाद्याला गोळी लागली की ती काढल्यानंतर त्यालाच दिली जाते. आठवण म्हणून ठेवण्यासाठी.'

'एकदा तरी पाकला जबरदस्त धडा शिकवण्याची संधी मिळायला हवी. थेट लाहोर – कराचीपर्यंत धडक.'

सैन्यात दाखल झालेल्या सुपुत्रांच्या कल्पना किती उदात्त असतात! मातृभूमीसाठी प्राण तळहातावर घेणारे हे वीर आपल्या बोलांनी मातेच्या काळजाची जणू परीक्षाच पाहतात. परंतु तेव्हा आईला काय वाटत असेल? अभिमानाने त्याचे बोल काळजाच्या कुपीत जपून ठेवावेसे वाटत असतीलच. परंतु त्याचे मेडल घेण्यासाठी आपण...? ही कल्पना ती कशी सहन करील? परंतु वास्तव नाकारता येत नाही. अशाच वास्तवाला सामोरी गेलेली वीरमाता आपल्या वीरपुत्राची गाथा सांगते आहे. सोबतीला अनेक असे वीरपुत्र आहेत, त्यांची गाथा ती आपल्या सुपुत्राइतकीच आपली मानते. 'वारस होऊ अभिमन्यूचे' ही ती गाथा. आणि ती वीरमाता आहे, अनुराधा गोरे. कॅप्टन विनायक गोरेची माता.

विनय सीडीएस परीक्षा देऊन, तिच्या सर्व कसोट्यांतून उत्तीर्ण झाला आणि कॅप्टन म्हणून दिलेल्या पोस्टिंगवर हजर झाला. तो उत्तम खेळाडू होता. शरीर कमावलेले होते. उमदा तरुण मातृभूमीच्या सेवेसाठी रुजू झाला. आवडीने. अभिमानाने. जिद्दीने. ध्येयाने. ते साल होते १९९१. आणि वीरमरण आले. १९९५ ला. विनयसारखे अनेक सुपुत्र आहेत. कीर्तीचक्र सन्मानप्राप्त कॅप्टन आर. सुब्रह्मण्यन, कीर्तीचक्र सन्मानप्राप्त मेजर मनीष पितांबरे, कीर्तीचक्र सन्मानप्राप्त लेफ्टनंट कर्नल मनीष कदम, कॅप्टन लिमये, फ्लाईट लेफ्टनंट अभिजीत गाडगीळ, लेफ्टनंट सचिन मिरजकर, स्क्वॉड्रन लीडर फरहद सिद्दीकी, मंदार खांबेटे, नीलेश सावंत. या सगळ्यांची यशोगाथा या पुस्तकात वर्णन करण्यात आलेली आहे. या सुपुत्रांचा ध्यास, ध्येय, जिद्द, अभिमान, त्यांची जडणघडण, त्यांचे कुटुंब, कुटुंबांची अवस्था आणि इच्छाआकांक्षा असा सर्वांगीण वेध घेताना त्यांच्यातल्या माणूसपणाचाही वेध लेखिकेने घेतलेला आहे. ही संपूर्ण माहिती त्यांनी एका तळमळीने आणि जिद्दीने मिळवलेली आहे. आलेल्या प्रसंगाने कोलमडून न पडता यातून इतरांना प्रेरणा मिळावी हा यापाठचा त्यांचा हेतू आहे.

वीरमरण प्राप्त झालेल्या या सुपुत्रांच्या यशोगाथा वाचताना कधीकधी अभिमान तर वाटतोच. परंतु काहीवेळेस मन सुन्न होते. यापाठी असणारी पार्श्वभूमी ही काश्मीरमधील दहशतवादाची आहे. माथेफिरू तरुणांच्या कारवाया हा सगळ्यात मोठा रोग या व्यवस्थेला लागला आहे. पाकपुरस्कृत या रोगापायी अनेक सैनिकांना त्यांचे प्राण गमवावे लागत आहेत. आणि आपली भूमिका मात्र कायम बोटचेपी राहिली आहे. तीच परिस्थिती सैन्यात वापरण्यात येणाऱ्या विमान- हेलिकॉप्टरची. त्यांच्या अपघातात अशा सुपुत्रांना प्राण गमवावे लागणे व्यवस्थेला कमीपणा आणणारे ठरते. या गाथेतील बहुतेक सुपुत्रांना आलेले वीरमरण दहशतवादी आणि विमान-हेलिकॉप्टर अपघातांमुळे प्राप्त झालेले आहे.

लेखिका या वीरमाता आहेत. त्यांच्या त्यागाची तुलना कशाशीही होऊ शकत नाही. तसेच नुसत्या सांत्वनाने वा आर्थिक मदतीने त्यांच्या जखमा भरून येणाऱ्या नाहीत. तरीही त्या धैर्याने उभ्या आहेत. आपल्या परीने जागृतीचे अभियान चालवत आहेत. आणि तळमळीतून काही सुचवू पाहत आहेत,

प्रत्येक राज्यात वॉर मेमोरियल हवे.

वीरमरण आलेल्या सुपुत्रांच्या त्या त्या गावातील/शहरातील शहिदांचे सतत स्मरण राहील हे पाहायला हवं

भारतीय स्वातंत्र्यलढा जसा शाळेत शिकवला जातो तसेच स्वातंत्र्योत्तर संघर्षही शिकवायला हवेत.

केवळ मार्क-परीक्षा यामध्ये मुलांना न गुंतवता शौर्य, पराक्रम, धाडस, नेतृत्वगुण कसे वृद्धिंगत करता येतील हे पाहायला हवे.

हा विषय केवळ वैयक्तिक पातळीवरचा, तात्कालिक स्वरूपाचा म्हणून उदासीनपणे त्याकडे न पाहता प्रत्येकाने विचारपूर्वक पाहावे ही लेखिकेची तळमळ समजून घ्यायला हवी.

मनोज आचार्य यांचे मुखपृष्ठ उत्तम आहे.

- **मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**




# ग्रंथपान




डॉ. यशवंत पाठक हे आपणास ठाऊक आहेत ते वक्ते म्हणून, संतसाहित्याचे अभ्यासक म्हणून, कीर्तनपरंपरेचे वारसदार म्हणून. एकदा बोलायला उभे राहिले की श्रोत्यांनी तल्लीनतेत स्वभान विसरून जावे, अमोघ रसाळ वाणीने अंतरंग न्हाऊन निघावे, गंगास्नान झाल्यासारखे. हा अनुभव अनेकांनी अनेकदा घेतला आहे. तीच त्यांच्या लेखनाची तऱ्हा. आतापर्यंत जवळपास पंचवीसच्या वर त्यांची ग्रंथसंपदा प्रकाशित झालेली आहे. भाषेतला प्रासादिकपणा मनाला प्रसन्न करत जातो, मंदिरातल्या घंटानादासारखा. विषयातला बोध अबोध मनाला हळुवारपणे फुलवत जातो, कळीने वाऱ्याच्या सहवासात उमलत जावे तसा. त्यातले भाष्य नाविन्याची अनुभूती देते, अर्थाच्या तळाशी जाण्याची पाऊलवाट शोधून देते. वाचक चालत राहतो, तिमिराचे रान एका नव्याच उमेदीने. हा अनुभव त्यांच्या साहित्याने आपणास दिलेला आहे. तोच अनुभव त्यांनी आपल्यासमोर ठेवला आहे,' संचिताची कोजागिरी' या पुस्तकातून.

या पुस्तकात तीन कादंबऱ्या आहेत. 'फांदीतले गाणे', 'झांजेतला चंद्र', 'अश्वत्थाची वसती' ही त्यांची नावे. या तिघींना एकत्रित गुंफण्यामुळे झाली कादंबरी–त्रिवेणी. वरवर या तीन वेगवेगळ्या कादंबऱ्या दिसत असल्या तरी त्यांच्यातले सूत्र एकच आहे. त्याविषयी लेखक त्यांच्या मनोगतात लिहितात, 'जगण्यात संचितांना वेगळे महत्त्व असते. माना अथवा न माना, ते तुमच्या अखिल भागधेयात कार्यरत असते. माणसाच्या वाढत्या वयापेक्षा जाणिवा वेगळ्या असतात. त्या वेगळ्या परीने येतात–जातात. यातून व्यक्तित्वे घडतात नि घटतात. या कादंबऱ्यामध्ये हे दाखवले आहे. जगताना आपण ठरवलेले जे काही असते, ते आपले नसते. तरीही ते वेगळेच असते. तरीही एकूण समज ध्यानात येत नाही. म्हणून 'संचिताची कोजागिरी'चा भावार्थ लक्षात घ्यावा लागतो. तेव्हा वाचनाचा आनंद हाही एक विलक्षण अनुभव ठरतो.'

ज्ञानेश्वरीच्या पंधराव्या अध्यायातील सत्त्व, रज आणि तम या त्रिगुणांचे वर्णन आहे. त्यांचा मिळून होतो 'अश्वत्थ'. याभोवती आबा, राम आणि वृंदा यांची गुंफण आहे. जुन्याचा ध्यास आणि नव्याचा हव्यास यांच्यातली तडजोड यात आहे. अक्काचे जगणे आणि त्यातून वर्तमानाचा नवा संदर्भ 'झांजेतला चंद्र'मध्ये सापडतो. सगळ्यांपासून संन्यास घेणे म्हणजे काय? ते अवलंबून असते, बाह्यरंग आणि अंतरंग अशा दोन स्तरांवर. या द्वंद्वात त्याची शुद्धता हा विषय महत्त्वाचा. तसा 'आत्मश्राद्ध' हा एक प्रयोग. 'फांदीतले गाणे' या कादंबरीत अण्णा ही प्रमुख व्यक्तिरेखा. मनाने निश्चयी, वागण्यात खंबीर. आपल्या वृत्तीच्या परिघात वावरणारे. आक्का, सुमी, निषाद हे त्यांच्याभोवती वावरणारे ग्रह. म्हटल्या तर मोजक्याच व्यक्तिरेखा. वातावरण भक्तिमय. देव आणि देवालयाने भारलेले. प्रसन्न. संदर्भ जुने जे चालत आले ते, आणि आताचे वर्तमान यांच्या हिंदोळ्यावर झुलणारे. काळ स्मृतीवर नख रोवून विसावलेला. विषय वरवर आटोपशीर परंतु आवाका अथांग. वास्तव, आत्मभान आणि लौकिक यांच्या जाणिवांची विभूती झोळीत पडल्याचा आनंद वाचत असताना दृग्गोचर होत जातो.

'तुम्हाला पाहायला येणारं तुमचं मंगळसूत्र आहे. आम्हाला कोण आहे? आमच्याबरोबर असलं तर आमचं गोंदण.'

'कमीत कमी गरजांत जो आनंदाने राहून आपला आनंद सर्वांना मुक्त मनाने प्रसाद म्हणून देतो तो संत.'

'सगळ्याच आठवणी घडाघडा सांगितल्या की, मोरीला घासल्यासारखे होते.'

'घट्ट सायीसारखी पोरं; पण वावटळीत उडालेल्या पातळासारखी झालीय.'

'आठवणीसाठी व्यक्तीच्या अंतरंगाशी संवाद साधावा लागतो. त्याची मनोभावे सेवा करावी लागते. तिच्याशी एकरूप झाल्याशिवाय आठवणी मनात रुजत नाहीत.'

अशी एकापेक्षा एक सुंदर वाक्ये जागोजागी वाचायला मिळतात. त्यांची आवर्तने स्मृतिपटलाच्या गाभ्यात खोलवर प्रतिध्वनीसारखी निनादत जातात. मृदुंगाच्या नादासारखी.

मुखपृष्ठावरील एकावर रचलेले शोभिवंत कुंभ याच संचितांनी भरलेली आहेत असे वाटत राहते. हे तीन कुंभ तीन कांदबऱ्यासाठी रचलेले आहेत, असेही वाटावे. परंतु त्यामुळे मुखपृष्ठ आकर्षक झाले आहे.

- **मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

आत्मचरित्र हे केवळ लेखकाच्या जीवनाविषयी कथन करत नाही. ते सोबत आपल्या सभोवतालच्या व्यक्ती, आप्त, परिसर, समाज आणि त्यावेळचे वातावरण यांच्याविषयी देखील भाष्य करत जाते. लेखक ज्या क्षेत्रात कार्यरत असेल, त्या क्षेत्राविषयीची माहिती आपोआप त्यातून उलगडत जाते. लेखकाचा मूळ स्वभाव आणि त्यात होणारे बदल, त्यावर होणारे संस्कार, आणि त्याने केलेली ध्येयाकडील वाटचाल, यांच्या एकेक टप्प्याच्या पाऊलखुणा वाचकाच्या भेटीला येत जातात. तोच अनुभव डॉ. दाऊद दळवी यांच्या या आत्मचरित्रातून येतो.




डॉ. दाऊद दळवी हे यशस्वी प्राचार्य म्हणून सर्वांना परिचित आहेत. प्राध्यापक म्हणूनही ते विद्यार्थ्यांत प्रिय. पार्ले कॉलेजातील त्यांची कारकीर्द ही कायम स्मरणात राहणारी. परंतु बुऱ्हाणी कॉलेजात त्यांना हे यश पाहण्याचे भाग्य लाभले नाही. गुंड प्रवृत्तीचा कळस काय असतो, आणि त्यावेळचे मुंबईचे कुख्यात डॉन करीम लाला, हाजी मस्तान यांचे साम्राज्य कुठपर्यंत पसरलेले होते, याचा अनुभव मात्र पदरी आला. परंतु त्यांच्या कर्तृत्वाला खरा दीपस्तंभ सापडला तो ठाण्याच्या ज्ञानसाधना कॉलेजात. कॉलेज भरभराटीला आलेच. परंतु अनेक संस्थाचे पितृत्व त्यांच्याकडे आले.

घराण्यातील उच्च शिक्षणाच्या परंपरेचा वारसा डॉ. दाऊद दळवी यांना लाभला. राष्ट्रीय सेवादलाचा संस्कार त्यांना लाभला. सानेगुरुजींसारख्या अनेक वैभवशाली व्यक्तिमत्त्वांचा सहवास लाभला. स्वातंत्र्यपूर्व काळात जन्म झालेला असल्याने स्वातंत्र्यचळवळीत सहभागी होण्याचे भाग्य लाभले. त्यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व घडले आहे. विचार, आचारातली परिपक्वता आणि स्वभावातील ऋजुता त्यातून निर्माण झालेली आहे. त्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाला झळाळी आलेली दिसून येते. शिक्षण, संशोधन आणि सामाजिक क्षेत्रातले त्यांचे योगदान इतरांना प्रेरणा देणारे ठरले आहे.

डॉ. दाऊद दळवी यांनी अतिशय संयतपणे आपल्या अनुभवांना वाट करून दिलेली आहे. सर्वच क्षेत्रातील अधिकार मोठा असूनही त्यांच्या श्रेयासाठी स्वतःच्या नावाचा वापर केलेला नाही. भाषेवर आणि लेखनावर प्रभुत्व आहेच. तरीही त्यामुळे विचारांना बोजडपणा येणार नाही याची काळजी त्यांनी जाणीवपूर्वक घेतलेली दिसून येते. सांगण्यासारखे खूप असूनही त्याचा पसारा त्यांनी मांडलेला नाही. जे सांगायचे तेवढेच आणि सहज रूचेल इतक्याच मर्यादेत त्यांनी आपल्या जीवनाचा अर्क वाचकांच्या समोर ठेवला आहे. काही कटू, अप्रिय घटना आहेत, परंतु त्यांचा बाऊ केलेला नाही. जातीय दंगलीला सामोरे जावे लागले. आपल्या स्वत:च्या कुटुंबापेक्षा आश्रयाला आलेल्या शेजारी कुटुंबांची काळजी मोठी. त्यातच जवळच्या शेजाऱ्यांची घरे आगीच्या भक्ष्यस्थानी पडू लागली, तेव्हा ती विझविण्यासाठी स्वत:च्या तणावग्रस्त घरातून पाणी मारण्याची केलेली धडपड, ही केवळ माणुसकीच नाही किंवा शेजारधर्म नाही, तर ती आहे समाजासाठीची बांधिलकी ती त्याही प्रसंगी जागृत असावी हे केवळ डॉ. दाऊद दळवी यांनाच शोभून दिसते.

शिक्षण संस्था उभी करणे, ती आपल्या पायावर स्थिर करणे, यासाठी सर्व ते परिश्रम घेतले आहेत. परंतु तिथेच काटे रूतावेत असे अनुभव सहन करण्याची वेळ आली. त्याचा सल त्यांनी आतल्या आत जपून ठेवला. दुसऱ्यांना दोषाचे धनी मानायचे ही वृत्ती. मोठेपण दिसते ते इथे. जीवन आणि समाज याकडे सकारात्मक नजरेने पाहण्याची शिकवण केवळ विद्यार्थ्यांना, इतरांना दिली नाही. स्वत:ही त्याचे स्वच्छ मनाने आचरण ठेवले. तेच लेखणीतून उतरले. त्यामुळे डॉ. दाऊद दळवी यांचा व्यासंग इतिहास संशोधनाचा. त्यांच्या नावावर प्रसिद्ध असलेली ग्रंथसंपदा, ही त्या संशोधनाची पावती. स्थापत्यकला, शिल्पकला, लेणी यांचा अभ्यास तर ध्यासाचा भाग. या सगळ्यांचा उपयोग पार्श्वभागी ठेवून मुखपृष्ठ सजवण्याची सतीश भावसार यांची कल्पकताही वाखाणण्यासारखीच. त्यातून डॉ. दळवी यांचे व्यक्तित्व अधिक खुलून आले आहे. त्यामुळे कथन ओघवते झाले आहे, वाचनीय झाले आहे.

- **मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

## ग्रंथपान

स्थापत्यकलेवर आधारित नवा ग्रंथ वाचकांच्या भेटीला आणला आहे तो डॉ. दाऊद दळवी यांनी. स्थापत्यकलेवर तसे फारसे ग्रंथ मराठी भाषेत उपलब्ध नाहीत. त्यातून एका संपूर्ण कालखंडाचा आवाका असलेले तर नाहीतच नाहीत. ती उणीव या ग्रंथाने दूर केली असे खात्रीने म्हणता येईल.

डॉ. दाऊद दळवी यांचा व्यासंगाचा विषय इतिहास. इतिहास म्हटले की संशोधन हे आलेच. या संशोधनावर आधारित त्यांनी केलेल्या लेखनाची यादी बरीच मोठी आहे. त्यापैकी एक ग्रंथ म्हणजे 'भारतातील मुस्लिम स्थापत्यकला' हा होय. भारतात मुस्लिम राजवटीने केलेले आक्रमण आणि तिचा अंमल, हा जवळपास सहा शतकांचा कालखंड होतो. या कालखंडात गादीवर आलेल्या शासकांची यादी बरीच मोठी आहे. ती गझनीच्या महमद तुघलक, अलाउद्दीन खिलजीपासून औरंगजेबापर्यंत येते. आदिलशाही, कुतुबशाही अशा अनेक शाह्या देखील त्याच काळात उदयाला आल्या होत्या. या सर्व शासकांनी त्यांच्या आवड आणि निकडीनुसार जे बांधकाम त्यांच्या काळात घडवून ठेवले आहे, ते सगळे स्थापत्यकलेच्या सदरात मोडणारे आहे. किल्ले, मशिदी, तुर्बती, मकबरे, सराया, महाल, घुमट यांचा त्यात समावेश होतो. त्यापैकी अनेक वास्तू आजही उभ्या आहेत, काही काळाला शरण गेलेल्या असल्याने नामशेष झाल्या आहेत. त्यांचा शोध घेण्याचे मोठे काम डॉ. दाऊद दळवी यांनी मेहनतीने आणि चिकाटीने केलेले दिसते.




स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना कुठला, असा प्रश्न उच्चारताच आपण ताजमहालचा पटकन उल्लेख करतो. त्यात चूक आहे असे म्हणता येणार नाही. परंतु भारतभर अनेक वास्तू आजही दिमाखात उभ्या आहेत, त्यांना ताजमहालचे सौदर्य लाभलेले नसेलही, तरीही त्यांचे स्वतःचे सौंदर्य आहे आणि ते वेगळेपण त्यांनी जपलेले आहे, याची प्रचिती या ग्रंथातून येते. विजापूरचा गोलघुमट, दिल्लीचा कुतूबमिनार, हैदराबादचा चारमिनार, दौलताबादचा चांदमिनार, मांडवगडचा जहालमहाल, होशंगशाहचा मकबरा, जौनपूरची अटाला मशीद, गोमती नदीवरील पूल, अहमदाबादची जामी मशीद, बिहारमधील शेरशहाचा मकबरा, फत्तेपूर-सिक्रीतील जोधाबाईचा महाल, आणि बुलंद दरवाजा, दिल्ली-आग्रा येथील किल्ले, गुलबर्गा येथील गेसू दराज दर्गा, बिदरचा तख्त महाल, गोलकोंडा किल्ला, अहमदनगरची फराहबाग, अशा अनेक वास्तू आहेत. त्या प्रत्येक वास्तूचा इतिहास, बांधकामातले कौशल्य आणि सौंदर्य या ग्रंथात उलगडून दाखवलेले आहे.

'भारतातील मुस्लिम स्थापत्यकला' हा ग्रंथ केवळ माहितीच देत नाही, तर त्या त्या वास्तूंचे फोटो त्यात दिलेले आहेत. त्यातले काही रंगीत आहेत. महत्त्वाचे म्हणजे हे फोटो लेखकाने स्वतः त्या त्या ठिकाणी जाऊन कॅमेऱ्याने टिपलेले आहेत. त्यामुळे स्थापत्यकलेचे सौंदर्य शब्दांसोबत दृश्य स्वरूपातही वाचकाला अनुभवास येते. आणि लेखकाच्या काटेकोर परिश्रमाचीही कल्पना येते. भारतासोबत अन्य देशांतील अशा स्थापत्यकलेच्या नमुन्यांची ओळख लेखकाने करून दिलेली आहे. त्यामुळे या विषयावरील संदर्भग्रंथ म्हणून अभ्यासकांना याचा जसा उपयोग होऊ शकेल, तसा पर्यटकांनाही तो मार्गदर्शक ठरू शकेल. या ग्रंथाची निर्मिती डबलक्राऊन अशा दिमाखदार आकारात करण्यात आलेली आहे. भरपूर फोटो आणि सुबक टाइप यामुळे त्याच्या सौंदर्यात आणखी भर पडली आहे.

सतीश भावसार यांनी मुखपृष्ठावर केलेली सजावटही सुंदर झाली आहे. कुतूबमिनारची भव्य आकृती जणू वाचकाला साद घालत आहे असाच भास होतो.

- **मूल्य ६०० रु. सवलतीत ४०० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

स्थलांतर ही काही पक्षी किंवा प्राण्याची मक्तेदारी राहिलेली नाही. माणूसही स्थलांतर करतो. या स्थलांतराच्या निमित्ताने भेटीला येतो तो नवा भूप्रदेश, नवी संस्कृती, नवे रीतीरिवाज, अपरिचित कायदेकानू. माणसे म्हणायला जरी इथून तिथून सारखी, तरी त्यांच्याही नाना तऱ्हा. त्यातर अपरिहार्यच असतात. शासन व्यवस्था ते समाजमन यांच्याशी जुळवून घेताना सुरुवातीचा काळ जणू कसोटी पाहत असतो. पण एकदा स्थिरावला की माणूस त्या व्यवस्थेचा भाग होऊन जातो.परंतु या विषयी कुणी फारसे बोलत नाही. जाहीर तर नाहीच. लिहिणे तर दूरच राहिले. परंतु काही संवेदनशील मनाची माणसे याला अपवाद असतात. दिसलेले जग आपल्यानजरेतून पाहताना अंतर जाणवतेच. हे अंतर किती आणि कसे आहे, याची नोंद ही माणसे करत जातात. हा छंद असू शकेल, हौस असू शकेल, कदाचित वेळ घालवण्याचे साधन म्हणूनही त्याकडे ती पाहत असतील. परंतु ही नोंद महत्त्वाची असते. माहिती, ज्ञान, उत्सुकता, मनोरंजन या दृष्टीने. याची प्रचिती देणारे पुस्तक आहे, 'सौदीच्या अंतरंगात'.




या पुस्तकाच्या लेखिका आहेत पद्मा कऱ्हाडे. पती नोकरीच्या निमित्ताने सौदी मध्ये गेले. लेखिका त्यांच्यासोबत तिकडे गेल्या. आणि जे जे नवीन जाणवले, दिसले, अनुभवास आले, त्यांच्या त्यांनी नोंदी करायला सुरुवात केली. अतिशय नेटकेपणाने आणि तितकेच तरलपणे. त्याविषयी लेखिका नमूद करतात,' ज्यावेळी तुम्ही आपला देश सोडून परदेशी जाता तेव्हा प्रांत, भाषा, धर्म, हे सर्व बंध गळून पडतात. उरतो तो केवळ 'माणुसकीचा बंध'. मन खूप विशाल होतं, अशावेळी. तुमची प्रत्येक गोष्टीकडे, प्रत्येक व्यक्तीकडे पाहण्याची दृष्टी बदलते. ती सकारात्मक होते, विशाल होते.'

जे नमूद करायचे आहे त्यांची वर्गवारी केलेली आहे. हे लेखन अनुभवाच्या आणि निरीक्षणाच्या अंगाने जाणारे असले तरी ते काही लेखिकेचे आत्मचरित्र नाही. त्यामुळे कुठलेही प्रकरण काढून वाचायची सोय आपोआपच झालेली आहे. 'सौदी अरेबिया जीवनाची झलक' या प्रकरणात त्या या देशाची संपूर्ण भौगोलिक माहिती देतात. त्यांचा मुक्काम हा जेड्डा आणि रियाध या शहरांत असल्याने तिथले रस्ते, बिल्डिंग, विमानतळ, दवाखाने, वाहतूक, शॉपिंग मॉल्स, रमादान, कार्यालये, करमणूक, राजघराणे इ. चा तपशील त्यामुळे वाचायला मिळतो. 'सौदीतील भारतीय जीवन आपलीच नवी ओळख' या प्रकरणात तिथे असलेल्या भारतीयांचे वर्गीकरण केले असून त्यांच्या प्रश्नांना मुक्त करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. एकटे भारतीय पुरूष आणि त्यांच्या तडजोडी यांची माहिती यात दिलेली आहे. तसाच तेथील रीतीरिवाज आणि भारतीय रीतीरिवाज यांची तुलना केलेली आहे. 'नोकरी–व्यवसाय अमाप संधी,चोख बंधनं' या प्रकरणात पासपोर्टसारख्या 'इकामा' या महत्वाच्या दस्तऐवजाची माहिती आहे. सौदी आणि परकीय असा भेद आहे, तसे कामगारांचे शोषण आहेच. गंमतीचा भाग म्हणजे डॉक्टर लोक हाताखालचा स्टाफ म्हणून भारतीयांना प्राधान्य देतात. भारतीय लोक इमानदारीने भरपूर मेहनत करतात, वेळ वा बोनसची अपेक्षा न ठेवता. हे निरीक्षण मानसिकता शोधणारे आहे.

सौदीमध्ये सार्वजनिक वाचनालय नाही. सिनेमा थिएटर नाही. साहित्य कला विषयी प्रेम आहे. एका कवयित्रीच्या कवितेचे पुस्तक लोक हौसेने घेत असल्याचे लेखिकेला आढळले. त्याचवेळी एक अभागी कवयित्री कौटुंबिक कलहातच गुदमरून गेलेली सापडली. सार्वजनिकरीत्या 'शिर धडावेगळं' करण्यात येते असे चौक सौदीत आहेत. या चौकात हे पवित्र काम करणाऱ्या 'आधुनिक काळातील यमा'चे काम आणि त्याची मानसिकताही लेखिकेने टिपलेली आहे. हा यम सांगतो,' पुरुषांप्रमाणे कित्येक स्त्रियानाही मी यमसदनाला पाठवले आहे. स्त्री काय किंवा पुरुष काय, मला काही वाटत नाही त्याचं. फरक एवढाच आहे, की स्त्रियांना मरण तलवारीने की बंदुकीनं हवं हे विचारलं जातं. पण बहुतेक वेळा स्त्रिया तलवारीनंच मरण यावं सांगतात.'

लेखिकेने जास्तीत जास्त सौदीचे अंतरंग उलगडून दाखविण्याचा मनापासून प्रयत्न केलेला आहे. जवळपास सगळ्याच विषयांना हात घातलेला आहे. जसे आढळले तसेच वाचकांच्या समोर मांडले आहे. परदेशी म्हणून वावरताना आजूबाजूला दिसणारे जग आपल्या नजरेतून पाहत असताना तेच कागदावर मांडले तर सुंदर माहितीचे पुस्तक तयार होते. परमुलखात गेलेल्या प्रत्येकासाठी जणू हा वस्तुपाठ ठरावा. खजूराचे झाड, तलवारींची मांडणी आणि चंद्राची कोर यांच्या संकल्पनेतून साकारलेले मुखपृष्ठही उठावदार झाले आहे.

- **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

पुस्तकाच्या शीर्षकावरूनच आतील मजकुराविषयी कुतूहल निर्माण करण्याची एक कल्पकता असते. म्हणजेच नावात काय असते, हे म्हणणे इथे व्यर्थ ठरते. 'मराठीतील साहित्यलेणी' या पुस्तकाचे शीर्षक त्यापैकी एक. सार्थ ठरणारे. सुदैवाने मराठी भाषेत होणारी बरीचशी निर्मिती ही साहित्यलेणी म्हणूनच पाहिले जाते. निदान निर्मिती करणाऱ्या लेखकाला तरी ती तशी वाटत असते.




प्रत्येक साहित्य कृतीला 'साहित्यलेणी'चा मान देण्याचा अधिकार केवळ त्या लेखनाच्या लेखकाच्या हाती नाही, तर त्या शिवाय आणखी दोन घटक आहेत. ते म्हणजे समीक्षक आणि वाचक. समीक्षकांची मते नेहमीच वादात सापडणारी असतात असे नव्हे, तरी त्यावरून वाद होऊ शकतो. एकाची मिठाई दुसऱ्याला मिठाई वाटेलच असे नाही, या म्हणीचा उपयोग इथे होऊ शकतो. परंतु वाचक नावाच्या घटकाबाबत दुमत होण्याचे कारण नाही. किंबहुना तोच विश्वसनीय मतदार म्हणायला हवा. त्याला जे भावतं, पटतं त्याचीच तो मागणी करतो, जाहीर कबुली देतो, दिलखुलासपणे. आवड असेल तर स्वतःचा संग्रह देखील करतो. अशा वाचकांच्या विश्वासावर विश्वास ठेवण्याची कल्पना तर भन्नाटच. 'पत्र नव्हे मित्र'अशी धारणा ठेवणाऱ्या म.टा.ने या कल्पनेचे सोने करण्याचा प्रयत्न केला. मराठीतील साहित्याची लेणी ठरू शकतील अशा साहित्यकृतींची नावे पाठविण्याचे आवाहन वाचकांना करून त्याच्या रसिकतेलाच हात घातला. बौद्धिक,भावनिक आणि रसिकमान्यतेचे मानदंड ठरलेल्या पुस्तकांची यादी त्यातून निर्माण झाली. अशी वाचकमान्य यादी वादातीत नसला तरी अकारण वाद घालावा अशी ही निवड निश्चितच नाही. कुणीही या अस्सल मोत्यांच्या शुद्धतेविषयी शंका घेऊ शकणार नाही.

सन १९८६ साली हा प्रयोग करण्यात आला. निवडण्यात आलेल्या पुस्तकांची केवळ यादी करून थांबता आले असते. वाचकांना वाचनाचा छंद जोपासताना, नेमके काय वाचायला हवे, याचे मार्गदर्शन झाले तर त्याचे वाचन समृद्ध होण्यास मदत होते. काहीना स्वतःचा संग्रह करण्याची आवड असते, त्यानाही अशा मार्गदर्शनाचा उपयोग होऊ शकतो. त्या दृष्टीने ही यादी संदर्भ म्हणून नक्कीच उपयुक्त ठरणारी आहे. आतापर्यंत या संदर्भाची उणीव जाणवत होती ती या पुस्तकाने भरून निघाली आहे. परंतु केवळ पुस्तकाचे शीर्षक आणि लेखकाचे नाव पुरेसे नाही, तर त्या यादीसोबत त्या पुस्तकाचा परिचय थोडक्यात देण्यात आला तर वाचकांना जास्त उपयुक्त ठरू शकेल, हा दृष्टिकोन जास्त महत्वाचा ठरला. अर्थात काम अवघड होते, संशोधनाचे होते. परंतु दीपक घारे यांनी ही जबाबदारी अतिशय समर्थपणे पेलली आहे. त्यामुळे यादी ही केवळ शीर्षकापुरती मर्यादित राहिली नाही. तिला संदर्भ मुल्य प्राप्त झाले. इतिहास, नाटक, कविता, कादबंरी, कथा, निबंध, चरित्र, संत साहित्य असा सर्वसमावेशक खजिना तिच्यात पाहायला मिळतो. हा खजिना एकूण १७७ पुस्तकांचा आहे. त्यातली काही नावे आपल्या परिचयाची आहेत. जसे लीळाचरित्र, नामदेव, तुकारामाचे अभंग,ज्ञानेश्वरी, एकनाथाचे भारूड, दासबोध, आज्ञापत्र, लोकहितवादींची शतपत्रे, संगीत सौभद्र, संगीत शारदा, भाऊसाहेबांची बखर, लावण्या, काजळमाया, श्रीमानयोगी, स्वामी, बलुतं,उपरा.

या पुस्तकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्याची प्रस्तावना. ती आहे अरूण टिकेकरांची. अभ्यासू आणि परखड मत असलेली ही प्रस्तावना वाचकाना अंतर्मुख करणारी आहे. आनंदानुभव, अलंकारप्राप्ती आणि आत्मक्षमवृत्ती यांचा अनुभव आपणास येतो की नाही, याची प्रचिती वाचकांना तपासून पाहता येईल.

१९८६ नंतर २०१४ साली ही दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली आहे. त्यामुळे या यादीत आणखी भर पडू शकते. परंतु आहे ही यादी वाचकाना नक्कीच उपयोगी ठरेल. आपले काय वाचायचे राहिले आहे, आणि संग्रहात कोणती पुस्तके घ्यायची राहिली आहेत याचा शोध या यादीवरून घेता येईल. किंबहुना रसिक वाचक समजणाऱ्या प्रत्येकाच्या संग्रही असावे असेच हे पुस्तक आहे.

- **मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**

# ग्रंथपान

हमने तो जब कलियाँ माँगी,
काँटो का हार मिला

हे गाणे ज्यांना आठवत असेल त्यांना गुरूदत्त नावाचे गारूड काय होते, ते सांगण्याची गरज नाही. नुसती सुरावट कानावर पडली तरी नजरेसमोर गुरुदत्तची छबी उभी राहाते. ज्याने त्याचे प्यासा, काजग के फूल आणि साहिब, बीबी और गुलाम सारखे सिनेमे पाहिले, त्यांच्या रसिक काळजावरून कुणीच गुरुदत्तला खाली खेचू शकणार नाही. तो काळ ज्यानी पाहिला, त्यांच्यासारखे भाग्यवान रसिक तेच. गुरुदत्तला जाऊन आता पन्नास वर्षाचा काळ लोटला. हा काळ त्याच्या एकूण आयूष्यमानापेक्षा खूप मोठा आहे. तरीही त्याच्या आठवणी अजूनही ताज्या वाटतात. का वाटणार नाही? लखलखत्या चंदेरी दुनियेत आपले स्थान निर्माण करणे सोपे नाही. त्यावर आपला ठसा उमटविणे तर त्याहून कठीण. परंतु गुरुदत्तने या दुनियेवर आपली मोहर उमटविली. कायमची. तीही कारकीर्दीचे आयुष्य अपुरे वाट्याला आलेले असताना. जर अधिक आयूष्य.... या जर तरला तसा आता अर्थ नाही, नसतोही.




गुरुदत्तचा जन्म ९ जुलै १९२५ आणि मृत्यु १० ऑक्टोबर १९६४, म्हणजे वाट्याला आलेले आयुष्य ३९ वर्षांचे. त्याच्या जाण्याला आता पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत. ग्रंथालीने नेमके हेच औचित्य साधले. दि.१३ ऑक्टोबर २०१४ रोजी त्याच्यावरील स्मृतींना उजाळा देणारा ग्रंथ प्रकाशित केला, त्याचे नाव 'गुरुदत्त'. हा ग्रंथ आहे गुरुदत्तवरील लेखांचा. त्याचे संपादन केले आहे सुधीर नांदगावकर यांनी.

गुरुदत्तविषयी अनेकांनी भरभरून लिहिले आहे. सुधीर नांदगावकर, अरुण खोपकर, अशोक राणे, डॉ सुमती क्षेत्रमाडे, विश्वास पाटील, रेखा देशपांडे, प्रा.विजय आपटे, देवीदत्त, लक्ष्मीकांत देशमुख, श्याम बेनेगल, सत्यजित राय, वहीदा रहमान, अबरार अल्वी ही त्यातली काही मान्यवर लेखक मंडळी. यांच्या नजरेतून गुरुदत्तच्या अनेक पैलूंचे दर्शन वाचकाला होते. गुरूदत्त हा अभिजात अभिनेता होता, तसा तो कुशल दिग्दर्शक होता, धाडसी निर्माता होता. कथा-पटकथाही त्याने लिहिल्या. श्याम बेनेगल त्याच्याविषयी उल्लेख करतात, 'तो कॅमेरामन नसूनही उत्तम तंत्रज्ञ होता. विलक्षण सौंदर्यदृष्टी त्याच्याकडे होती. कॅमेऱ्याची विशिष्ट नजर होती. प्रकाशयोजनेचा सुक्ष्म विचार होता.' अबरार अल्वी तर गुरुदत्तसोबत काम करणारे. त्यानी गुरूदत्तचा सिनेमाकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्मरण करून दिला आहे,' केवळ बॉक्स ऑफिसवर यश मिळवून देणारे चित्रपट बनवणं कठीण नाही. अर्थपूर्ण चित्रपटांना बॉक्स ऑफिसवर यश मिळवून दाखवताना खरी कसोटी लागते.' गुरुदत्तच्या कला आणि खाजगी जीवनला कलाटणी देणारी दोन नावे. एक गीता रॉय. तिच्याशी त्याने विवाह केला. दुसरे नाव म्हणजे वहीदा रहमान. हे नेहमीच वादग्रस्त राहिलेले नाव. अनेकांच्या मते या दोघींच्या लाटांत गुरुदत्तची नौका हेलकावे खात बुडाली. त्यामुळे वहीदा रहमानचा गुरुदत्तवरील लेख औत्सुक्याचा ठरतो.'महान प्रेमिक होते ते. आपल्या कामावर त्यांचं प्रेम होतं, आपल्या सहकाऱ्यांवर त्यांचं प्रेम होतं, आपल्या सृजनावर त्यांचं प्रेम होतं आणि मृत्युवरही त्यांचं प्रेम होतं.' ही वहीदा रहमानची पारख.

'साहिब, बीबी और गुलाम' विषयी तर अनेकांनी मते नोंदविलेली आहेत. दोन स्वतंत्र लेखही आहेत. त्यातल्या सौंदर्य आणि कलावादी भूमिकेबाबत गुरूदत्तचा दृष्टिकोन किती आग्रही होता याचा उलगडा या लेखांमधून होतो. आणि तोच चित्रपट त्याच्या नजरेतून पाहण्याचा मोह अनावर होतो.

गुरुदत्तच्या जीवनाचा आलेख मांडताना, ग्रंथाची मांडणी तीन भागात करण्यात आली आहे. पहिल्या दोन भागात लेख आहेत. शेवटच्या भागात गुरुदत्तच्या चित्रपटांविषयी चार परिशिष्टे जोडली आहेत. त्यांच्यातून गुरुदत्तच्या कारकीर्दीची कल्पना स्पष्ट होते. लेखांमध्ये अनेक गाजलेल्या गाण्यांचे मुखडे आणि फोटो आहेत. त्यातून तो काळ पुन्हा नजरेसमोर उभा राहतो. मुखपृष्ठावरील गुरुदत्तची छबी तर रूपेरी पडद्यावरील जिवंत अभिनयाचे स्मरण करून देते. देखण्या स्वरूपात निर्मिती केलेला ग्रंथ तितकाच मजकुराने ठाशीव झाला आहे. ग्रंथालीची ही स्मरणयात्रा औचित्यपूर्ण म्हणायला हवी.

- **मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**

# ग्रंथपान

दिनकर गांगल या नावाचा परिचय म्हणजे 'ग्रंथाली'. १९७४ साली ग्रंथालीची स्थापना झाली तेव्हापासूनचा. ग्रंथालीने प्रकाशित केलेल्या पुस्तकांच्या निमित्ताने तो वाढत गेला. वाचक चळवळीचा भाग म्हणून प्रकाशन, असा एकांगी उत्साह न ठेवता त्याचा प्रसार करण्याचे कसब त्यांनी दाखवले. 'ग्रंथमोहोळ', 'रुची', प्रदर्शने याद्वारे वाचकाच्या दारात पोहोचण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. अख्खा महाराष्ट्र पिंजून काढला. देशाबाहेर सुद्धा वाचक जागृत केला. हवे ते शोधून काढले. पाहिजे तसे लिहून घेतले. मराठी साहित्यात संपादकीय नियोजन आणले. जवळपास चारशे पुस्तकांवर त्यांचा संस्कार आहे. अनेक पुस्तके वाचकांच्या मनावर कायमचे अधिराज्य गाजवत आहेत. या सगळ्यातून जाणवलेले, भावलेले आणि प्रत्यक्ष दिसलेले गांगल सगळ्यांनाच परिचित आहेत. पण या पलीकडचेही व्यक्तिमत्त्व असू शकते, ते गांगलांनी जपले आहे. 'थिंकीग पॉवरचे.' जे घडते, जे दिसते त्यातला भाव त्यांना जो जाणवतो तो इतरांपेक्षा वेगळा असतो. त्यांची चिंतनाची दिशा काही वेगळे शोध घेत असते. हा अनुभव त्यांच्या संपादनात जसा जाणवतो, तसा लिहिण्यात, भाषणातही जाणवतो. माझा वैयक्तिक अनुभव आहे तो असा. त्यामुळेच त्यांचा एकप्रकारे आदरयुक्त धाक देखील वाटतो. मी म्हणतो आहे ते वरवरचे, वा व्यक्तिपूजक नव्हे. त्याचा प्रत्यय घ्यायचा तर हे पुस्तक वाचा,'स्क्रीन इज द वर्ल्ड'. गांगलांचे नवे पुस्तक. वेळोवेळी, प्रसंगोपात्त केलेल्या लेखनातून, भाषणातून मांडलेल्या चिंतनशील विचारांचे आलेख असलेले पुस्तक.




गांगल पत्रकार म्हणून जवळपास ३० वर्षे माध्यमात वावरत होते. त्यांच्याकाळी त्याना सांगण्यात येई, जर्नालिस्ट म्हणजे कम्युनिकेशनचे विद्यार्थी. मिडियम इज द मेसेज. परंतु, आजचे माध्यम आणि झालेले बदल पाहून गांगल म्हणतात, 'गेल्या पाच दहा वर्षात ते विधान मागे पडलं आणि 'स्क्रिन इज द वर्ल्ड' हे विधान आलं.' मल्टिमिडियाची जादू कशात आहे, तर स्क्रीन इज द वर्ल्ड! एक छोटा स्क्रीन आहे आणि त्या छोट्या स्क्रीनवर आपलं सगळं जग आहे. हा विचार त्यांनी व्यक्त केला आहे तो 'मल्टिमिडिया माहोलमधील मराठी' या लेखात. 'क्रांतिसदृश स्थित्यंतराच्या काळातील लेखन-वाचन' या लेखात ते १८५७ पासून सुरू झालेल्या प्रबोधनपर ज्ञानप्रकाश चळवळीचा शोध घेतात. या चळवळीतला शेवटचा महापुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्यानंतर म्हणजेच १९५६ नंतर येथील वैचारिक परंपरा तेवढी जाज्वल्य राहिली नाही. त्याची जागा अनुभवांनी/अनुभूतींनी आणि स्वाभाविकच लालित्याने घेतली, या निष्कर्षावर येऊन पोहोचतात.

याच लेखात समाजमनावर अधिराज्य गाजवणाऱ्या लेखकांचा ते उल्लेख करतात. त्यात अरुण साधूंचा उल्लेख उल्लेखनीय म्हणावा लागेल. त्यांच्या लेखनाचे कवाड उघडून दाखवत गांगल म्हणतात,'त्याच्या काळातील तो सर्वात लोकप्रिय आणि अर्थपूर्ण लेखक ठरला आणि पुढे त्याला राज्य आणि देशपातळीवर तशी मान्यता मिळाली'. मातृभाषा या संकल्पनेबाबत तिहितात, 'मातृभाषा ही संकल्पनाच पेचात आली आहे. मराठी आई, बंगाली बाप; मुलगी वाढते आहे दिल्लीच्या वातावरणात आणि शिकते आहे इंग्रजी माध्यमाच्या शाळेत. तिची मातृभाषा कोणती?'

महाराष्ट्राची भाषा, संस्कृती, लोक वसाहत आदिचा शोध घेतांना गांगल 'महाराष्ट्र हा तर मेल्टिंग पॉट 'या लेखात म्हणतात, भाषिकदृष्ट्या महाराष्ट्र हे जगातील चौदाव्या क्रमांकाचे राज्य असो, पण त्याची भाषा हाच त्या भूप्रदेशाचा दुबळा दुवा आहे. कारण मराठी भाषा घडलेली नाही- घडवलीही गेलेली नाही. दहा कोटी लोकांना एकात्म बांधू शकेल एवढी ताकत तिच्यात आलेली नाही. देशोदेशीचे लोक एकत्र येऊन घडवलेली संस्कृती म्हणून अमेरिकेला 'बॉइलिंग पॉट' असे म्हटले जाते. त्या उटल महाराष्ट्राला 'मेल्टिंग पॉट'. कार्यकत्यांनी एकत्र येऊन काम उभे केल्याची, तीस चाळीस वर्षापूर्वीची उदाहरणे आता तशा स्वरुपात दिसत नाहीत. अण्णा हजारे, प्रकाश आमटे, डॉ. अभय बंग, अविनाश धर्माधिकारी, अनिल शिंदे, विजय बोराडे यासारख्या एकेकट्या व्यक्ती नेटाने , तिच्या मर्जीने काही करताना दिसतात. महाराष्ट्रात इन्स्टिट्यूशन उभ्या राहण्याची शक्यता , जी गेल्या शतकाच्या शेवटच्या तीन दशकात जाणवत होती ती अस्तंगत पावली आहे, असाही निष्कर्ष त्यांनी काढला आहे.

वरील काही विवेचनावरून गांगलाच्या निरीक्षणाचे, शोधाचे आणि चिंतनाचे सार काय आहे याची कल्पना येईल. या लेखसंग्रहातील लेखांची शीर्षके वाचली तरी ती कल्पना अधिक विस्तृत होईल. ग्लोकल महाराष्ट्र, राष्ट्रवादाची पुनर्मांडणी अटळ, मराठी साहित्य-कला क्षेत्रातील मध्यमवर्गीय संवेदना!, वृत्तवाहिन्या म्हणजे बाजार गप्पाच की!, आजची संस्कृतीः स्क्रीन इज द वर्ल्ड.

जगाचा शोध घेण्यासाठी आता जहाज किंवा विमाने वापरण्याची गरज नाही. ते आता बोटाच्या टोकावर उभे आहे. ही कल्पना दाखविणारे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी सजवले आहे. सुंदर!

- **मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

# ग्रंथपान

लेखन करताना लेखकाने काहीएक भूमिका घ्यायला हवी. तरच ते लेखन कसदार होतं, असे ८७व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष फ.मुं. शिंदे यांचे मत आहे. 'तिचं अवकाश' या पुस्तकातील लेख हे समाजातील विविध क्षेत्रातील महिलांचे चित्रण करतात. या महिला त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात कर्तृत्व सिद्ध केलेल्या आहेत. त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा, आपल्या क्षेत्रावर ठसा उमटवण्याचा दृष्टिकोन सकारात्मक आहे. जीवनात मिळवलेले यशाचे कमळ फुलवताना किती पाण्यात पोहावे लागले? त्यापाठची प्रेरणा काय होती? अपयश आले असेल तर ते लोखंडाचे चणे त्यांनी कसे पचवले? असे प्रश्न आपोआपच उपस्थित होतात. त्यांची उत्तरे पुस्तक वाचताना मिळत जातात. तरी एक प्रश्न शिल्लक राहतो, लेखिकेची भूमिका काय? तर त्याचे उत्तर आहे, स्त्रीशक्ती! तिची सक्षमता! या शक्तींचा शोध घेणे, त्यातून स्त्रीजीवनाची कणखर संकल्पना समजून घेणे.




शिरीष पै हे नाव आपल्या सगळ्यांच्या चांगल्या परिचयाचे आहे. कवितेची आवड असणारा रसिक चटकन त्यांच्या 'हायकू'ची आठवण काढील. होय, हा काव्यप्रकार मराठीत खऱ्या अर्थाने रूढ करण्याचे श्रेय जाते ते त्यांच्याकडेच. तशी त्यांची ग्रंथसंपदाही आपल्या चांगल्या परिचयाची आहे. कादंबरी, कथा, नाटक, ललितलेख, व्यक्तिचित्रे, अशा सर्व क्षेत्रांत त्यांची कलंदर लेखणी लीलया सफर करून आलेली आहे. तरी खरी ओळख आहे ती कवयित्री म्हणूनच. थोडेथोडके नव्हे तर, तब्बल सोळा कवितासंग्रह त्यांच्या नावावर आहेत! त्यांची पहिली कथा बक्षिसासह 'खेळगडी' मासिकात प्रकाशित झाली, त्यावेळी त्यांचे वय होते चौदा. पुढे 'नवयुग'ची जबाबदारी आली आणि एक लेखिका त्यातून आकाराला येत गेली. बालपणाचे कोवळे दिवस, त्यांची निसर्गाशी असलेली अलवार मैत्री आणि साहित्यावर असलेले निस्सीम प्रेम; त्याचवेळी व्यवहारिक जगाला खंबीरपणे दिलेला लढा; त्यांची आध्यात्मिक साधनेकडे असलेली आंतरिक ओढ आणि जगण्याचा अर्थ शोधण्याची दिलेली जाणीव; असा साऱ्या अंगांनही या पुस्तकात लेखिकेने त्यांच्या या दीर्घ प्रवासाचा मागोवा अतिशय संयतपणे घेतला आहे.

'माणूस हा एकच वर्ग आणि माणुसकी हा एकच धर्म' मानणाऱ्या लीना जोशी 'अपनालया'च्या माध्यामातून अविरत सेवेत स्वतःला झोकून देतात, एकाच दुर्दम्य आशेवर, 'वो सुबह कभी तो आयेगी'. सेवादलात एकरूप झालेल्या, एसएनडीटी विद्यापीठातून राज्यशास्त्रातील, स्त्रीअभ्यासात डॉक्टरेट मिळवलेल्या पहिल्या संशोधक डॉ. रोहिणी गवाणकरांच्या जिद्दीचा आलेख तसाच अचंबित करणारा. नाटक, दूरदर्शन आणि सिनेमा यासारख्या माध्यमांच्या संदर्भात ज्यांचे नाव आदराने घेतले जाते त्या प्रतिमा कुलकर्णी. स्वतःच्या प्रतिभेचा कस पाहणाऱ्या या क्षेत्रावर त्या आपली हुकमत गाजवत आहेत. स्वरप्रभा पद्मभूषण डॉ. प्रभा अत्रे, आशा जोगळेकर, सुमोना चटर्जी, पद्मा पुरोहित, कालिंदी मुझुमदार यांच्याही स्त्रीशक्तीचा शोध लेखिकेने तितकाच उत्कटतेने घेतला आहे.

पुस्तकात सुरुवातीलाच प्रत्येकाच्या अवकाशाचे यंत्र दिलेले आहे. तर शेवटी परिशिष्टे दिलेली आहेत. प्रभा अत्रे यांना मिळालेले सन्मान, त्यांच्याविषयीचे गौरवोद्‌गार, गाण्यांच्या रेकॉर्ड व कॅसेट यांची नावे, पुस्तके. शिरीष पै यांची साहित्यसंपदा, राहिणी गवाणकर यांची मानपत्रे व पुरस्कार यात दिलेले आहेत. 'घेऊ का मी शोध स्वतःचा' ही स्वःचा शोध घेण्यास उपयुक्त ठरणारी प्रश्नमंजुषा या परिशिष्टात दिलेली आहे.

लेखिका नीलिमा कानेटकर या स्वतः कायदेतज्ज्ञ आहेत. वक्तृत्वाइतकीच त्यांची लेखणीही काटेकोर आणि निर्भीड आहे. अशिलाला न्याय देण्याची, समुपदेशन करण्याची जी हातोटी त्या बाळगतात, तीच विषयाची मांडाणी करताना बाळगलेली दिसून येते. त्यामुळे घेतलेल्या मुलाखती 'तमसो मा ज्योतिर्गमय'इतकाच कसदार अनुभव देतात.

मनोज आचार्य यांनी मुखपृष्ठ सजवताना दाखवलेली कल्पकता विषयाइतकीच उत्कट आहे.

- **मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

परीक्षा कुठलीही असो, तिची भीती वाटत नाही असे म्हणणारा सापडणे कठीणच. परीक्षा ही प्रत्येकाची परीक्षाच पाहत असते. त्याचे कारण साधे आहे. जिला सामोरे जायचे, ते कसे जायचे हेच कुणी सांगत नाही. सांगणारे तसे पुष्कळ असतात, पण त्यात शास्त्रशुद्धतेचा अभाव अधिक असतो. त्यामुळे विश्वास ठेवायला मन पटकन तयार होत नाही. त्यात एक आत्मविश्वास सोबत असतो, उत्तीर्ण नक्की होईन, पण अपेक्षित गुणांचे काय? हल्ली या 'गुणांच्या' टक्केवारीने सगळ्यांना झपाटून टाकलेले आहे. प्रत्येकजण धावतो आहे तो तिच्यामागे. त्यामुळे भीती आपोआपच पाठलाग करत राहते, सावलीसारखी. परंतु आता अशी भीती बाळगण्याचे कारण उरलेले नाही. मदतीला आले आहे,'परीक्षेची भीती कशाला?' हे पुस्तक. ऐन संकटात मदतीचा हात देणारा मित्र भेटावा, तसे. या पुस्तक मित्रावर विश्वास ठेवताना मनात कुठली शंका बाळगण्याचे कारण नाही. अनुभवाची सकस शिदोरी ज्यांच्याजवळ आहे, अशा प्रयोगशील शिक्षिका या पुस्तकाच्या लेखिका आहेत, अनुराधा गोरे. यांचा परिचय आपणास आहेच. 'वारस होऊ अभिमन्यूचे', 'आचंद्र सूर्य नांदो', 'गाऊ त्यांना आरती', 'कळी उमलताना', '१९७१ चा रणसंग्राम', 'उठा राष्ट्रवीर हो' ही त्यांची पुस्तके आपल्या आठवणीत असतीलच.

**परीक्षेची भीती कशाला?**

अनुराधा गोरे




'परीक्षेची भीती कशाला?' या पुस्तकाची मांडणी तीन भागांत केलेली आहे. पहिला भाग आहे, समजून घेण्याचा. त्यात महत्त्वाचा विषय आहे, शिक्षणाचा आणि अभ्यासाचा. शिक्षण म्हणजे काय, या मूळ प्रश्नापासून याची सुरुवात होते. त्याची उकल लेखिका करतात, 'शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या क्षमतांचे विकसन. प्रेरणा निर्माण करणे, योग्य दिशेने, कार्यक्षमतेने काम करता येईल असे मनोबल निर्माण करणे म्हणजे शिक्षण. चैतन्याने मुसमुसलेले, चारित्र्य घडवणारे, पुरुषार्थ प्रदान करणारे ते शिक्षण. शेकडो ग्रंथ डोक्यात कोंबण्यापेक्षा तुम्ही अगदी थोड्या कल्पना खरोखर आत्मसात केल्यात आणि जगून दाखवल्यात तर ते शिक्षण.'

मोठा प्रश्न असतो, अभ्यास करायचा म्हणजे नेमके करायचे तरी काय? चांगल्या गुणांच्या टक्केवारीत उत्तीर्ण व्हायचे तर तोच प्रश्न प्रथम सुटायला हवा. त्यासाठी आवश्यक वाटणारे मार्गदर्शन दुसऱ्या भागात केलेले आहे. अभ्यास ही तीन टप्प्यांतली प्रक्रिया आहे. ज्ञान व माहितीचे 'संकलन', संकलित माहितीवर 'प्रक्रिया' आणि शेवटचा टप्पा 'सादरीकरणाचा'. स्वयंअध्ययन या प्रकरणात हा विषय अधिक स्पष्ट केलेला आहे.

'अभ्यास का करायचा?' या प्रकरणात विविध विषय एकमेकांना कसे पूरक आहेत, याचे विवेचन केलेले आहे. भाषा हा एक विषय घेतला तर त्याच्या अभ्यासात विविध शब्द, त्यांचे अर्थ, समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द यांच्या छटा माहीत हव्यात. त्यांचा वापर प्रभवीपणे करता यायला हवा. या भाषेतील शब्दप्रयोग, वाक्प्रचार, म्हणी, सुविचार, कविता यांचा साठा हवा.

गणितासाठी नमुनावही करावी. जी उदाहरणे पटकन सुटली त्यांचा परत परत सराव करण्याची गरज नाही. जी कठीण वाटली, चुकली, सोडवताना त्रास झाला, अशी उदाहरणे प्रश्नवहीत उतरवून ठेवावी. त्यावर खूण करून ठेवावी. अशी उदाहरणे परत परत वाचावीत, सोडवावीत. गणित इतरांनी समजावून सांगणे, गटात सोडवणे फायद्याचे असते. मित्रांच्यात स्पर्धा लावून गणिते सोडवावी. क्रमिक पुस्तकांच्याबरोबर इतर गणित पुस्तकांतील गणिते सोडवावी. गणिताशी मैत्रीच करण्याचा प्रयत्न करावा. गणित आपोआप सोपे वाटू लागेल. शंभर टक्के गुण मिळवून देणारा हा विषय आहे. लेखिका अशी प्रत्येक विषयाबाबत त्याची वैशिष्ट्ये नमूद करतात. त्यासाठी त्यांनी अभ्यासाची कार्यनीती, तंत्रे, सवयी, कौशल्ये, त्यातील समस्या यांचे विवेचन केलेले आहे. आणि मानसिक आरोग्याचा मंत्र दिला आहे, 'रोज यशस्वी झाल्याची स्वप्ने पाहा. पद्मासन वा वज्रासन घालून सूर्याकडे तोंड करा. पाठीचा कणा ताठ ठेवून मन शांत करा. शंभरपासून शून्यापर्यंत आकडे उलट क्रमाने मनातल्या मनात मोजा. शांतपणे पण ठामपणे निश्चयाने म्हणा. मी यशस्वी होणार आहे... यंदाच्या परीक्षेत मला उत्तम यश मिळू दे...'

तिसऱ्या भागात पाचवी ते आता व्यावसायिक असलेल्या विद्यार्थ्यांच्या निवडक प्रतिक्रिया शेवटी दिलेल्या आहेत. वाचनवेग, स्वयंअध्ययन, वाचनकौशल्य अशा लेखिकेने केलेल्या वेगवेगळ्या प्रयोगमय वर्गांचा कसा फायदा झाला, या विषयीच्या प्रेरणादायी अशा या प्रतिक्रिया आहेत.

विद्यार्थी , पालक आणि शिक्षक अशा सर्वांनाच उपयुक्त ठरावे असे, सुटसुटीत, मुद्देसूद आणि सोप्या पद्धतीने लिहिलेले हे पुस्तक आहे.

सतीश भावसार यांनी देखणे मुखपृष्ठ केले.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

एक आटपाटनगर होतं. तिथं एक राजा राज्य करीत होता. त्याचं नाव....

घरात आजी गोष्ट सांगायची, तेव्हा पहिलं वाक्य कानावर पडायचं ते हेच. पुढे वाचनाकडे वळलो, तेव्हा पहिली भेट झाली ती याच वाक्यानं. त्यानंतरही बराच काळ हेच वाक्य सोबत करत राहिलं. त्याप्रमाणे या नगरात भरपूर भटकंती केली, अगदी मूळ निवासी असल्यासारखी. त्यात राजा भेटायचा. प्रधान भेटायचा. राजपुत्र, राजकन्या, महाराणी यांच्याही भेटी व्हायच्या. वातावरण कसं शाही थाटाचं. अद्‌भुत. आपण राजमहालात असल्याचा भास बराच वेळ आपली सोबत करायचा. परंतु आटपाटनगर असतं कसं, याचा कधी विचार केला नाही. त्या नगराचं नावचं आटपाट आहे, असं समजून चालायचो. वास्तविक, आटपाट म्हणजे आठ पेठा असलेलं नगर, ते आटपाटनगर. ही व्याख्या कुणी उघड केली ठाऊक आहे? डॉ. द.ता. भोसले यांनी. 'आटपाटनगरीच्या कथा' या त्यांच्या कथासंग्रहात.

**आटपाटनगरीच्या कथा**

डॉ. द.ता. भोसले




'आटपाटनगरीच्या कथा' या कथासंग्रहात एकूण अकरा कथा आहेत. या कथा आटपाटनगरात घडणाऱ्या कथा आहेत. म्हणजे त्या बालकथा किंवा इसापनीतीच्या कथा आहेत, असा समज होण्याची शक्यता जास्त नाही. या साध्याभोळ्या समजुतीच्या कथा नाहीत. ना पारंपरिक पठडीतल्या. त्या आहेत... आपण कथाच पाहूया. उदाहरणार्थ 'प्रजेच्या सुखासाठी' ही कथा. सर्व सुखसोयी, संपन्नता, वैभवशाली नगरातील जनतेच्या तक्रारी राजापुढे पेश होत आहेत. जनतेला आपल्या तक्रारी राजापुढे मुक्तपणे मांडण्याची मुभा आहे. आणि राजा त्याप्रमाणे जनतेला सुखी करण्यासाठी तत्परतेनं न्याय करतोदेखील. आश्चर्य वाटतं ना! ऐका तक्रारी. ब्रह्मवृंदांचा एक जमाव. त्यांना धार्मिक विधी यथासांग पार पाडण्यात मोठी उणीव भासते आहे ती फुलं आणि तुळशीदलांची. त्यासाठी  त्यांची राजाकडे मागणी आहे, राज्यातील सर्व शेतकऱ्यांनी फुले आणि तुळशीची शेती करावी. किमान एकरभर तरी. दुसरा जमाव मागणी करतो, श्रावणातल्या सोमवारच्या शिवपूजेचं महत्त्व पुण्याचं. तेव्हा सर्व  प्रजाजनांनी त्यांच्याकडे असलेलं दूध वासरांना, बालकांना, वृद्धांना थेंबभरसुद्धा न पाजता शंकराच्या अभिषेकासाठी मंदिरात आणावं. चुलीला सरपण, इमारतीला लाकूड, आणि स्मशानाला लाकूड मिळत नाही म्हणून जंगल तोडण्याची परवानगी हवी, असा तिसरा जमाव मागणी करतो. चौथा जमाव मागणी करतो, शेतीला पाणी देण्याऐवजी आम्हाला गावात दिवसभर पाणी वापरण्यासाठी मिळालं पाहिजे. खुद्द राजाचं लष्कर दुप्पट करावं लागत आहे, त्यासाठी शेतकऱ्यांनी स्वतःकडे जनावरं पाळण्याऐवजी चारा शेतात पिकवावा व तो लष्कराला पुरवावा. राजानं जनकल्याणास्तव सर्व आदेश जारी केले. आणि...

तशीच दुसरी कथा- 'राजा चक्रमसेन महाराजांचा दरबार'. तिथे तक्रार आहे, शेजारचा सद्‌ गृहस्थ रात्रभर खोकतो, त्याचा खोकला तरी बंद करा, नाहीतर त्याची चिलीम. चोर तक्रार करतो, चोरी करण्यासाठी एकाच्या घराच्या खिडकीला लोंबकळलो, तर भिंतच कोसळली अंगावर. हात मोडला माझा. चोरी करता येईना, खिसा कापता येईना. तेव्हा घरमालकाकडून नुकसानभरपाई मिळावी...

अशी प्रत्येक कथा वेगळा विषय घेऊन आलेली आहे. हे विषय, यातले प्रसंग, मानवी स्वभावातले बारकावे, अनुभव, हे कुठून ओढून ताणून आणलेले नाहीत. आपल्या भोवतीचा हा सगळा गोतावळा आहे. फक्त त्याकडे पाहण्याची आपली नजर कशी असावी, हे लेखकानं दाखवलं आहे. नुसती नजर नाही, भाषा सुद्धा किती सहजपणे आपल्या अदाकारीनं भुलवते, तिचा अनुभव घेण्यासारखा आहे, पाहा. महाराजांचा नेम अचूक नाही, त्यामुळे शिकार होत नाही. हा अनुभव सांगताना लेखक लिहितात,'...तुमचा नेम अचूकच आहे. पळणारे जनावरच तुमची गोळी चुकवते, त्याला तुम्ही काय करणार म्हणा?'

'चोरीचं म्हणत असाल तर जगातला प्रत्येकजण चोर आहे. त्याचं काय? तुम्ही वासराचं दूध चोरून स्वतः वापरता. तुम्ही दुधाची चोरी करता. भुंगा मधाची चोरी करतो. शेतकरी फळा-फुलांची चोरी करतो... कराच्या रुपानं साऱ्या जगाकडून पैसा घेणारा राजा केवढा मोठा चोर म्हणावा?' यात विनोद आहे. उपहास आहे. विडंबन आहे. वर्मावर अचूक बोट ठेवण्याचं कसब आहे. त्यामुळे कथा वाचताना वाचक भुलत जावा, दूर जाता जाता हळूच वेशीवर आणून सोडावं, मनोरंजनाबरोबरच वास्तवाच्या उन्हाचं भान जागं व्हावं, हे सारं जुळवणं तसं अवघड. ते सहजी करताना लेखकाचं कसलेपण या कथांमधून जाणवतं.

कथा राजवाड्यात सुरू होतात. पण त्या वावरतात ग्रामीण भागात. तिथला संस्कार, शेती, शेतकरी, जनावरं, जंगलं, सोबत नित्याचे व्यवहार यांचं दर्शन यातून होतं. बोलण्यातही... सूर्य कासराभर वर आला... दुबार नांगरणी करावी तशी... इतका सहजपणा त्यात आलेला आहे. हा सगळाच बाज वेगळ्या पठडीतला आहे. कथेच्या फॉर्मबाबत लेखक स्वतः नमूद करतात, 'माझ्या कथा म्हणजे लोककथांचं तंत्र वापरून, ती आविष्कार पद्धती स्वीकारून, आजचे प्रश्न, आजचं समाजमन.... वर्तमानकाळाची स्पंदनं भूतकालीन साहित्यरूपातून व्यक्त करण्याचा पहिला प्रयोग आहे, असं वाटतं.

सतीश भावसार यांनी कथेचे भावसौंदर्य वर्धिष्णू करणारी चित्रे आणि देखणे मुखपृष्ठ केले.

- **मूल्य १५० रु.  सवलतीत ९० रु.**

# ग्रंथपान




'आंदकोळ' हा शब्द आपल्याला अपरिचित. त्यामुळे कुतूहलाचा. शीर्षकाच्या स्थानावर कुंकवासारखा असा अनोळखी शब्द दिसला की आपली पंचाईत ठरलेली. ना अर्थ ठाऊक, ना कुतूहल गप्प राहू देत. बरं, मुखपृष्ठावरून काही बोध शोधावा, तर चित्रकारही मदतीचा हात देण्याऐवजी निबिड जंगलात सोडणारा. अशावेळी एकच पर्याय उरतो, ते पुस्तक चाळण्याचा, भावले तर वाचण्याचा. त्यातला पहिला पर्याय म्हणजे, लेखकाचे मनोगत. तिथे हे धगेदोरे सापडण्याची शक्यता जास्त. म्हणून पहिल्यांदा ते उघडले तर तिथेही ठेच बसावी असा प्रकार, 'बेड्या तोडताना...' झालं! म्हणजे शब्दाचा अर्थ राहिला बाजुला, आपणच बेड्यात कैद! सुटका होते, ती पुस्तक हातातून खाली ठेवल्यानंतर. त्यातून मोकळे होतात ते हात, पण विषण्ण होते ते मन. भिरभिरत राहते वादळाच्या एका भोवऱ्यात. पत्ताच सापडत नाही, आपण आहोत कुठे, एकविसाव्या शतकात की अश्मकाळात? जगतो आहोत ते काय म्हणून, माणूस की जनावर होऊन? आपण आलोत कुठून आणि जाणार आहोत कुठे? आम्ही उगाच का टेंभा मिरवतो आहोत आपल्या सुधारलेल्या पिढीचा? खाईतून खाईकडे असाच का प्रवास असणार आहे आमचा? भीषण वास्तवाचा विषण्ण काळाकुट्ट काळोख... आणि भणाण सुटलेला वारा. चहूबाजूने. उसकटून टाकणारा. त्याचे नाव आंदकोळ. विषमतेच्या लोळाने कोळसा केलेल्या लोखंडाचे वादळ म्हणजे आंदकोळ... मातीच्या कुशीत स्वतःचे अस्तित्व दडवीत टीचभर पोटाच्या खळगीसाठी पाषाणावर धडका देणारे मजबूत पंखांतले वादळ...

पारधी समाज म्हणजे चोर, हा अखिल समाजाचा समज. माळरानावर पालं पडली, हे कळले तरी हाकलून लावण्यासाठी सारा गाव धावत येतो, तो पारधी नावामुळेच. पंचक्रोशीत कुठेही चोरी झाल्याची तक्रार पोलीस ठाण्यात झाली की, प्रथम गुदरते ती पारधी जमातीवरच. अडाणी, अशिक्षित, शेतजमिनीपासून वंचित, गावापासून दूर फेकलेला, गावाने ओवाळून टाकल्यासारखा हा समाज. उदरनिर्वाहाची कुठलीच साधने नाहीत, कामधंद्यासाठी कुणी विश्वास ठेवायला राजी नाही. मग त्याने जगायचे कसे? आणि अशा जातीत जन्म घेतलेल्या सपुतांचे जगणे ते जगणेच असते का? की गाव आणि पोलीस यांच्या लाथांनी स्वतःला धन्य समजायचे? किसन चव्हाण यांच्या या 'आंदकोळ'ने विचारलेले हे प्रश्न नाहीत, वाचक म्हणून प्रत्येकाला पडतील, ते हेच प्रश्न.

चोरी करणे हा गुन्हा आहे, तो केला. बापाने केला, पूर्वजांनी केला. किसन आणि संजूने केला नाही. त्यांच्या हातात पाटी आणि पेन्सिल मिळाली. ते शिकले. नोकरीला लागले. हे मोठेपण त्यांच्या वाट्याला आले ते आईबापाने दिलेल्या पुण्याईमुळे. जवळून चोरी करणाऱ्यांचे आयुष्य पाहिले. न करणाऱ्याचे पाहिले. पालातल्या आया बहिणींचे हाल पाहिले. काय होते त्यात? पोलिसांचा बेदम मार. कैद. उपासमार. अब्रूचे धिंडवडे. पालात दिवा लावायचाच नाही. गावाला कळेल म्हणून, पोलिसांना कळेल म्हणून. म्हणून का पोलीस यायचे थांबत होते? ते येतच. करून जात, सारे काही. हे सारे जगणे पाहिले होते. त्यामुळे जगणे कळले. त्यातूनच स्फुल्लिंग पेटले, अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे. बेडरपणे. लक्ष्मण माने यांसारखे मार्गदर्शक भेटले, आणि अन्यायाला विरोध करणाऱ्या आवाजाला धार आली. एक नवीच लढाई सुरू झाली. पोलिसापासून, सम्राटांपर्यंत, शासनापर्यंत. किसन ही लढाई जिकण्यासाठी लढत राहिले, लढत आहेत.

लेखक स्वतःच्या जगण्याचे रडगाणे इथे गात नाही. बकरीच्या शेपटासारखी अवस्था झालेल्या पारधी समाजाची तरफदारी करत नाही. एकूण समाज, समाजमन, पोलीसयंत्रणा, राजकीय वरदहस्त, अशा पातळ्यांवर पारधी समाजाविषयीचा असलेला समज आणि त्याखाली भरडला जाणारा हा समाज, याचे दाहक चित्रण त्यांनी आपल्या आवाक्याप्रमाणे चितारण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात सारेच आले असे म्हणता येणार नाही. पण जे आले ते कल्पनेला हादरा देणारे आहे. जे मांडायचे ते मोजकेपणाने मांडले आहे. आपली आई फसगतीत सापडली, पण तिने त्यातून बाहेर येताना इतरांना बाहेर येण्याचा मार्ग दाखवला, हे वर्णन ममतेपोटी केलेले नसून तिच्या ठामपणाचे दर्शन घडवणारे आहे. बापाने केलेल्या चोऱ्या, विकलेली दारू, याचे चित्रण करताना हळवेपणात न हरवता नेमकेपणा जोपासला आहे. सुजाता काळेचा मृत्यू, पेट्रोलपंपावरील दरोडा, अशा कितीतरी घटना आणि आंदोलने, यात आली आहेत. त्यातून प्रत्येक टप्प्यावर भेटलेली माणसे किती प्रकारची होती, त्यांची वागण्याची तऱ्हा कशी मुरलेली होती, त्यांची मासलेवाईक वर्णने केली आहेत, ती निपक्षपातीपणे. आकस न ठेवता. त्यामुळे एकांगीपणाचा आळ या पुस्तकावर करता येणार नाही. त्याचप्रमाणे चोरी करताना पाळायचे संकेत, श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्या आहारी जाण्याचा अतिरेक, इतक्या चोऱ्या करूनही भणंग अवस्थेत जगण्याचे वास्तव, याविषयी कोठे बोटचेपे धोरण न ठेवता परखडपणे लिहिले आहे. त्यात मधूनच म्हणीही येतात, 'अब्रू झाकता येईना आणि माश्याही मारता येईना.' 'घरच्या भाकरी खायच्या अन् फुकट लोकांची ढुंगणं धुवायची.' तर जगण्याचं सूत्र सांगतात, 'हक्क, अधिकार मिळवण्याची भाषा करायची तर ते याचना करून मिळत नसतात. याचना करून मिळते ती भीक... हक्क, अधिकारासाठी लढावंच लागतं... लढायचं तर काळीज खाटीकखान्यात टांगूनच यावं लागतं.'

स्वतःविषयीच्या उदोउदोपणाला वाव देणे शक्य होते, परंतु तसे घडलेले नाही. सच्चा कार्यकर्ता असतो तो इतरांत वावरत असतो. स्वतःकडे पाहण्याचे त्यातून राहून जाते. किसन चव्हाण यांच्याकडून तसेच झाले असावे.

षांताराम पवार यांनी अर्थपूर्ण मुखपृष्ठ तयार केले.

- **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**
**संपर्क : ९८६९२०७४०३**

'लोकांचे लोकांनी लोकांसाठी निवडून दिलेले...' ही आपण चांगलीच पाठ केलेली व्याख्या. लोकशाही म्हटली की निवडणूक आलीच. त्यातून आपली लोकशाही ही जगात सगळ्यात मोठी. त्यामुळे लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधान परिषद असो की ग्रामपंचायत; निवडणूक-प्रक्रिया आलीच. मग ती उमेदवारांची प्रचाराची धावपळ, निवडून येण्यासाठी करावी लागणारी धडपड आपण पाहतो. रांगेत उभे राहून निवडणुकीच्या मांडवाखाली जाऊन मतदान करतो. एक सामान्य नागरिक म्हणून पार पाडायचे पवित्र कर्तव्य ही आपली यापाठची भावना. परंतु हे कर्तव्य पार पाडण्यापूर्वी या प्रक्रियेत असलेल्या अनेक घटकांविषयी आपण जागरूक असतोच असे नाही. निवडणूक-प्रक्रिया पार पाडण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना खास प्रशिक्षण दिले जाते. त्याप्रमाणे ते सर्व प्रक्रिया चोखपणे पार पाडतात. नागरिक म्हणून आपल्याला काहीच करायचे नसते. मतदानकेंद्रावर जाऊन मतदानपत्रिकेवर शिक्का मारायचा. आता मशीनचे बटण दाबायचे. बस्स! खरी गंमत आहे ती इथेच. संपूर्ण मतदानप्रक्रियेशी नागरिकांची नाळ कुठेच जोडलेली दिसत नाही. ना कुणी त्यासाठी प्रशिक्षण घेताना दिसतात. कुठेतरी वर्तमानपत्रातून काही वाचनात आले तर तेच आपले प्रबोधन. नावालाच अधिकार आणि नावाचेच कर्तव्य. घडीभराची नवलाई!




नागरिक, सुजाण नागरिक, जागरूक नागरिक म्हणून ही संपूर्ण मतदानप्रक्रिया आपल्याला ठाऊक असायला हवी. तिचे कायदे तर माहीत असायलाच हवेत. हे नागरिक म्हणून पहिले कर्तव्य आहे. तरच या प्रक्रियेला डोळसपणाचे स्वरूप येऊ शकते. त्यासाठी कुणाकडे मदत मागायची वा कुठे हेलपाटे मारण्याची गरज नाही. कायदे आणि प्रक्रिया समजावून सांगणारे पुस्तकच आता आपल्या हाती आले आहे. त्याचे नाव आहे, 'निवडणूकविषयक कायदे आणि प्रक्रिया'. त्याचे लेखक आहेत, दिलीप शिंदे, जे स्वतः याच प्रक्रियेत गेली अनेक वर्षे सक्रिय आहेत.

मतदार, मतदार याद्या, ओळखपत्र, मतदानकेंद्र, मतदान कर्मचारी, मतदानाची पद्धत, मतदानकेंद्राचा परिसर, निवडणुकीला उभा राहू इच्छिणाऱ्या उमेदवाराची पात्रता आणि अपात्रता. त्याचा उमेदवारी अर्ज, उमेदवाराने पाळायचे नियम आणि त्यातून होणारे गुन्हे. निवडणुकीच्या दरम्यान लागू करण्यात येणारी आचारसंहिता आणि तिचे स्वरूप. प्रचाराचा भाग म्हणून करण्यात येणारे वसाहतीचे विद्रुपीकरण, मतदानाच्या दिवशी हजर राहणे शक्य नसेल तर टपाली मतदान, निवडणूक आयोग; असे अनेक विषय आहेत, ज्यांची माहिती प्रत्येक नागरिकाला माहीत असणे आवश्यक आहे. त्यातच आता भर पडली आहे ती नवीन मतदान मशीनची. त्याच्या कार्यपद्धतीबद्दल आपण अनभिज्ञ आहोत. पण या पुस्तकात त्याची संपूर्ण माहिती दिलेली आहे. हल्लीच एका राजकीय नेत्याच्या निमित्ताने 'पेड न्यूज' नावाचा खटला न्यायालयात सुरू आहे. त्या विषयीचा कायदा, आणि लोकप्रतिनिधी कायदा, यांची माहिती लेखकाने या पुस्तकात दिलेली आहे. त्यांचा उपयोग केवळ मतदारालाच नव्हे तर उमेदवारालाही चांगल्या प्रकारे होऊ शकतो. नव्हे उत्तम उमेदवार कसा असावा याचे भान उमेदवारालाच येऊ शकेल.

सुजाण आणि जागरूक मतदार, योग्य उमेदवार आणि उत्तम मतदानप्रक्रिया यांचा योग्य समन्वय राखण्यासाठी 'हँडबुक' म्हणून या पुस्तकाचा नक्कीच चांगला उपयोग होऊ शकेल. यातील माहितीबरहुकूम सर्वच प्रक्रिया पार पडली तर त्यातून जे जे उत्तम असेल तेच घडेल.

यातील लेख यापूर्वी वर्तमानपत्रातून लेखमालेच्या स्वरूपात प्रसिद्ध झालेले आहेत. सहजसोपी लेखनपद्धती वापरल्यामुळे विषय बोजड असूनही वाचनीय झालेला आहे. संसदभवन आणि विधानभवन यांच्या प्रतिकृती ठळकपणे दाखवून गोलाकारात मतदान केलेल्या बोटाची निशाणी दाखवली आहे. तीही तिरंगी रंगांचा पार्श्वभागी उपयोग करून. समोरच संसदभवनावर तिरंगा आहे आणि अंगठ्याजवळ विधानभवनावरील राजमुद्रा आहे. रघुवीर कुल यांचे हे मुखपृष्ठ विषयानुरूप उठावदार झाले आहे.

- **मूल्य ८० रु. सवलतीत ५० रु.**

# ग्रंथपान

गझलचा 'शेर', म्हटले तर दोन ओळींची रांग. म्हटले चरण श्लोकासारखे. पण त्याची ताकद? ऐकणाऱ्याच्या मुखातून येते, क्या बात है!

'दीपदान' हे अशाच काही निवडक शेरांचा संग्रह असलेले पुस्तक. हे शेर आहेत सुरेश भट यांच्या गझलसंग्रहातील. 'रूपगंधा', 'रंग माझा वेगळा', 'एल्गार', 'झंझावात', 'सप्तरंग', आणि 'रसवंतीचा मुजरा' हे त्यांचे संग्रह. या संग्रहांमधून काही निवडक शेरांची निवड केली आहे चंद्रशेखर सानेकर यानी. सानेकर स्वतः गझलकार आहेत. त्यांच्या नावावरही पाच गझलसंग्रह प्रकाशित आहेत. 'एका उन्हाची कैफियत', 'एका शहराच्या खुंटीवर', 'नभाशी बोलण्यासाठी', 'माझ्या काळाचा अनुवाद', 'एक अजब कोलाहल' ही त्यांची नावे. आजच्या पिढीतल्या एका तरुण गझलकाराने आदर्श असणाऱ्या पिढीतल्या, गझलचा बादशहा समजल्या जाणाऱ्या एका गझलकाराच्या काही शेरांना वाचकांच्या समोर मांडण्याचा प्रयत्न 'दीपदान'मध्ये केला आहे. 'दीपदान' हा शब्द सुरेश भट यांचाच, फुलावयास लागलीस...या गझलेतील. 'एल्गार'मध्ये आहे ही गझल. तिची आठवण सानेकर पहिल्याच पानावर नोंद करतात,

*म्हणू नका आसवांत माझे बुडून केव्हाच स्वप्न गेले*
*उदास पाण्यात सोडलेले प्रसन्न ते दीपदान होते*

सानेकरांनी मुक्तपणे भटांच्या शेरांची निवड केलेली आहे. ती करताना शेरातला एक शब्द निवडला. त्या शब्दाची गुंफण करून जे शेर भटांनी लिहिलेले आहेत ते वेचून काढले. यात येणाऱ्या भावभावना, संवेदना, कल्पना, हेतू वेगवेगळे आहेत. त्यांची शैली, आकृतिबंध, सौंदर्य, लावण्य प्रत्येकागणिक वेगवेगळे आहे. एकाच नावाच्या माणसांचा एक समूह करावा तसे. तरीही प्रत्येकाचे रूप वेगळे दिसते, तशी एकाच शब्दाची अनेक रूपे अनुभवास येतात. भटांचा अख्खा संग्रह वाचून मिळणारा आनंद, आणि एकाच विषयास अनुसरून एकत्रित आलेल्या शेरांमुळे होणारा आंनद हा सारखाच असू शकणार नाही. परंतु कल्पनेचा आणि प्रतिभेचा विलास याची वेगळीच अनुभूती येथे प्रत्ययास येते, हे नाकारता येत नाही. चित्रप्रदर्शनात असे प्रयोग पाहायला मिळतात. एकाच विषयावर चितारलेली विविध रूपे मोहून टाकणारी असतात, हा आपला अनुभव आहेच. दीपदानातला अनुभव उदाहरणार्थ पाहूया.

**दीपदान**
सुरेश भट यांच्या प्रकाशित गझलांमधल्या काही निवडक शेरांचं संकलन
संकल्पना, निवड, संपादन
**चंद्रशेखर सानेकर**



सुरेश भटांच्या अनेक शेरांमध्ये आलेला एक शब्द म्हणजे 'ओठ'. त्यातले दोन शेर असे,

*चुंबिलास तू माझा शब्दशब्द एकांती*
*ओठ नेमके माझे टाळलेस का तेव्हा*

दुसरा शेर,

*सकाळी तू उन्हापाशी जरी केलास कांगावा*
*तरीही खूण चंद्राची तुझ्या ओठावरी होती.*

अशी विविध भावभावनांची रूपे दाखवणारे तेरा शेर सानेकरांनी निवडलेले आहेत.

'शब्द'–

तू मला अर्थ दे अजून तरी
शब्द ओलांडले तुझ्यासाठी
आणि

*दिले माझ्याच दुःखाने तुझे लावण्य शब्दांना*
*फुलांवाचून मी साऱ्या फुलांचे बांधले झेले*

'शब्द' या शब्दाचे अठरा शेर आहेत.

'आयुष्य'–

*टाळले त्याला, तरीही गाठले त्याने मला*
*वागले आयुष्य माझे सावकारासारखे*

'आयुष्य' या शब्दाचे आठ शेर निवडलेले आहेत.

स्वप्ने, चांदणे, आकाश, फुले, सुगंध, तारुण्य... असे अनेक शब्द आहेत, ज्यांच्याभोवती सुरेश भट विविध अंगांनी भिडलेले आहेत. त्यांच्या अनेक छटा एकत्रितपणे या संग्रहात अनुभवास येतात, कॅलिडोस्कोपप्रमाणे.

सानेकरांनी प्रत्येक विषय सुरू करताना आरंभी एक काव्यांश दिलेला आहे आणि त्यात योजित शब्द चपखलपणे योजलेला आहे. शीर्षक शब्दकाव्य अशा अर्थाने. तो चटकन ओळखता यावा म्हणून मुद्दामच त्याला इतरांपेक्षा थोडा गडद अन् ठळक केलेला आहे. शेर कुठल्या संग्रहातून घेतला आहे, त्याचे नाव त्या शेरापुढे दिले आहे. ही निवड करताना भटांचे संग्रह ज्या क्रमाने प्रकाशित झाले त्या क्रमाने शेर आलेले आहेत. मांडणी करताना काही पानांवर तीन शेर आहेत, काहींवर आठ.

भटाच्या काव्यसंग्रहांचा सानेकरांनी घेतलेला धांडोळा हा केवळ शेर वेचण्यापुरता मर्यादित नाही. प्रत्येक संग्रहाचा ते साकल्याने वेध घेताना दिसतात. संग्रह प्रकाशित होण्याचा क्रम, प्रत्येकात आलेली सूक्ष्म संवेदना, अंतर्मुख जाणीव, भावनांची अभिव्यक्ती, चिंतन–मनन, गती, व त्यात कालानुक्रमे होत गेलेले बदल यांचाही पोत ते उलगडून पाहतात. भटांच्या गझलेची प्रकृती ही त्यांच्या स्वभावाशी साम्य राखणारी आहे. 'भट स्वतः उत्कट, सडेतोड आणि रोखठोक होते. तसा त्यांच्या काव्याचा पोत तीव्र आवेगी, उत्कट, सडेतोड आणि रोखठोक दिसतो', असे ते नमूद करतात. भट लोकानुनयी नाही लोकाभिमुख कवी होते. ते जीवनवादी कवी होते. भटांचे शेर कसे आहेत, याविषयी सानेकर उत्कटतेने भावना व्यक्त करतात.

गझल आणि शेर याबाबत सुरेश भट यांची काय मते होती, हेही समजून घेण्यासारखे आहे. भट, एल्गारच्या कैफियतीत म्हणतात, 'गझल म्हणजे एक तत्त्वज्ञानच आहे. आणि ती एक जीवनशैलीही आहे. जेव्हा आपण जीवनाच्या विविध चवी घेत असतो तेव्हा आपण गझलच जगत असतो. एकेक शेर म्हणजे जगण्याची चव, एकेक प्रत्यय'. तर 'रंग माझा वेगळा' मध्ये सांगतात,'शेरात जे सांगायचं आहे ते त्याची प्रस्तावना ही पहिली ओळ असते; तर दुसरी ओळ म्हणजे पहिल्या ओळीतील प्रस्तावनेचा प्रभावी समारोप असतो'.

भटांची प्रकृती आणि शैली, त्यांची प्रतिभा या सगळ्याचा वेध सानेकरांनी घेतला आहे. त्यासाठी त्यांनी दीर्घ प्रस्तावना दिलेली आहे. ही प्रस्तावना या शेरांइतकीच दमदार आणि समर्पक झालेली आहे. 'दीपदान' या शीर्षकास अनुसरून सतीश भावसार यांनी साकारलेले मुखपृष्ठ आशयसंपन्न तर आहे.

• **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

डॉ. रामाणी यांची पुस्तकांची मालिका पाहिली तर, ती उत्तम आरोग्याची गुरुकिल्ली ठरावीत, अशीच आहे. त्याच मालिकेतील नवे पुस्तक, 'चाला, पळा, धावा.'

आरोग्य उत्तम राखण्यासाठी डॉक्टरकडेच उपाय आहेत, या समजाला छेद असा, की डॉक्टरी उपाय हे ३० टक्के तर स्वतः अंगिकारलेले उपाय ७० टक्के आहेत. ते प्रत्येकाच्या हातात आहेत. त्यापैकी एक आहे, 'चाला, पळा आणि धावा.'




या पुस्तकाच्या तपशिलाकडे वळण्यापूर्वी काही वाक्ये पाहू. जी उपदेश नाही, आपला आपल्याशीच सल्ला दिल्यासारखी भासतील. पण हे लक्षात असावे की, ही वाक्ये अनुभवातून आलेली आहेत.

'केवळ निश्चयी व्यक्तीच कोणत्याही गोंधळाच्या प्रसंगी ठाम निर्णय घेऊन तो अमलात आणू शकते.'

'सुदृढ शरीर आणि उत्कृष्ट मानसिक ताकद या दोन्ही गोष्टींचे मिश्रण असणाऱ्या व्यक्ती आयुष्यात फार लांबचा पल्ला गाठू शकतात. आणि अशा प्रकारचे मिश्रण जॉगिंगमुळे साध्य करता येऊ शकते.'

'जॉगिंग ही एक अशी क्रिया आहे, की जिचा तुम्ही तुमच्या संपूर्ण कुटुंबासमवेत आनंद घेऊ शकता. जे कुटुंब एकत्र धावते ते नेहमी एकत्र राहते.'

'धावण्याकडे केवळ छंद म्हणून न पाहता त्याबद्दल तळमळ ठेवा. त्यामुळे अंगी शिस्त आणि समर्पणवृत्ती बाणवणे सोपे जाईल.'

पुस्तकाच्या शीर्षकावरून लक्षात यावे की, ते आपल्या नेहमीच्या परिचयाच्या व्यायामाबाबत काही तपशील घेऊन आपल्याशी हितगुज करायला आलेले आहे. आपली शारीरिक, मानसिक स्थिती उत्तम राखण्याचा सोपा मंत्र घेऊन आले आहे. त्यासाठी काय करायला हवे? १. जॉगिंगसाठी सकाळी लवकर उठायला हवे. याची सवय करायला हवी. जॉगिंगचे लक्ष्य निश्चित करायचे. २. कुठल्याही परिस्थितीत आठवड्यातून किमान चार वेळा तरी जॉगिंगचा नियमित सराव ठेवावा. ३. व्यायामाची जागा निवडण्यावर कोणत्याही मर्यादा नाहीत.जेवणानंतरची १५ मिनिटे सोडली तर केव्हाही धावण्याचा सराव करण्यास सज्ज होऊ शकता. ४.नियमित सराव व चिकाटी या नियमांचे पालन करणे महत्त्वाचे असते.५. ग्रुपमध्ये जॉगिंग करण्यात एक वेगळीच मजा असते. त्यामुळे शक्य होईल तेव्हा आपल्या मित्रमैत्रिणींनासुद्धा जॉगिंगकरिता उद्युक्त करावे. व त्यांच्यासह जॉगिंगचा आनंद घ्यावा. ६. सरावापूर्वी व नंतर ५ मिनिटे नियमितपणे केलेले स्ट्रेचिंग शरीराचा लवचीकपणा राखून ठेवेल. त्यासाठी आठवड्यातील ३० मिनिटांची किमान दोन सत्रे वेगळी राखून ठेवणे आवश्यक आहे. किती सोप्पे!

एखादी गोष्ट शिकायची, हौस म्हणून करायची, तरी तिचे प्रकार, नियम, पद्धती माहीत असणे आवश्यक असते. त्यातले काही प्रकार इथे दिलेले आहेत. जे नियमितपणे सराव करतात त्यांना ते माहीत असेलही. तरी पूर्ण तपशील माहीत झाला तर तो फायदेशीर ठरू शकतो. पाहूया ते प्रकार : फ्लेक्सिबिलिटी ट्रेनिंग, कोअर स्टॅबिलिटी ट्रेनिंग, स्ट्रेंग्थ ट्रेनिंग, क्रॉस ट्रेनिंग, म्हणजे काय, याचे प्रकार कोणते आणि ते करण्याची कृती दाखवणारे फोटो दिलेले आहेत. त्यांचे प्रमाण, फायदे दिलेले आहेत. जॉगिंगचे वेळापत्रक, जॉगिंग शूजची निवड, जॉगिंग आणि पल्स रेट, लाँग रन आणि क्वालिटी रन, अधिक वेगाने धावण्याकरता टिप्स, चढाव किंवा टेकडीवरील प्रशिक्षण, जॉगिंगमधील शिस्त आणि योग्य प्रमाणातील सराव, जॉगिंगसाठी मार्गदर्शक तत्त्वे, मॅरेथॉनचा दिवस... हे सारे कुणाही धावपटूसाठी उपयुक्त ठरणारे आहे. त्यात 'मॅरेथॉन धावकाकरता जल आणि आहार योजना' हे प्रकरण आवर्जून ध्यानात ठेवावे असे आहे.

डॉ. रामाणी स्वतःचा अनुभव इथे नमूद करत आहेत. किंबहुना हे पुस्तक त्यावरच आधारलेले आहे. परंतु जोडीला आणखी काही अनुभवी व्यक्तींचे अनुभव दिलेले आहेत. ते आहेत सुनील शेट्टी व संगीता शेट्टी. यांनी त्यांचा अनुभव त्यांच्याच शब्दात दिलेला आहे. २४ तासात अनुक्रमे १३८ व १२० किमी चालण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. डॉ. आंनद पाटील, परेश संघवी, किशन कुमार, डॉ. पाब्लो इरॅट, इंदिरा बेकरीकर, डॉ. दीपक उग्रा पिडियाट्रिक फिजिशियन. यांचे अनुभव कुणालाही नक्कीच प्रेरक ठरतील.

एकूणच हे पुस्तक म्हणजे जॉगिंग करणाऱ्यांसाठीच नव्हे तर आपल्या आरोग्याची काळजी घेऊ इच्छिणाऱ्या सगळ्यांसाठी उपयुक्त ठरू शकेल.

- **मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

# ग्रंथपान

**दैवी प्रतिभेचा कलावंत**
**मायकेलअँजेलो**
डॉ. माधवी मेहेंदळे




'शिल्पकार फक्त प्रतिकृती करणारा कलाकार नाही. प्रत्येक कलाकार त्याचं स्वतःचं नवं काहीतरी प्रतिकृती करतानाही देतच असतो.'

'स्थापत्यकार हा उत्तम शिल्पकार असला पाहिजे. तो जर शिल्पकार नसेल तर तो फक्त रिकाम्या निर्जीव भिंती उभ्या करू शकतो. तो शिल्पकार असेल तर तो उत्तम सजीव वास्तुशिल्पाची निर्मिती करू शकतो.'

मायकेलअँजेलो हा शिल्पकार होता, चित्रकार होता, कवी होता. ही वरवरची माहिती त्याने निर्माण केलेल्या कलाकृती पाहिल्यानंतर लक्षात आली होती. परंतु ही ओळख फार जुजबी आणि तात्पुरत्या स्वरूपाची होती. त्याच्या या कलाकृती पाहिल्यानंतर त्याच्याविषयीचे कुतूहलही मनात होते. त्याला पूर्णविराम मिळाला तो हे पुस्तक हाती आले तेव्हा.

यात मायकेलअँजेलो कोण होता, कसा घडत गेला, हे ओघाने येतेच. प्रत्येक कलाकृती कशी निर्माण केली, त्याचा इतिहास आणि तपशील त्यामुळे कळत गेला. परंतु थबकण्याची वेळ येते ती शिल्पकार शिल्प घडवताना कसा विचार करतो?

एक मनोरंजक उदाहरण या संदर्भात पाहण्यासारखे आहे. डेव्हिड-गोलायथच्या युद्धाचा प्रसंग. यावर अनेक शिल्पे आणि चित्राकृती यापूर्वी निर्माण झालेल्या होत्या. परंतु हे काम त्याने स्वीकारले आणि ते कसे पूर्ण केले, याचे हे उदाहरण.

'डेव्हिड हा मेंढपाळाचा मुलगा. सॉल राजाला आणि त्याच्या राज्याला त्रास देणारा गोलायथ नावाचा महाकाय राक्षस. त्याच्याशी लढण्याचे आव्हान डेव्हिड स्वीकारतो. आणि त्यावेळच्या शस्त्राप्रमाणे गोफणीने दगड मारून तो गोलायथला ठार करतो व त्याचे मुंडके राजाला नेऊन देतो.' या प्रसंगाची उभारणी करायची आहे. ती करताना तो विचार करतो, डेव्हिडमध्ये काय आहे? त्याचे वयानुसार कोवळेपण आणि पौरुष. तो कुणाचे प्रतीक आहे? गोलायथला मारण्यापूर्वी त्याच्या मनात कोणते भाव असतील? किंचित भीती, थोडासा तणाव, की द्विधा मनःस्थिती? गोलायथचे मुंडके पायाशी पडलेले दाखवायचे की, फक्त मारताना दाखवायचे? दोघे दाखवायचे की एकटा? पण सर्व प्रसंग उभा करणारा, शेवटी तो एकटाच डेव्हिड दाखण्याचा निर्णय घेतो. परंतु पूर्ण प्रसंगाला न्याय देतो.

शिल्प उभे करण्यापूर्वीची जी मानसिक तयारी लागते, तिचे वर्णन हे शिल्पकाराच्या दूरदृष्टीचे, मोठेपणाचे, अचूकतेचे आणि कल्पकतेचे द्योतक म्हणायला हवे. तीच तऱ्हा शिल्पासाठी उपयोगात आणायच्या संगमरवरी शिळेची. तिला पारखण्याची.

मायकेलअँजेलो हा कसबी शिल्कार होता. त्याचे कौशल्य वाखाणण्यासारखे होते. परंतु त्याचवेळी त्याचा स्वतःवर असलेला दृढविश्वास आणि आपण एक काम किती वेळेत पूर्ण करू शकू आणि ते कसे पूर्ण करू याच्या कल्पना स्पष्ट होत्या. वास्तविक लिओनार्डो द व्हिंची त्याच्यासमोर होता. त्याच्यासारख्या महान कलावंताशी स्पर्धा करणे सोपे नव्हते. तरीही त्याच्याशी स्पर्धा न करता स्वतःच्या कामावर त्याने लक्ष केंद्रीत केले. पोपच्या आग्रहाखातर त्याने सिस्टाईन चॅपेलच्या छतावरचे रंगकामही केले. मेहनत करण्यावर प्रचंड विश्वास असलेला, तरी आपल्याला काय येऊ शकणार नाही याची कबुलीही तो देतो. ज्याची जबाबदारी घेतो, ते पूर्ण करण्यासाठी दिवसाचे २४ तास त्याला २८ हवे असतात. हा कलावंत स्वतःला विसरून काम करतो. ते पाहून थक्क होतो.. विशेष म्हणजे होणारे श्रम आणि आलेले विचार यांना तो वाट करून देतो ते काव्यात.

चरित्रलेखनासाठी आवश्यक असणारी सामुग्री मिळवून ते लिहिणे सोपे म्हणता येईल. परंतु एखाद्या चित्रकार, शिल्पकार असलेल्या कलावंताचे चरित्र लिहायचे तर नुसती सामुग्री उपयोगी नाही. त्याचे विविध पैलू, प्रत्येक कलाकृती मागची मानसिकता, तिच्यातले सौंदर्य, विश्लेषण, काव्य, तत्त्वज्ञान समजून घ्यावे लागते, त्याचा अभ्यास करावा लागतो. हे श्रम पेलण्याचा वकूब असेल तरच त्या चरित्राला न्याय मिळू शकतो. त्या दृष्टीने विचार केला तर, लेखिकेचे कर्तृत्व सिद्ध झाले आहे असे ठामपणे म्हणता येते.

कलावंताने केलेल्या कलाकृतींचे वर्णन अधिक स्पष्ट करण्याची गरज नसते. ती कलाकृती समोर ठेवली की सगळी वर्णने, तपशील फिके पडतात. त्याचा अनुभव यात दिलेल्या फोटोवरून येतो. यासाठी मायकेलअँजेलोने किती आणि कशी मेहनत घेतली, याचा उलगडा होत जातो. परंतु त्याचवेळी या कलाकृतींकडे पाहण्याची आपली दृष्टीही तयार होते. अतिशय सुंदर कलाकृती त्याने निर्माण केलेल्या आहेत. त्यामागची प्रेरणा आणि तपशील वाचल्यानंतर, कलाकृतीचे सौंदर्य कशात आहे याचा उलगडा हात जातो, आणि आपणच त्यात अधिक गुंतत जातो. लेखिकेने घेतलेले परिश्रम आणि लेखनातील सहजता, यामुळे मायकेलअँजेलो जवळचा वाटू लागतो. मायकेलअँजेलोच्या कलाकृतीचे सौंदर्य दर्शवणारे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी तयार केले.

- **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान




आत्मचरित्र वाचण्यात उत्सुकता असते ती चरित्रकारास समजून घेण्याची. तसे त्या काळाचे वास्तव, भवताल आणि सहचलांच्या उमलण्याफुलण्यात गुंतलेल्या धाग्यांची वीण, कर्तृत्वाची पाऊलवाट महामर्गाला कशी मिळाली याचे कुतूहल असते. थोडक्यात, आत्मचरित्र हा आरसा असतो, व्यक्तींचा, समाजाचा, गावाचा, काळाचा, इतिहासाचा, भूगोलाचा. अनेक छटा, आपण पाहू तशा. शोधू तशा. आत्मचरित्र म्हणजे केवळ जंत्री नसते व्यक्तिगत पातळीवरील  कुटुंबातील व्यक्तींची, नात्यांची, प्रसंगांची, घटनांची. तो असतो ठेवा, काळाचा, भूतकाळाचा भविष्यासाठी. म्हणून त्याचे महत्त्व मोठे असते, कुठल्याही रुमालात बांधून ठेवलेल्या दप्तरासारखे, बखरीसारखे. 'लांबा उगवे आगरी' हे आत्मचरित्र या प्रकारातले. सर्व संदर्भांचे सार सामावलेले. ज्याची सुरुवात होते ती शीर्षकापासून. लांबा या शब्दापासून.

डॉ. म.सु.पाटील, यांचे हे आत्मचरित्र म्हणजे एक निर्मळ निरीक्षण आहे. त्यात स्वतःचेच आत्मपरीक्षण आहे. आपले गाव, पीकपाणी, आपला समाज, रीतिरिवाज, संस्कार याचे वर्णन करताना, घरच्या परिस्थितीचे, तिच्यावर मात करण्यासाठी चाललेल्या धडपडीचेही वर्णन करतात. परिस्थिती माणसाला कशी अकाली प्रौढ व्हायला भाग पाडते, आणि त्याचवेळी स्वतःच्या अस्तित्वाला जपण्यासाठी कसे बळ शोधावे लागते, याचेही वर्णन ते सजगपणे करतात. स्वतःच्या हरवलेल्या लहानपणापासून ते मुलींच्या जपलेल्या लहानपणापर्यंतचा कौटुंबिक प्रवास आंतरिक ओलाव्याने आणि तितक्याच तटस्थेने टिपलेला आहे. एक गिरणी कामगार, कारकून, शिक्षक, आणि नंतर प्राचार्य असा चढता आलेख या जगण्याने पाहिलेला आहे, त्यात जगणे आणि सोसणे किती, याचेही भान वेळेवेळी व्यक्त झाले आहे. या प्रवासात भेटलेल्या शैक्षणिक संस्था, गिरणी, शाळा, कॉलेज, संस्थाचालक, व्यवस्थापन यांचे अनुभव आलेले आहेत. आणि त्याचवेळी एक वाचक, लेखक, समीक्षक, व्याख्याता, संपादक आणि मार्गदर्शक यांचा झुलणारा आंतरिक हिंदोळा कधी आकाशाला गवसणी घालू पाहतो, तर कधी जमिनीची आस त्याला आपल्याशीच धरून ठेवते, याचेही वर्णन येते.

जीवनाला आकार देणारे रामजी मास्तर, सावंत मास्तर, निळूशेट, डॉ. केणी, आई–वडिलांची अगतिकता, सुजाण आणि सुस्वभावी पत्नी विभावरी, कन्या, यांच्याविषयीचा तपशील हा पाटलांच्या जिव्हाळ्याचा गाभा म्हणता येईल. स्वतः लेखक असूनही कवयित्री, लेखिका असलेल्या नीरजाचे लेखन अधिक सकस कसे आहे, याचे कौतुक करताना स्वतःच्या नात्याचा बंध आडवा येऊ दिलेला नाही. कवी कुसुमाग्रज, कवी ग्रेस, गंगाधर पाटील, पुरुषोत्तम पाटील, डॉ. यशवंत पाठक, किशोर पाठक, रमेश वरखेडे आणि साहित्यक्षेत्रातील अनेक मान्यवरांची भेट या आत्मचरित्रातून आपल्याला होते. त्यांचे आपसांतले नाते, संबंध, साहित्यप्रेम, यांचा चढउतार मनोरंजक आहे.

खारेपाटातले गाव ते मुंबई, मालेगाव, मनमाड, पुन्हा मुंबई असा जीवनप्रवास झाला; तसा लेखक म्हणून स्वतःचा प्रवास कसा झाला, साहित्यातला आशय, बंध, विश्व, सौंदर्य आणि समीक्षा यांच्याशी सख्य कसे जडले, याकडे लेखकाच्या तटस्थ वृत्तीने आणि तितक्याच आपुलकीने त्यांनी स्वतःकडे पाहिलेले आहे. 'अनुष्टुभ', 'कवितारती'ची जडणघडण, पत्नीच्या नावे सुरू केलेला विभावरी पाटील पुरस्कार, वाचन, लेखन आणि निवृत्तीच्या काळाला सार्थकी लावण्याची ओढ, यातून लेखकाचा जगण्याकडे पाहण्याचा, जगण्याला समृद्ध करण्याचा सकस दृष्टिकोन दिसून येतो. हे आत्मचरित्र वाचत असताना 'एक झाड आणि दोन पक्षी' या विश्राम बेडेकरांच्या आत्मचरित्राची आठवण होते.

रविमुकुल यांचे मुखपृष्ठ पाहताना वाटते ते शीर्षकाला साद घालत आहे.

- **मूल्य ३५० रु.  सवलतीत २१० रु.**

# ग्रंथपान

'प्रेम हे ध्येयासारखंच असतं! मृत्युदंडानंही न मरणारं!'

'आम्हा कुणासाठीच आयुष्य सोपं नाहीय; पण त्याचं काय एवढं? आपल्याला हवा चिवटपणा आणि आत्मविश्वास. आपल्याकडे काही देवदत्त गुणांची देणगी आहे हा विश्वास हवा; अन् त्या गुणांचा उत्कर्ष, काहीही किंमत द्यावी लागली तरी साधलाच पाहिजे.'

ध्येय आणि प्रेम यांची ही तुलना नाही, जगण्याला आशय देणाऱ्या सूत्राची गुंफण आहे. ध्येयाकडे जाणारा रस्ता खडतर असतो. अपयशाची कसोटी पाहणारे काटे तर पावलोपावली पसरलेले असतात. यश नावाचे शिखर तर इतके दूर असते की, नजर पुरू नये. तरीही सगळ्या संकटांवर मात करून शिखरावर पोचण्याचे ध्येय साकारणारे आहेतच. त्यात आहेत मादाम आणि पिएर क्युरी. रेडियमचा शोध लावणारे. संशोधनानंतर वाट्याला येतात अनेक सन्मान, अगदी डॉक्टरेट ऑफ सायन्सेस आणि नोबेल! पण त्यापूर्वी? त्यानंतर? मादाम होती तशीच राहिली. ध्येयाने झपाटलेली, ध्येयासाठी जगणारी. ध्येयातच बुडालेली. सगळ्या कसोट्या पार करीत. अगदी पिएर क्युरी काळाच्या पडद्याआड अचानक गेले, त्यानंतरही.




मादाम क्युरी कोण होती? पोलंडची राजधानी वॉर्सा येथील एका गरीब शाळा मास्तराची मुलगी, मारिया ऊर्फ मान्या. रशियन झारच्या जुलमी राजवटीत मातृभाषेलाही पारखी झालेल्या जनतेची एक प्रतिनिधी. बुद्धिमत्तेची दैवी देणगी असूनही गरिबीत भरडली गेलेली. ध्येय गाठायचेच या जिद्दीने ती फ्रान्स गाठते आणि आपल्याला काय करायचे आहे, या निश्चयाशी पोचते. त्याचीच कास धरते आणि ठरते फ्रान्सच्या सार्बोन विद्यापीठातून डॉक्टरेट मिळवणारी पहिली महिला भौतिकशास्त्रात पदवी मिळवणारी पहिली, नोबेल मिळवणारी पहिली, नोबेलवर दोन वेळेस नाव कोरणारी पहिलीच महिला!

कुठल्याही सुविधा नाहीत, आर्थिक पाठबळ नाही तरी रेडियमचा शोध लागल्यानंतर 'पेटंट'ची मक्तेदारीही तिने उधळून दिली. आपले ज्ञान जगासाठी खुले केले. ज्यावेळी रेडियमच्या १ ग्रॅमची किंमत होती ७५०,००० सोन्याचे फ्रँक्स! तिने प्रसिद्ध केलेले खंडप्राय ग्रंथ म्हणजे, 'ट्रीटाइज् ऑन रेडियोॲक्टिव्हिटी' आणि 'वर्क्स ऑफ पिएर क्युरी'.

मादाम प्रेमळ होती. संस्कारात वाढलेली होती. घरच्या जबाबदारीचे भान ठेवणारी होती. प्रचंड बुद्धिमत्तेचे देणे लाभलेली होती. अखेरपर्यंत ती तशीच कुटुंबवत्सल राहिली. देश, आपले शोध, आपली माणसे, सहकारी सगळ्यांशी तिचे नाते होते आपलेपणाचे. ती एक मुलगी होती, तशी बहीण होती, प्रेमिका- पत्नी होती आणि संशोधिकाही होती. या सगळ्याच नात्यांचा, तिने केलेल्या संशोधन कार्याचा वेध घेतला आहे, ईव्ह क्युरीने, मादामच्या कन्येने. तसे काम अवघड होते. परंतु तिने परीश्रमपूर्वक नेटाने पूर्णत्वास नेले. त्या पुस्तकाचे नाव, 'मादाम क्युरी'.

चरित्रलेखन करताना अनेक तपशिलांची आवश्यकता असते. व्यक्तिरेखा उभी राहील, कर्तृत्व, गुणदोषासहित तिचे व्यक्तिमत्त्व ठळकपणे अधोरेखित होईल, हे पाहावे लागते. यासाठी उपयुक्त ठरल्या त्या मादामने करून ठेवलेल्या नोंदी, केलेला पत्रव्यवहार, जवळच्या माणसांनी जतन करून ठेवलेल्या आठवणी. त्यांचा उपयोग करून चरित्रलेखन केले असले तरी, लेखिका त्याविषयी भूमिका स्पष्ट करते, की 'तिच्या जीवनकहाणीत माझ्या पदरची किंचितही वेलबुट्टीची किंवा नक्षीची भर घातली, तर तो गुन्हाच ठरेल. गरजेच्या एखाद्या वाक्याचीदेखील मी माझ्या मनानं मोडतोड केलेली नाही. सत्य तेवढंच कथन केलंय...'

यासाठी पुस्तकाची प्रस्तावनाच वाचायला हवी.

एक मात्र मान्य करावे लागेल, लेखनात आलेला तरलपणा हा मातृभक्तीपेक्षा व्यक्तिरेखा, कर्तृत्व आणि संशोधन यांच्या अजोडपणाशी जोडणारा आहे. जणू मादामने स्वतः लिहिल्यासारखा. तोच तरलपणा अश्विनी भिडे-देशपांडे यांच्या मराठी अनुवादातही तसाच उतरलेला आहे. वास्तविक संशोधनाचा विषय येतो तेथे तर निरसपणाची ओसाड जमीन लागण्याची शक्यता खूप असते. परंतु तसे झालेले नाही. लेखन करताना ते भान राखलेले आहे. त्यामुळे एक चांगले चरित्र वाचल्याचा आनंद हे चरित्र देते.

या चरित्राची तीन भागांत विभागणी केलेली आहे. आत मोजकेच फोटो दिलेले आहेत. परंतु मुखपृष्ठावरील मादामचा लक्षणीय फोटोच सर्व फोटोंची जागा घेत असल्याने त्यांची उणीव भासत नाही.

- **मूल्य ४०० रु. सवलतीत २५० रु.**

# ग्रंथपान




'आनंदनक्षत्र' या शीर्षकात आनंद आहे तसे नक्षत्र आहे. दोन्हीही मनाला उभारी देणारे, उल्हसित करणारे शब्द. त्यात भर पडली ती मुखपृष्ठावरील सजावटीची. मेघांच्या निळ्या छायेत फुलपाखराचे पंख लाभलेल्या व्यक्तीचे नक्षत्रांनाच साद घालीत उंचावलेले धवल हात. किती रम्य कल्पना! चटकन पुस्तक हातात घ्यावेसे वाटले तर नवल वाटायला नको, फुलपाखराच्या लोभस वृत्तीप्रमाणे. बरे , वरवरचा मामला म्हणावे, काय भुललासी वरलिया रंगा, तर तसेही नाही. हातात घेतलेले पुस्तक खाली ठेवण्याची वेळ येते ती त्याचे पारायण झाल्यानंतरच. बरे, वाचून झाल्यानंतर काय? आनंदाच्या हळुवार लाटा मस्तकाभोवती उसळत राहतात बराचवेळ, हिरव्यागार कोवळ्या तृणाच्या पात्यावरून झुळझुळणाऱ्या झुळुकीसारख्या. आनंद असतो एक चांगले पुस्तक वाचल्याचा. नवीन विचार समजल्याचा, जो आपल्यातच दडून बसलेला होता, अज्ञात नक्षत्रासारखा.

आनंदनक्षत्र हा आहे एक लेखसंग्रह. दीड ते दोन पानी लेखांचा. वाचकांच्या भाषेत म्हणायचे तर फुलपाखराच्या पंखासारखा. आकाराने इवलासा. तरी दीर्घकाळ नजरेसमोर रेंगाळत राहणारा. रंगाने, नक्षीने आणि मुलायम तरलतेने नटलेले पंख. तसा हा संग्रह. त्याचे लेखक आहेत प्रल्हाद जाधव. 'शेवंती जित्ती हाय' या नाटकाने त्यांच्यातल्या कसदार नाटककाराचा परिचय यापूर्वीच नाट्यस्पर्धांच्या रंगमंचावरून करून दिलेला आहे. 'हिरण्यगर्भ', 'यमक' ही नाटकेही आपल्या स्मरणात नक्कीच असतील. दमदार व्यक्तिरेखा, कथानकाची बहुपेडी गुंफण आणि संवादाचा तरलपणा ही त्यांच्या नाटकांची खासियत. तोच तरलपणा, नेमकेपणा, आणि कमीतकमी शब्दांत व्यक्त केलेला विचार, ही या लेखसंग्रहाची खासियत म्हणावी लागेल. खोटे बोलण्याविषयी आपण सारेच पटाईत असतो. पण त्यातले नेमके भान आपण विसरलेलो असतो. लेखक ते भान जागे करतात ते असे, 'खोटं बोलत गेलं की, सकारात्मक विचारांची शक्ती वाया जाऊ लागते. आतल्या आत खोट्या गोष्टींचं एक प्रचंड मोठं विश्व निर्माण होऊ लागतं.' शिव्या देण्यात तर बरीच अहमहमिका दडलेली असते. त्यातून आईवरून उद्धार करण्यात तर मोठाच पराक्रम गाजवल्याचा गर्व असतो. परंतु लेखक सांगतात, 'तुम्ही दिलेली शिवी ही पुन्हा तुमच्याकडेच परत येते. आईवरून दिलेली शिवी तर आपण आपल्यालाच दिलेली असते. कारण आई ही आईच असते. मग ती आपली असो की दुसऱ्याची.'

दूरदर्शनवरील आपण ॲनिमल प्लॅनेट, डिस्कव्हरी किंवा नॅशनल जिऑग्राफिक या चॅनेलवर बऱ्याचदा प्राणीजीवनावरील कार्यक्रम पाहतो. या प्राण्यांत आणि आपल्यात काय फरक आहे, याचे सुरेख वर्णन लेखक असे करतात, 'प्राण्यांना भूक लागते तेव्हा ते शिकार करतात. माणूस मात्र सतत सावजाच्या शोधात असतो. प्राणी स्वजातीयांना खात नाहीत, माणूस मात्र माणसाला खात असतो.'

बिल्टप आणि कार्पेट ही घराबाबतची संकल्पना स्पष्ट करताना लेखक मार्मिक निरीक्षण नोंदवतात, 'पूर्वी लोक काशीयात्रेला जाऊन यायचे, आई-वडिलांना यात्रा घडवून आणणाऱ्या मुलाचं जाहीर कौतुक व्हायचं. मुलंही ती बातमी अभिमानानं जगजाहीर करायची. आता विरारला वन-बीएचके घेतल्याची बातमी काशीयात्रेला जाऊन आल्याच्या थाटात सांगितली जाते.'

या लेखसंग्रहात आलेले लेख हे बोधकथा किंवा इसापनीतीच्या कथा, अशा स्वरूपाचे नाहीत. तर माणूस, त्याचे वागणे, त्यातली मानसिकता, त्यात सामावलेले तत्त्वज्ञान आणि हरवत चाललेले आत्मपरीक्षणाचे भान, या सगळ्यांचे फार बारकाईने केलेले निरीक्षण, चिंतन यांचे सार म्हणजे हे लेख होत. कुठलाही लेख केव्हाही वाचला तरी तो वाचनाचा आनंद देतो. अंतर्मनातले सुस्त भान जागे करण्यासाठी त्यावर ताज्या दवाचे निर्मळ थेंब शिंपडतो. वाचकाला आणखी काय हवे असते?

मुखपृष्ठ आणि रेखाटने निलेश जाधव यांनी केली.

- **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान




दहशतवाद हा शब्दच मुळी दहशत बसवणारा. वाचताना किंवा ऐकतानासुद्धा अंगावर काटा येतो. त्याचे स्वरूप आणि व्याप्ती आता मोजण्याची गरज राहिलेली नाही. जवळजवळ सारे जग त्याच्या विळख्यात सापडले आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये. कुठे अख्खा रुपाया असेल तर कुठे काही आणे, इतकाच काय तो फरक असू शकतो. काही राष्ट्रे तर यात होरपळून जात आहेत. काही त्याच्या जखमा खोलवर कायम राहतील,यासाठी त्याला खतपाणी घालत आहेत. काही राष्ट्रे यातून स्वतःला वेगळे समजत असतीलही, परंतु त्यांच्याही वाट्याला याच्या झळा पोचलेल्या आहेतच. थोडक्यात, दहशतवाद हे हत्यार झाले आहे. त्याचा वापर का आणि कसा केला जातो, हे तर आता जग डोळे उघडे ठेवून निमूटपणे किंवा छद्मीपणाने पाहत आहे. आतापर्यंत यात पुरुषच मोठ्या प्रमाणात सहभागी आहेत, असा आपला समज. एखादा तरुण यात कसा ओढला गेला, किंवा स्वतःहून सहभागी झाला, याला अनेक समाजशास्त्रीय कारणे असू शकतात. परंतु त्यांच्या जोडीला स्त्रिया देखील आहेत! ही आश्चर्याची, तरी वास्तव असलेली गंभीर बाब म्हणावी लागेल. या अशा एका भयानक वास्तवाकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे डॉ. अंजली रानडे यांनी. मराठीत या विषयावरील हे पहिलेच संशोधन असावे.

दहशतवाद म्हणजे नेमके काय? त्याची आधुनिक वैशिष्ट्ये कोणती? त्याचे प्रकार कोणते? स्त्रिया दहशतवादी का होतात? विषयाचे स्वरूप स्पष्ट करताना लेखिकेने या प्रश्नांचे स्पष्टीकरण प्रथम आपल्यासमोर ठेवले आहे. ज्या ज्या राष्ट्रात दहशतवादी संघटना कार्यरत आहेत, त्यात सक्रिय असलेल्या दहशतवादी स्त्रियांच्या कारवायांची माहिती दिलेली आहे. अशी माहिती स्वतंत्र प्रकरणनिहाय दिलेली आहे. श्रीलंका, पॅलेस्टाईन, चेचेन्या, इंडोनेशिया, उत्तर युगांडा व सिएरा लिऑन, आयर्लंड, एल साल्वादोर, नेपाळ, तुर्कस्तान, व्हिएतनाम यांचा यात समावेश आहे. आणि भारत? भारतही यातून सुटलेला नाही.

स्त्रिया दहशतवादी होतात, यामागे कोणती कारणे आहेत? त्या स्वेच्छेने येतात की इच्छेविरूद्ध? की परिस्थितीच्या बळी ठरलेल्या असतात? यात कोणती कारणे असतात, राजकीय, धार्मिक, की व्यक्तिगत? त्यांचा उपयोग कसा केला जातो? या सगळ्यांचा विचार सामाजिक आणि मानसिक पातळीवर होऊ शकतो. त्याचा शोध लेखिकेने इथे घेतलेला आहे. दहशतवादी स्त्री ही सूड उगवण्याच्या हेतूने प्रेरित झालेली असू शकते. भूतकाळातील पापापासून मुक्ती मिळवण्यासाठी शहिदा होणे, हा पर्याय रास्त वाटत असावा. जिहादी किंवा गनिमाशी असलेल्या नातेसंबंधामुळे सहभागी होत असावी. अशा कारवायांत भाग घेतल्यामुळे समाजाकडून मिळणाऱ्या आदराचेही आकर्षण असते. तर कधी कधी ती बलात्कारासारख्या अत्याचाराची बळी असू शकते. महत्त्वाचे म्हणजे, सामाजिक ठेवणीच्या मानसिक स्तरावर, पुरुषापेक्षा स्त्री दहशतवाद्यांच्या हातून काही कृत्ये करून घेणे सोपेही असते.

आपल्यापुरता विचार करायचा झाला तर, श्रीलंकेचा विषय घेता येईल. प्रभाकरन, राजीव गांधींची हत्या आणि एलटीटीई, यांचा तपशील पाहता, हा विषय किती गुंतागुंतीचा आहे, याची कल्पना यावी. तिथले राजकारण, भौगोलिक परिस्थिती, एलटीटीईचे प्रश्न, भारताचे धोरण आणि त्यात सहभागी झालेल्या स्त्रिया, सारेच थक्क करणारे आहे. आपण हे सर्व अनुभवलेले आहे, परंतु त्यातले बारकावे ठाऊक नसल्याने अधांतरी बोलणे व्हायचे. आता त्याला नेमकेपणा लाभला आहे तो या पुस्तकामुळे. भारतातील प्रश्नही समजून घेण्यासारखा आहे. तो या पुस्तकामुळे लक्षात यावा. लेखिकेने केलेले संशोधन समाजशास्त्रीय पातळीवरील आहे, तसे ते मानसशास्त्रीय पातळीवरीलदेखील आहे. ते वाचताना अंतर्मुख करते. एका वेगळ्याच विषयाला वाचकांच्या समोर ठेवले, त्यासाठी जे परिश्रम घेतले, त्यासाठी लेखिकेची प्रशंसा करायला हवी.

मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी केले.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

सुदेश लोटलीकरांचा हा पुढचा कवितासंग्रह, आठवा. हातात घेताना वाटावा, कांदबरीचे तर पुस्तक नाही ना! जवळपास अडीचशे पानांचा, भलाभक्कम. श्रीकांत देशमुख यांच्या 'आम्ही बोलावे काही'सारखा. भरभरून बोलणारा. लोटलीकरांचा हा संग्रह देखील असाच भरभरून कवितेचं लेणं घेऊन आला आहे, अलंकृत नववधूसारखा. एकशे अठरा कवितांचे लेणे. जे दोन्ही नेत्रांना नाही, तिसऱ्या नेत्राला नाही, गवसले ते अंतर्नेत्राला. आणि जे या नेत्राने टिपले, त्याची जाणीवपातळी ती काय वर्णावी!




'कसे दावू त्यांना सत्य, अधोगामी बहिर्मुख।
अंतराचा नाही ठाव, व्यर्थ कवितेचे सुख।।

अनेक विषयांवरील कविता या संग्रहात आहेत. तुकारामाच्या अभंगांशी नाते जोडणाऱ्या, ओशोच्या गुरुवाणीला प्रमाण मानणाऱ्या, वास्तवाला सामोऱ्या जाणाऱ्या, नात्यांचे पोत उलगडून दाखवणाऱ्या, स्वतःचा तळ ढवळून काढणाऱ्या, अव्यक्ताचा स्वतःशी संवाद साधणाऱ्या, अशा कितीतरी कविता. या कविता वाचत असताना प्रथम जाणवते ती त्यातली लयकरी नादमयता. पटकन ताल धरायला लावणारी. त्यामुळेच थेट हृदयाशी संवाद साधणारी.

'ह्या हृदयीचे त्या हृदयी, ओघवत जाते कविता माई' अशी.

असे असले तरी कवी भाबड्या समजुतींच्या लक्ष्मणरेषेत स्वतःला बंदिस्त करण्याचे झुगारतो आहे. तो आत्मतळाच्या मातीत खोलवर मुळे रुतवून उभा आहे. अजून वेळ गेलेली नाही, थोडे अंतर चालण्याचे आवाहन करतो आहे. तो सांगतो, अंतर्तळाशी जायला आपणच खोदायला हवे. वर्तमानात जगायचे आहे, साधनेला पकडून ठेवायचे आहे, मोरपिसासारखे.

काही कविता हळूवार आहेत, वैयक्तिक पातळीवरील.

पाहा–

लेक माझी सुकुमार, आता सासुराशी जाई
लळा लावला तू असा, जशी होती माझी आई

'सानिया लोटलीकर' ही कविता वाचताना, पिता आपल्या कन्येला निरोप देतो आहे, हे लक्षात येते. त्यावेळी पी. सावळाराम यांच्या ओळींची पटकन आठवण होते, 'गंगायमुना डोळ्यांत उभ्या का, जा मुली जा, दिल्या घरी तू सुखी राहा.'

तुझे दूधसाय हात , माझ्या मस्तकाच्या खाली
नभ भरलेली माया, आई घेऊन आली

'पुष्पा शरद लोटलीकर ऊर्फ शांताबाई' ही कविता वाचत असताना, आईवरील अनेक कविता, कवी यशवंतांपासून फ.मु. शिंदे यांच्यापर्यंतच्या कवींच्या, स्मरणाच्या नभात चांदण्यांसारख्या डोकावू लागतात. माय आणि लेक, आजची लेक उद्याची होणारी माय, यांच्याविषयीचा जिव्हाळा, आत्मिक ओलावा, नात्यातला घट्ट बंध, नाळेसारखा, कवितेतून पान्हावला नाही तरच नवल. प्रत्येकची भावना, संवेदना सारखी असू शकते, परंतु शब्दकळा? कवी तिथे सापडतो. लोटलीकरांची ही माया शब्दांचा मृद्गंध घेऊन आली आहे, पहिल्या सरीसारखी.

कवीला सापडलेली शब्दकळा ही बहरात आलेल्या पुष्पगंधासारखी आहे. ती नुसतीच कोमल वा नाजूक नाही, अंगाअंगाने फुललेली आहे. दरवळाने सजलेली आहे.

पैसा वितळतो
मेणबत्तीगत.
गोड त्याचे रूप
मिठाईसारखे

भक्त आणि सखे
तृप्त होती
तीन दगडांची चूल,
द्वेष, क्रोध आणि दुःख,
जीवनाला शिजविती मृत्यु
चुलीतली राख.

अशा ओळी वाचल्या की तिथेच थांबण्याचा मोह व्हावा, इथून पुढे जाऊच नये असे वाटावे, इतका आनंद अनावर होतो; नदीकाठच्या घनगडद छाया देणाऱ्या वृक्षाखाली थांबल्यासारखा.

कवितांचा प्रवास दीर्घ आहे. चालण्याची क्षमता असलेलाच चालू शकतो, दूरपर्यंत. कविची क्षमता ही अशी आहे. तिला प्रतिभेचे लेणं आहे. कुठलीही कविता, अशी सुरी न वाटता, वेगवेगळी अनुभूती देत ती पुढे जाते. त्यामुळे तिचे दीर्घपण बेढब न वाटता आपलीच वाटते, कुटुंबातल्या सदस्यांसारखी. ही बहुपेढी कविता कुठे सहज सुचवूनही जाते, साधना, गुरूविषयी. तो अनुभव प्रत्येकाचा वेगळा असू शकतो. पण चांगली कविता वाचल्याचा आनंद बराच काळ स्मृतीत रंगाळत राहतो. मुखपृष्ठ षांताराम पवार यांनी केले.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

‘शब्दसौरभ’ हा शब्दांच्या लीला आणि छटा दाखवणारा लेखसंग्रह. आपण सृष्टी पाहतो, ईश्वराने निर्माण केलेली. पण आणखी एक सृष्टी निर्माण केली जाते, शब्दांची. शब्दांतून. आज आपण वाचत असलेले साहित्य, ही सृष्टीच आहे. तुकाराम म्हणतात, आम्हा घरी धन, शब्दांचीच रत्ने. ज्ञानेश्वर म्हणतात, बिंब तरी बचके एवढे। परि प्रकाशा त्रैलोक्य थोकडे. शब्दांचा हा महिमा. आपण तो केवळ अनुभवायचा.




शब्दांची व्युत्पत्ती पाहणे तसे गमतीशीर असते. त्याच्या सहवासात निर्माण झालेली वाक्ये, म्हणी म्हणजे त्याचे कोंदणच. शब्द प्राकृतातून आलेले, काही संस्कृतातून जसेच्या तसे आलेले. काही इतर भाषांतून, तर काहींचा अपभ्रंशाने झालेला कायापालट. शब्द एकटा असतो, तरी बोलका असतो. धातू लागल्याने त्याचे रूप बदलते आणि अर्थही. शब्द हसवतात, रडवतात, घायाळ करतात. क्रोध, द्वेष, त्वेष निर्माण करतात. तसे मनुष्य आणि प्राणी पाहून स्वतःच रूप बदलतात. अशाच काही शब्दांचा शोध घेण्यात आला आहे. त्यांच्या व्युत्पत्तीपासून विविध ठिकाणी कसा उपयाग होतो, त्यांचे अर्थ प्रसंगास अनुसरून कसे चालतात, म्हणींमध्ये त्यांचा कसा उपयोग केला जातो, यांची मनोरंजक माहिती देणारे लेख म्हणजे हा संग्रह, ‘शब्दसौरभ’. यात तीस लेख आहेत. त्यांची नुसती शीर्षके पाहिली तरी आपली उत्सुकता वाढीस लागते. पाहू या काही शब्द आणि त्यांच्या छटा.

कोकण. आपल्या सगळ्यांना तो ठाऊक आहे. भौगोलिक माहितीसह आपण त्याचे वर्णन करू शकतो. सह्याद्री पर्वत आणि समुद्र यांच्यासोबतीने दक्षिणोत्तर पसरलेला प्रदेश, हे त्याचे उत्तर. परंतु या शब्दाची व्युत्पत्ती? ती दाखवताना, लेखिका दाखला देतात तो परशुरामाच्या आईचा, रेणुकाचा. तिचे दुसरे नाव कुंकणा. त्यातील अक्षरांचा अर्थ, रेणू म्हणजे कण, कुं किंवा कु म्हणजे पृथ्वी. म्हणजे रेणूंनी बनलेली पृथ्वी. कुंकणा ही देवी ज्या भूभागाची अधिष्ठात्री देवी आहे, तो भूभाग ‘कोंकण’ या नावाने ओळखला जाऊ लागला. स्कंदपुराणात सह्याद्रीखण्डामध्ये याचा उल्लेख आहे. आणखीही तपशील पुष्ट्यर्थ दिलेला आहे. नथ हा नाकात घालायचा एक अलंकार. नाक आणि नथीवरून तर अनेक म्हणी निर्माण झालेल्या आहेत. गंमत म्हणजे हा ‘नथ’ नावाचा दागिना आज आपण ओळखतो, तो तसा मूळ शब्दच अस्तित्वात नव्हता. तर तो आला आहे, ‘नात्थ’ या शब्दावरून. नात्थ म्हणजे बैलाच्या नाकात घालायची वेसण. तीच गंमत पोस्त या शब्दाची. यातला संस्कृत धातू आहे पुष्. याचा अर्थ पोषण करणे. आजचा टू इन्व्हाईट प्रॉम्प्ट सर्व्हिसचा तो शार्टफॉर्म म्हणून प्रचलित आहे. ‘बाशिंग’ हे लग्नातले वधूवरांचे शिरोभूषण. याची माहिती तर अशी मनोरंजक आहे की, प्रत्येकाने ती वाचायला हवी, अगदी बोहल्यावर चढलेल्यांनी आणि चढू इच्छिणाऱ्यांनीसुद्धा. सेवा-शुश्रूषा, व्यास आणि व्यासपीठ, नीरक्षीरविवेक, अशा कितीतरी परिचित शब्दांचा अद्‌भुत खेळ इथे नव्याने पाहायला मिळतो. वृक्षगान, पक्षिगान या लेखांत सृष्टी आणि पक्षी यांच्या विविध छटा हळुवारपणे व्यक्त केलेल्या आहेत. अस्तुरीचा जल्म बाई.. या लेखात स्त्रीच्या एकूण जगण्याशी जोडलेले शब्द आणि संकेतांचे टप्पे तर अंतर्मुख करणारे आहेत. मालवणी भाषेतील शब्द आणि म्हणी यांच्यावरील खास दोन लेख आहेत. या भाषेची गोडी नाटकापुरतीच मर्यादित नाही. त्याहीपलीकडे खूप आहे, याचा अनुभव हे लेख देतात. आणखीही खूप आहे, जे आपण वाचायलाच हवे.

‘शब्दसौरभ’ हे केवळ एक पुस्तक नाही. तो आपला ठेवा आहे, ज्यापासून आपण दूर आहोत. हे सर्व काही आपलेच आहे, तरी ते आपल्याला अनभिज्ञ आहे. त्याची ओळख लेखिकेने नव्याने करून दिली आहे. सोबत अनेक तपशील दिले आहेत. अनेक संदर्भांचे दाखले दिलेले आहेत. उगमांचे स्थान दिलेले आहे. हे देत असताना, शब्दांना जडपण येणार नाही याचीही काळजी घेतली आहे. हा शब्दांचा मोहोर अनुभवताना आपले मन आपोआप प्रफुल्लित होत जाते, प्रत्येक शब्दासोबत. त्याची सुरुवात मुखपृष्ठापासून होते. आणि शेवट... एक सुंदर अनुभव!

मुखपृष्ठ पुंडलिक वझे यांनी केले.

- **मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

कलावंत जन्माला यावा लागतो, की घडवावा लागतो? राजकारणी जन्माला येतो की घडवावा लागतो? अधिकारी जन्माला यावा लागतो की घडवावा लागतो? असे अनेक प्रश्न नेहमीच वाटाच्या केंद्रस्थानी असतात. दोन्ही बाजूंचे समर्थन हिरिरीने केले जाते. काही अनुभवांवर आधारित असतात, काही सिद्धांतावर. प्रत्येकाचे बरोबर असते असे नाही, तसे ते चूक असते असेही म्हणता येत नाही. माणसांगणिक किंवा अनुभवांगणिक त्यांचे अनुमान काढले जाते. परंतु 'जीवन अमृत झाले' हे पुस्तक वाचल्यानंतर ठामपणे म्हणता येते, अधिकारी जन्माला यावा लागतो. पुढे परिस्थिती त्याला घडवण्याचे काम करते. हे घडणे यशस्वीतेकडे कसे घेऊन जाते, ते घाव घालणाऱ्या परिस्थितीवर अवलंबून असू शकते.




दत्ताजी देसाई यांचे 'जीवन अमृत झाले' हे चरित्रवजा पुस्तक वाचून संपवले आणि पहिलीच प्रतिक्रिया मनात उमटली, अधिकारी हा जन्माला यावा लागतो. परंतु तेवढेच पुरेसे नाही, त्याने स्वतःला सिद्ध करण्याची गरज असते. ती कसोटी सहाणेवर घासल्यानंतरच जाहीर होते. दत्ताजींच्या बाबतीत काय? मंत्रालयात अधिकारी म्हणून एका राज्यकर्त्यासोबत काम केल्यानंतर पुढे गादीवर येणाऱ्या राज्यकर्त्याला ती व्यक्ती नकोशी होते, यावरून काय सिद्ध होते? तिच्या अधिकारीपदाचा कसदारपणा राज्यकर्त्याइतकाच मुरब्बी आहे, हेच त्यातून सिद्ध झालेले असते. त्यामुळेच की काय, एक राज्यकर्ता बदलल्यानंतर दुसऱ्या राज्यकर्त्यांच्या काळात त्यांना आहे त्याच जागी पदग्रहण लाभलेले नाही. तब्बल दोन महिने ते शंभर दिवसांपर्यंत त्यांना त्यांच्यापदापासून दूर ठेवलेले आहे. पण हा अनुभव काही दत्ताजीसाठी नवीन नाही. शाळेत असताना पहिला क्रंमाक नेहमीच कसा पटकावतो? म्हणजे कॉपी करून; असा खुद्द त्यांच्या शिक्षकांचाच संशय असायचा. आणि त्यासाठी मारही द्यायचे, 'कॉपी केली नाही' असे खोटे बोलतो म्हणून. ही कुशाग्र बुद्धीला दिलेली शाबासकी असायची. ही शांबासकी राज्यकर्त्यांच्या सोबत राहिल्याने पुन्हा पुन्हा मिळत राहिली इतकेच. शाळेत सोबत असलेले मित्र, त्यांच्या स्वतःच्या वाईट संगतीने पुढारलेले होते. त्यांच्यासोबत राहून देखील एकही दुर्गण चिकटलेला नाही. पुढे मोठा अधिकारी झाल्यानंतरही असा कुठलाच दुर्गुण अंगाला येऊन भिडला नाही. याला काय म्हणावे? हे आश्चर्य वाचक म्हणून आपल्याला जसे वाटते तसे दत्ताजींना स्वतःला वाटत राहिले. शाळेत असतानाही आणि आजच्या वयातही. त्याचा शोध ते त्यावेळी ही घेत होते, आजही घेत आहेत. माझ्यात नेमके आहे काय? मी आज जो उभा आहे, त्याचे कारण काय? अजूनही या प्रश्नांचा शोध ते घेत आहेत.

दत्ताजी हे तसे राजकारणी व्हायचे. त्यांची इच्छाही तीच होती. बाळासाहेब देसाई हे त्यांच्या आप्तातले. म्हणजे वातावरणही अनुकूल होते. परंतु त्या दिशेला जाणाऱ्या नौकेचे सुकाणू दुसऱ्याच्या हाती गेले आणि दिशा बदलली. तरी राजकारण सुटले नाही. नोकरीच्या निमित्ताने राजकारणातच वावरण्याची संधी मिळाली. पदवी परीक्षेत असताना पुणे विद्यापीठात प्रथम येण्याचा मान पटकावला. लोकसेवा आयोगाने स्वतःहून दखल घेऊन अधिकारी पदाची व्दारे खुली केली. शेतीक्षेत्रात प्रयोग करायचे होते, त्यातच संशोधन करायचे होते, पण तेही राहून गेले. प्राध्यापकी स्वीकारावी लागली. धुळे कॉलेजात प्राध्यापक म्हणून काम करताना आलेला अनुभव सांगतात, 'वर्गावर जाताना मी पुस्तक नोट सोबत घेऊन जात नसे. सगळे तोंडी. मुलांना हा आपल्यातलाच एक विद्यार्थी वाटला. परंतु त्यांची बोटे आश्चर्याने तोंडात गेली, जेव्हा प्रत्येकाच्या नावाची हजेरी हजेरीपुस्तक समोर न ठेवता घेतली, नावानिशी. आणि तीही उलट क्रमाने, झेड पासून ए पर्यंत.'

शेतीची प्रचंड आवड असलेल्या दत्ताजीने दुष्काळाच्या काळात गावतळ्यांचा प्रयोग पहिल्यांदा केला, तोही यशस्वी. धरणांचे प्राजेक्ट केले. मंत्रालयात तर मुख्यमंत्र्याचे उजवा हात झाले. मुंबई महानगरपालिकेच्या उपायुक्त पदावर आले अणि जे प्रोजेक्ट राबवले, ते सारे आजही सगळ्यांना आदर्श वाटावेत. चर्चगेट स्टेशनाच्या बाहेर पडताना केलेला भुयारी मार्ग हे उदाहरण त्यासाठी पुरेसे होईल.

चरित्र म्हटले की त्यात अनेक उपचरित्रांचा समावेश होतो, घराला आकार देताना अनेक खांब आधाराला सोबत आलेले असतात, तसा. वसंतराव नाईक,वसंतदादा पाटील ते शंकरराव चव्हाण यांच्यासारखे मुख्यमंत्री, तिनईकर, सुकथनकर,शरद काळे यांच्यासारखे आयुक्त, शाळेतील मित्र, शिक्षक, नोकरीनिमित्ताने भेटलेले अनेक सहकारी यांचा यात समावेश आहे. कारकीर्द, कामाची पद्धती आणि एक माणूस म्हणून त्यांचे आलेले अनुभव उत्कटतेने आणि तितकेच संयमाने लिहिलेले आहेत. राजकारणात होणारे बदल, त्यांच्याविषयीचे समज गैरसमज, राजकारण नावाची खासियत, यासगळ्यांचा एक घटक म्हणून अनुभव घेतलेला असल्याने, त्यांचा तपशील ओघाने आलेला आहेच. परंतु जिथे मोठेपणाची समृद्धी लाभली, तिचा नम्रपणे उल्लेख केला. जिथे चूक झाली तिची कबुली ही तितकीच प्रांजळपणे दिली आहे.

दत्ताजी सांगतात, सचोटीने जगालो, मनात ध्येय ठेवून पुढे जात राहिलो. तीच सचोटी आणि ध्येय आजच्या तरूणांनी ठेवावे, अशी प्रामाणिक इच्छा आहे. त्यासाठी हा लेखनप्रपंच.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

**हेलिकॉप्टर आणि मी**
**सुरेश शिवराम गोखले**




हेलिकॉप्टर हा तसा आपला कुतूहलाचा विषय. विमानाचे हवेत उडणारे लहान भावंडं म्हणून आपल्याला त्याची ओळख. निडणुकांच्या काळात ते जवळून पाहण्याचा योग अधिक येतो, एवढेच आपले भाग्य. जे त्यातून प्रवास करतात, ते जास्त भाग्यवान. परंतु  पायलट, इंजिनीअर म्हणून ज्यांचे नाते जोडले गेलेले आहे, ते खरे भाग्यवान! म्हणजे ही आपली भाबडी समजूत. परंतु अशा भाग्यवान माणसाने त्याचे हेलिकॉप्टरशी जुळलेले नाते, आणि त्याचे अनुभव आपल्यासमोर उघड केले, तर आपण स्वतःला ते शेअर करताना भाग्यवान समजायला हरकत नसावी. अनंत सामंत यांची 'एमटी आयवा मारू' ही कादंबरी वाचताना समुद्र आणि जहाज यांच्याशी असलेल्या माणसांच्या नात्याचा गोफ काही नवीनच सांगून गेला होता. तसा हा अनुभव या पुस्तकातून घेता येतो.

हेलिकॉप्टर आणि त्यासोबतचा सहवास याविषयीचे अनुभव सांगतांना लेखकाने त्यांचा एकूण सेवाकाळाचा कालावधी दिलेला आहे, १९५७ ते २००५. वेगवेगळ्या नात्याने ते तेथे जोडले गेलेले होते. साधारणपणे यात हवाई उड्डाणाच्या एकूण तासांची गणती पाहिली जाते. ती लेखकाच्या नावावर आहे १५०० तास.

हेलिकॉप्टरची रचना व कार्य या विषयी पहिल्या प्रकरणात माहिती दिलेली आहे. तर पुढील प्रकरणांमध्ये उड्डाणाच्या निमित्ताने आलेले वेगवेगळे अनुभव कथन केलेले आहेत. यात निवडणुकीच्या निमित्ताने बाबू जगजीवनराम, अटलबिहारी वाजपेयी, माधवराव शिंदे, विजयाराजे शिंदे, इंदिरा गांधी यांसारख्या राजकीय नेत्यांचे अनुभव आहेत. शूटिंगच्या निमित्ताने आलेल्या चंदेरी दुनियेच्या मखमली आठवणी तर भरपूर आहेत. 'बर्निंग ट्रेन' हा सिनेमा तर आपल्याला नक्की आठवत असेल. त्यातल्या थरारक प्रसंगांचा तपशील इथे वाचायला मिळतो. राजकपूर, नर्गिस, ऋषी कपूर, नितू सिंग, डॅनी, विनोद खन्ना अशा अनेक तारे–तारकांचे शूटिंगचे अनुभव आहेत. हवेतून पुष्पवृष्टी करणे, हा एक महासोहळा. दिगंबरपंथीय साधुसंत, श्री सत्यसाईबाबांसारखे महात्मे, यांना घेऊन तीर्थक्षेत्री जाणे, राज्यांचे मुख्यमंत्री, विजय मल्ल्यासारखे मोठे उद्योजक, जपानी डेलिगेटसारख्या अतिमहत्त्वाच्या व्यक्ती, यांच्यासमवेत करावी लागलेली उड्डाणे, श्री सत्यासाईबाबांनी हवेतून काढून दिलेल्या आशीर्वादरूपी अंगठ्या, हवाई फवारणी, हे सारेच सुरस, मनोरंजक आणि तितकेच थरारक अनुभव आहेत. याच्याच जोडीला येणारे तांत्रिक दोष, त्यांचे निराकरण, उड्डाणापूर्वी करावी लागणारी तयारी, सामान वाहून नेताना घ्यायची काळजी, दूरच्या प्रवासाला जायचे असेल तर उड्डाण करण्याऐवजी सुटे भाग करून ट्रकमधून हेलिकॉप्टरची वाहतूक करणे, सदैव तत्पर राहण्याची गरज, अशा अनेक अनुभवांचा खजिना या पुस्तकरूपाने वाचकांच्या हाती दिलेला आहे.

हेलिकॉप्टर विषयीची तांत्रिक माहिती, उड्डाणांची माहिती, त्यानिमित्ताने भेटलेल्या अनेक व्यक्ती, अनेक गावे, निसर्ग, हे सारे वाचकांच्या हाती सोपवत असताना, लेखक स्वतःविषयी देखील व्यक्त होत जातात. फ्लाईंग क्लबचे अंतरंग उलगडून दाखवतात.  शिकाऊ उमेदवारीपासून सुरू झालेल्या प्रवासाचे वर्णन करतात. हे वर्णन करताना व्यावसायिक–तांत्रिक इंग्रजी शब्द जसेच्या तसे आले आहेत. त्यांच्याशी आपला परिचय होतो. हेलिकॉप्टर या शब्दाची फोड आणि व्युत्पत्ती हा त्याचाच एक भाग. संपूर्ण लेखन सहज सुंदर आणि ओघवत्या शैलीत केलेले आहे. मोजक्या अनुभवात संपूर्ण प्रवासाची नोंद केलेली आहे. एक वेगळा अनुभव हे पुस्तक वाचताना देत जाते.

मुखपृष्ठ सतीश खानविलकर यांनी केले.

- **मूल्य १६० रु.  सवलतीत १०० रु.**